

पानिपतचा
रणसंग्राम

पानिपतचा रणसंग्राम

शंभूराव रामचंद्र देवळे

चित्रशाळा प्रकाशन, पुणें २.

: मुद्रक :
दामोदर त्र्यंबक जोशी
व्यवस्थापक, चित्रशाळा प्रेस,
५६२ सदाशिव, पुणें २.

☆

आवृत्ति पहिली
२४ जानेवारी १९६१
पानिपत द्विशताब्दी दिन

☆

किंमत : रु. २·५०

☆

: प्रकाशक :
दामोदर पांडुरंग रानडे
व्यवस्थापक, चित्रशाळा प्रकाशन,
५६२ सदाशिव, पुणें २.



इतिहासाचार्य
कै. विश्वनाथ काशिनाथ राजवाडे
यांच्या स्फूर्तिदायक स्मृतीस
आदरपूर्वक अर्पण.

— शं. रा. देवळे

प्रस्तावना

पानिपत येथें मराठ्यांनीं सदाशिवरावभाऊ यांच्या नेतृत्वानें अहमदशहा अबदाली, रोहिले व अयोध्येचा नबाब वजीर शुजाउद्दौला यांच्याशीं जें युद्ध दोनशें वर्षांमागें केलें, त्या युद्धाचें ऐतिहासिक महत्त्व ओळखून यंदां महाराष्ट्रांत अनेक ठिकाणीं त्याचें स्मरण उजळण्यांत आलें. त्या अनुरोधानें बरींच लहानमोठीं पुस्तकेंहि प्रसिद्ध झालीं. त्यांपैकीं श्री. शंभूराव रामचंद्र देवळे यांचें हें पुस्तक आहे. पुस्तकाची रचना करीत असतां श्री. देवळे यांनीं ऐतिहासिक साधनें पाहण्यासाठीं जे श्रम घेतले त्याची साक्ष पुस्तकांत ठिकठिकाणीं दिलेल्या तत्कालीन कागदपत्रांच्या उताऱ्यांनीं पटेल. "हीं सारीं साधनें सामान्य वाचकांच्या आणि प्रौढ विद्यार्थ्यांच्या आवांक्याबाहेरचीं आहेत. म्हणून या साऱ्या साधनांचा अभ्यास करून आणि कोणत्याहि पूर्वग्रहांना मनांत ठाव न देतां 'पानिपतचा रणसंग्राम' हें पुस्तक लिहिलें आहे." लेखकानें हें पुस्तक सामान्य वाचक आणि प्रौढ विद्यार्थी यांच्यासाठीं तयार करतांना प्रतिपाद्य विषयाचीं एकूण तेवीस प्रकरणें लिहिलेलीं आहेत. पानिपत-संग्रामाचा आरंभापासून अखेरपर्यंतचा क्रम ध्यानांत येण्याला हीं प्रकरणें उपयोगी पडतील. श्री. देवळे यांनीं त्यांच्या प्रस्तुत पुस्तकांत पानिपतची युद्धकथा समजून घेण्याच्या दृष्टीनें उणीव भासूं नये, अशी आपल्या विषयाची मांडणी केली आहे. क्वचित् या मांडणींत कादंबरीचाहि रंग आढळतो. तो मुख्य कथानकाच्या ओघांत आलेला असल्यानें वाचकाला फारसा खटकणार नाहीं. तथापि पुराव्याला धरून लिहिल्या जाणाऱ्या पुस्तकांत कादंबरीला शोभणारीं वर्णनें दिसतांच त्यांचा पुरावा कोणता, या प्रश्नानें वाचकाच्या चित्ताला धक्का दिला तर तो स्वाभाविक ठरेल.

श्री. देवळे यांनीं १७५२ मध्यें दिल्लीचा बादशहा व पेशवे यांच्यांत बरोबरीच्या नात्याचा जो तह बादशाहीच्या संरक्षणासाठीं झाला, तेथपासून मुख्य विषयाचें प्रतिपादन आरंभलें आहे. बादशाहीचें संरक्षण ही त्या तहांतील प्रतिज्ञा पाळण्याकरितां मराठ्यांचा उद्योग सतत अनेक वर्षें सुरू होता. त्या प्रतिज्ञापूर्तीच्या आड येणारे एक रोहिलेच होते. रोहिल्यांपैकीं बादशाहीच्या अधिकार-मालिकेंतील सर्वोच्च स्थान मिळविण्याची महत्त्वाकांक्षा एकट्या नजीबखानालाच होती. बादशाही मोडकळीस आली व तिला सावरण्याची कामगिरी मराठे करणार, याची नजीबला चीड वाटत होती. काफर मराठ्यांवर विसंबणाऱ्या बादशाहीच्या

दुर्दशेंत नजीबखान साऱ्या मुसलमानांच्या वर्चस्वाची पायमल्ली पाहात होता. शहा वलीउल्ला नांवाचा त्याचा एक धर्मसुधारणावादी सल्लागार त्याला मराठ्यां-विरुद्ध नेहेमीं चिथावीत असे. शहा वलीउल्ला हिंदुस्थानांतील मुसलमानांचें ऊर्जित एकट्या अबदालीच्या हातीं आहे, असें मानून अबदालीशीं त्याची प्रौढी दर्शविणारा पत्रव्यवहार करीत होता. नजीब तर अबदालीचा पट्टशिष्यच होता. १७५७ सालीं अबदालीनें हिंदुस्थानांत जी स्वारी केली, तिच्यांत नजीबखानानें अबदालीला पुष्कळ साह्य पुरविलें. नंतर १७५८ मध्यें अबदालीनें घशांत टाकलेला पंजाबचा भाग मराठ्यांनीं छिनावून घेतला आणि नजीबखानाची रग जिरविण्याचें काम दत्ताजी शिंद्यांनीं १७५९ मध्यें हातीं घेतलें. नजीबखानानें या प्रसंगीं साहजिकच अबदालीचा धावा केला. अबदाली झपाट्यानें पंजाबांत घुसला. त्याच्यापुढें मराठे आपलीं ठाणीं सोडून पळाले. पानिपतच्या संग्रामाचें सूतउवाच नजीबखान-दत्ताजीच्या लढाईनें केलें. पुढें नंतर दिल्लीनजीक यमुनेच्या कांठीं अबदालीच्या सामन्यांत दत्ताजी पडल्यामुळें भाऊसाहेबांना दक्षिण सोडून अबदालीच्या रोखानें उत्तरेची वाट धरावी लागली.

भाऊसाहेबांनीं मार्च महिन्याच्या ऐन मध्यांत उत्तरेच्या मोहिमेचें शिंग फुंकलें आणि दिल्लीस ऑगस्टच्या आरंभीं त्यांनीं अबदालीची दिल्लींतील व्यवस्था बदलून टाकली. दक्षिणेंतून निघाल्या दिवसापासून अबदालीला सामील होण्याचा संभव असलेल्या लोकांना भाऊसाहेब आपल्या स्वारीचा मुख्य उद्देश वारंवार कळवीत होते. 'अबदालीची नड हिंदुस्थानचे पातशाहींत रुतों देणें अयोग्य!... अबदालीचें पारिपत्य होणें हें आदि आहे.' (राज० १ – १६७). 'आम्हांस तर चकतेयाची पातशाही राखणें. यासाठीं अबदालीशीं सलूख करणें नाहीं.' (कित्ता–१७३) 'तैमूरियाची पातशाही; याचा बंदोबस्त कळेल तसा आम्ही राजश्री पंतप्रधान याचें इतफाकानें करूं; तुम्ही (अबदालीनें) या गोष्टींत न पडावें...बादजफते (जय झाल्यावर) दिल्लींतील पातशाहीचा बंदोबस्त त्यांचे आमचे विचारें होऊन येईल तोच केला जाईल.' (कित्ता–१७९) शुजाकडे भाऊसाहेब जे निरोप पाठवीत होते, त्यांचें स्वरूप या उताऱ्यांत स्पष्ट दिसणारें आहे. शुजाला आपल्या बाजूस वळविण्याच्या प्रयत्नाबरोबर नजीबखानाखेरीज इतर रोहिले सरदार 'फुटतील तर फोडावे,' असें गोविंदपंत बुंदेल्यास कळवितांना 'नजीबखान तो अबदालीच आहे...नजीबखान तो मूळच आहे,' (कित्ता–१८६) असें नजीबखानासंबंधांत आपलें मत भाऊसाहेबांनीं खणखणीतपणें व्यक्त केलें आहे.

अहमदशहासुद्धां शुजा, रोहिले सरदार, रजपूत राजे—प्रामुख्यानें जयपूरवाला माधोसिंग यांना आपल्या पक्षांत ओढण्यासाठीं झटत होता. सूरजमल जाट एकदां दिल्लीपर्यंत भाऊसाहेबांच्या बरोबर आला, पण शुजानें त्याला मराठ्यांच्या सोबतींत राहण्यांत लाभ नाहीं, असें लिहून मराठ्यांच्या गोटांतून बाहेर काढलें, असा पुरावा मुसलमानांच्या पानिपतविषयक बखरींतून सांपडतो. भाऊसाहेबांनीं त्याच्या मनधरणीला जवळचीं वजनदार माणसें पाठविलीं, परंतु तो मदतीस आला नाहीं, म्हणून भाऊसाहेबांचा उत्साह थंडावण्याचें कारण नव्हतें. आपल्या मदतीस कोणी आले तर उत्तमच, न आले तरी ठीक; मात्र अब्दालीच्या मदतीस कोणीहि जाऊं नये, असें भाऊसाहेबांचें मनोगत कांहीं पत्रांतून उघड दिसतें. त्यांना आपलें सैन्य व सरदार यांच्या पराक्रमाबद्दल पूर्ण विश्वास होता.

'अब्दालाची नड हिंदुस्थानचे पातशाहींत रुतों देणें हें अयोग्य!' हा सिद्धान्त निवळ बादशाहीच्या रक्षणापुरता नव्हता किंवा त्या निस्सत्त्व संस्थेला जगविण्याच्या प्रेमाचा नव्हता. बादशाहाच्या नांवानें आपलें राजकीय वर्चस्व देशभर गाजविण्याची संधि सर्वांनाच हवी होती. त्या संधीकरितांच बादशाहीची कुतरओढ अयोध्येचे नबाब, गाझीउद्दीन, नजीबखान, या सर्वांनीं चालविली होती. या बादशाहीविषयीं लोकांत वसणाऱ्या आदराचा फायदा बादशाहीच्या नांवानें पुढें इंग्रजांनीं देखील घेतला, हें प्रसिद्धच आहे. मराठ्यांची तशीच मनीषा होती. शिवाय आपलें रक्षण करावें, अशा मतलबाचा एका बादशाहानें मराठ्यांशीं तहच केला असल्यामुळें बादशाहीच्या बंदोबस्ताचा पुढारीपणा त्यांच्या हक्काचा होता.

परंतु 'अब्दालीची नड हिंदुस्थानचे पातशाहींत रुतों देणें हें अयोग्य' या वाक्यांत आणखी एक अर्थ आहे. बादशाही ही एक प्रकारें केंद्रीय सत्ता समजली जात होती. त्या सत्तेमध्यें परक्याच्या आक्रमणानें क्रांति होऊं देणें म्हणजे साऱ्या देशावर राजकीय संकट ओढवून घेण्यासारखें आहे, म्हणून त्या आक्रमणाचा सर्वांनीं एकवटून प्रतिकार केला पाहिजे, असें अखिल भारताच्या हितस्वास्थ्याचे विचार नादिरशहानें दिल्लीस धडक मारून बादशाही तुडविली तेव्हां बाजीरावाच्या मनांत आले. जुनी बादशाही ओळखीची, तिच्या अंमलदारांचें राजकारणहि नेहमींच्या संसर्गानें परिचयाचें झालेलें, ही स्थिति परक्यांचें वर्चस्व नव्या बादशाहीच्या रूपानें स्थिरावल्यास शिल्लक राहणार नाहीं, मग नव्या राजवटीचे नवे सरदार, अंमलदार, कारभारी येणार; म्हणजे सगळाच मनु पालटणार. परचक्राचे असे

दुष्परिणाम टाळण्याचा उपाय हाच कीं, अब्दालीची नड हिंदुस्थानचे पातशाहींत रुतों देणें अयोग्य. अब्दालीच्या मागून दिल्लीच्या बादशाहींत पूर्वेकडून वाढत चाललेल्या इंग्रजांची ढवळाढवळ नको म्हणून बाजीराव, भाऊसाहेब यांच्याच धोरणानें नाना फडणवीस आणि महादजी शिंदे वागत होते. स्वदेशाच्या राजकारणांतील आपलें गाऱ्हाणें दूर करण्यासाठीं देशाबाहेरच्या सामर्थ्याला पाचारणें हा देशद्रोह असल्याचा ध्वनि या पुरुषांच्या वर्तनांत आणि विचारसरणींत भरलेला होता. राष्ट्रप्रेम, राष्ट्रद्रोह, देशाभिमान इत्यादि आधुनिक राजकीय परिभाषा मराठेशाहीच्या काळांत भारतामध्यें कुठेंहि रूढ नव्हती. हा भाषेचा फरक पूर्वनिर्दिष्ट ध्वनीच्या आड येत नाहीं. आज देशाच्या राज्यकारभाराचें स्वरूप पालटलें आहे, पण मराठ्यांच्या अठराव्या शतकांतील पानिपत-प्रसंगाच्या मागची अखिल-भारतीय हिताची प्रेरणा आजसुद्धां प्रादेशिक राज्यांतील जनतेनें व तिच्या भिन्न भिन्न पक्षांनीं आपल्या हृदयांत रुजवून पोसण्याजोगी आहे.

देशांत चालणारे आपसांतले तंटेबखेडे हे घरचे तंटेबखेडे, त्यांचे निकाल आपापसांतल्या तडजोडीनें करतां येतील, देशाबाहेरील परक्याच्या मदतीनें त्यांचा निकाल करून घेणें सर्वांनाच घातक, अशी नीति भाऊसाहेबांच्या पत्रांतून आहे. परंतु रोहिले अब्दालीकडे आधीं गेले. अब्दालीच्या दमदाटीनें शुजादेखील जुलईत अब्दालीचा सहकारी बनला. अलीगोहरला बादशाही आणि शुजाला त्याची वजिरी देण्याविषयीं जी वाटाघाट आधीं शुजा भाऊसाहेबांकडे करीत होता व जिला भाऊसाहेबांचा विरोध नव्हता, ती वाटाघाट शुजानें अब्दालीकडे चालवून तिला संमति घेतली, तेव्हांच शुजा विश्वासघातकी ही खूणगांठ भाऊसाहेबांनीं मनांत बांधली. अब्दालीच्या मनुष्यबळांत शुजानें भर टाकली, तरी अब्दालीच्या वतीनें तो तहाचीं बोलणीं अखेरच्या लढाईपर्यंत करीत होता. अब्दाली भारताच्या सीमेपलीकडे राहावा, अशी भाऊसाहेबांची अट असल्यामुळें हीं तहाचीं बोलणीं वारंवार फिसकटत गेलीं. युद्धांत विजयश्रीनें अब्दालीच्या गळ्यांत माळ घातली. मराठ्यांची फौज धुळीस मिळाली तरी हीं पूर्वींचीं बोलणीं पुनः चालू होऊन ' त्वयार्धं मयार्धं 'च्या न्यायानें संपलीं. अब्दालीनें पानिपतानंतर दिल्लीस जर विशेष कांहीं केलें असेल, तर तें नजीबाला दिल्ली दरबारांत मोठ्या अधिकाराच्या पदावर चढविण्याचें काम केलें. थोडी लूटहि कमावली. ' मी आतां साऱ्या देशाचा स्वामी झालों म्हणून ज्यांना कृपा पाहिजे असेल त्यांनीं माझ्याकडे यावें ' अशी बढाई त्याच्या एका पत्रांत आहे, ती त्याच्या महत्त्वाकांक्षेची सूचक आहे.

परंतु त्याच्या फौजेनें स्वदेशीं जाण्याकरितां दिल्लीस दंगा आरंभला व अफगाणिस्तानांत दोघां जणांनीं ‘ आपणच राजे आहों, अहमदशहा पानिपतास बुडाला ’ अशी घोषणा करून राज्यप्राप्तीचा उद्योग माजविला, त्यामुळें अब्दालीनें स्वदेशाचा रस्ता धरला. पानिपतावर पराजय झाला नाहीं म्हणून अब्दाली हा घरांतल्या बंडाळीला बळी पडण्याचा संभव टळला. नाहींतर तो स्वदेशाला पारखा होऊन ना ‘ अरत्रीं ना परत्रीं ’ अशी दीन स्थिति त्याच्या वांट्यास येण्याची शक्यता होती. श्री. देवळे मानतात त्याप्रमाणें दिल्लीच्या बादशाही तक्तासंबंधांत तो अत्यंत निःस्पृह होता, असें वरील हकीकत पाहतां खरें वाटत नाहीं. काशिराजानें अफगाण शिपायांच्या दंग्याचा उल्लेख केलेला आहे.

मराठ्यांना यथेच्छ रसद मिळाली नाहीं, आणि रसदेच्या अभावीं मराठ्यांचे हाल झाले ही वस्तुस्थिति सहज नाकारण्याजोगी नाहीं, पण त्यांचे किती हाल झाले ? दिल्लीच्या मुक्कामांत अडीच तीन लाख रुपये बुंदेल्याकडून मिळाले. भाऊसाहेबांनीं दिल्लीच्या सिंहासनावरील छत आटवून नऊ लाख रुपये एकदां उभे केले. नंतर त्यांना कुंजपुऱ्यास जी लूट मिळाली तिनें रसदेची उणीव भागवतां आली. पानिपतावरील कोंडींत पैशाच्या अडचणींतून बाहेर पडण्याकरितां ‘ ताटें, वाट्या, चंबू वगैरे सोन्याचे दागिने तोडून मोहरा पाडून लोकांस दिल्या. इभरामखान यास वरचेवर पैका द्यावा लागतो, ’ असें नाना फडणिसानें ता. २८ डिसेंबर १७६० च्या पत्रांत लिहिलें आहे. यावरून गार्द्यांना पैशाची तूट फारशी भोंवत नसावी, असें मानण्याला हरकत नाहीं. महिन्याला सहा लाख रुपये खर्चास हवे, ही भाऊसाहेबांची मागणी लक्षांत घेतां पानिपत युद्धापर्यंतच्या काळांत (एकूण १० महिन्यांत मार्च १५ ते जानेवारी १४) निदान साठ लाख रुपये भाऊसाहेबांच्या हातीं पडावयास पाहिजे होते. तेवढे त्यांस मिळाले नाहींत व त्यामुळें फौजेच्या खर्चाची काळजी त्यांना वाहावी लागली. उपासमारीनें फौजेचीं माणसें व गुरें मेलीं, तरी भाऊसाहेबांची आणि फौजेची उमेद शेवटपर्यंत खचली नाहीं, हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. फडणिसांच्या ज्या पत्राचा हवाला मागें दिला आहे, त्याच पत्रांत ‘ श्रीमंतांचें दैव तर्तूद थोर. ’ (दैव जसें थोर तशी फौजेसंबंधांतील तर्तूद थोर) या पुरुषासारखा दुसरा कोणी नाहीं, ’ असें फडणिसांनीं म्हटलें आहे. त्यानंतर सोन्याचे दागिने तोडून मोहरा पाडल्याची माहिती आहे. ‘ श्रीमंतांचा प्रताप थोर आहे. आपल्या फौजेनें कांहीं त्याची (पठाणांची) सलाबत (धास्ती) खादली नाहीं. सर्व फौज सेर आहे. दररोज

सेपंनास तटें, घोडीं, उंटें, हत्ती आपले लष्कराचे लोक व पेंढारी मारून आणीत आहे. चहूंकडून पेचांत आणिलें आहे. जर मैदान असतें तरी आजपरयंत कधींच घेतला असता. त्याची फौज चालोन येते त्यावर आपले गोळे जातात. थोडे-बहुत राऊत चालोन आले तरी आपले राऊत जातात. लढाई थोडी थोडी होते. शेवटीं आपले त्यांस रगडून माघारे घालवितात. अद्याप त्यांची कांहीं सलाबत बसली नाहीं. आपली सलाबत त्याणीं फार खाली आहे." असा फडणिसांच्या पत्रांत आणखी मजकूर आधीं आलेला आहे. नोव्हेंबरअखेरच्या एका पत्रांत (पेशवे दप्तर २१-१९७) 'श्रीमंत भाऊसारखा अवसानाचा सरदार दुसरा कोणी नसेल.' अशी भाऊसाहेबांची प्रशंसा आहे. त्या पत्राच्या एकच आठवडा आधींच्या बळवंतराव मेहेंदळ्यांच्या पत्रांत 'एक भाऊसाहेबांची हिंमत व लोकांवर उत्तम दृष्टि आहे. येणेंकरून फत्तेच आहे. (इ. सं. ऐ. टिपणें भाग १).

नोव्हेंबराच्या सुरुवातीस दोन्हीकडील सैन्यें लढाईच्या तयारीनें समोरा-समोर ठाण मांडून बसलीं व मराठ्यांनीं अबदालीच्या दळांतील गुरें (उंट, घोडे, बैल वगैरे) आणण्याचा क्रम स्वीकारला. पेशवे दप्तर २१-१९७ (२७-११-१७६०) या पत्राचे लेखक 'आजपावेतों कहीवालियांनीं व गुजात मिळून हजार-बारासें घोडीं, तीन-चारशें उंट व चार हत्ती त्याकडील आली.' राज० १-२६५ या पत्राचा लेखक (५-११-१७६०) म्हणतो-'आमचे सैनिक यवनाचे समक्ष उभे राहून, नित्य शें-पन्नास यवन मारून उंट व घोडीं आणितात. दोन हत्ती पेंढारी यांनीं काल आणिले.' नोव्हेंबर आरंभापासून डिसेंबर मध्या-पर्यंत हा प्रकार चालू होता. राज० १-२६५ च्या लेखकानें अबदालीच्या स्थितीची मीमांसा पुढीलप्रमाणें केली आहे-'अबदाली शहानशहा म्हणवीत होता. त्यानें युद्धें बहुत केलीं आहेत. परंतु दो कोसांवरी येऊन आठ दिवस बसोन कांहीं पराक्रम होत नाहीं. याजमुळें आमची फौज बहुत शेर आहे. अबदालीनें स्वदेशास जावें तरी मार्ग नाहीं; युद्ध करावें तरी परिणाम नाहीं; उगेच बसावें तरी भक्षावयास नाहीं; याप्रमाणें विचारांत पडला आहे.'

डिसेंबरच्या मध्यापर्यंत अबदालीची स्थिति स्पृहणीय नव्हती, असा तर्क करतां येण्याजोगीं ऐतिहासिक प्रमाणें आहेत. वर दिलेले उतारे नोव्हेंबर अखेरपर्यंत त्याच्या छावणींत रसदेची चणचण असल्याचें दर्शविणारे आहेत. त्यानंतर ताबड-तोब त्याची स्थिति सुधारूं लागली, असें म्हणणें चुकीचें ठरेल. बुंदेले लढाईत पडल्यावर त्याला रसद मिळूं लागली, असा निष्कर्ष काढण्याला अवसर देणारीं

विधानें फार्सी साधनांतून पुष्कळ आहेत. त्याच्या सैन्यांतून मराठ्यांचीं पथकें युद्धोपयोगी गुरें आणीत होतीं आणि अब्दालीचे लोक त्यांचा निकरानें पाठलाग करीत नव्हते, या दोन गोष्टींचा विचार केल्यास अब्दालीच्या वाखाणल्या जाणाऱ्या शिस्तीवर व शौर्यसाहसावर बराच प्रकाश पडतो. मराठ्यांनीं गुरें नेण्याचा क्रम ठेवला होता, याबद्दल फार्सी बखरी सामान्यतः मूग गिळून असल्या तरी त्यांच्या फौजेची घासदाण्यासंबंधांत हलाखी होती, अशी कबुली बऱ्याच फार्सी बखरींतून दृष्टीस पडते. भाऊसाहेब धान्यादि पदार्थांची रसद पोंचविणाऱ्या लमाणांना चांगलें द्रव्य देत असत, यामुळें अडचणीच्या वाटांनीं फौजेस लागणारें साहित्य मराठ्यांच्या छावणीला लमाण पुरवीत, असेंहि फार्सी बखरींतून उल्लेख आहेत. सारांश, रसदे-संबंधांत एकट्या भाऊसाहेबांना नांवें ठेवल्यानें अन्याय होतो, एवढेंच या चर्चेच्या द्वारें सुचवावयाचें आहे.

आतां पळणाऱ्या मराठ्यांना वाटेंतील गांवकऱ्यांनीं लुटलें, याचें कारण मराठ्यांनीं ह्या भागांत पूर्वीं केलेला जुलूम, या समजुतीचा विचार होणें अवश्य आहे. पानिपताच्या आसपास जो प्रदेश होता, तेथें जर कोणीं आठवणींत ताजा राहाणारा जुलूम केला असेल, तर अब्दालीच्या सैनिकांनीं केलेला होता. मराठ्यांनीं जाटांवर जुलूम केला, रजपुतांवर जुलूम केला, ही समजूत रूढ आहे. ती बहुतांशीं अयोग्य आहे. निःशस्त्र सैनिकांची पळापळ सुरू झाली कीं, त्यांना गांवकऱ्यांनीं नागवावें, मारावें, हा एक प्रकारें नियमच आहे. त्याचा अंमल पानिपतास पराभव पावलेल्या मराठ्यांच्या वांट्यास आला. अफगाण-रोहिल्यांवर पळण्याची पाळी येती तर तेहि गांवकऱ्यांच्या तडाक्यांतून सहीसलामत सुटले नसते. पूर्वीं केव्हां तरी झालेल्या जुलमाचा सूड म्हणून गांवकरी पळपुट्या शिपायांना लुटतात, मारतात, असा प्रकार नसून दुर्बळांचा द्रव्यलोभानें छळ करण्याच्या स्वाभाविक प्रवृत्तीचा जो परिणाम सर्वत्र अनुभवास येतो, तोच पानिपतानंतर मराठ्यांच्या अनुभवास आला. कित्येक भारतीय इतिहास-लेखकांनीं मराठ्यांच्या या छळाची जी विपरीत पूर्वग्रहानें उपपत्ति लावली आहे, तिचाच अनुवाद विशेष खोलांत न शिरतां क्वचित् केला जातो. मराठे सैनिक पानिपतावर किती खपले असावे, हा एक प्रश्न विचारांत घ्यावयाला पाहिजे. पुष्कळ मारले गेले, कैद झाले, पण पळालेसुद्धां पुष्कळ. शुजानें कित्येक हजारांना वांचविल्याचें काशिराज सांगतो. मल्हारराव आपल्या सर्व सैन्यानिशीं लढाईतून बाहेर पडला; त्याची सेना दहा हजाराइतकी असावी, असें निरनिराळ्या आंकड्यांवरून निघणारें अनुमान आहे. वैरणीच्या अभावीं घोडीं

लढाईपूर्वीच थकलीं होतीं, हें खरें समजावें, तर कित्येक मैल घोड्यावरून पळणाऱ्या एका सैनिकाचें पत्र उपलब्ध आहे; असे आणखी पुष्कळ सैनिक असतील. हा विषय पानिपत-संग्रामाच्या अभ्यासकांनीं चोखाळावा म्हणून अतिशय त्रोटक रीतीनें येथें घेतला आहे. डोंगराळ प्रदेशांत गनिमी कावा चालतो; मैदानी सपाट मुलखांत तोफखान्याचा उपयोग होतो. अफगाण हे डोंगराळ भूमींतले असल्यानें गनिमी काव्यांत तेहि निपुण होते, याप्रमाणें तोफखान्यावर भाऊसाहेबांनीं विश्वास ठेवला, हें अत्यंत योग्य होतें, असा रॉलिन्सन यांनीं काशिराज-बखरीच्या प्रस्तावनेंत आपला अभिप्राय देऊन भाऊसाहेबांची बाजू राखली आहे.

प्रस्तावना लांबली. श्री. देवळे यांच्या पुस्तकांतील पानिपतच्या हकीकतीला ती पूरक व्हावी, या हेतूनें थोडा विस्तार केला. प्रस्तावनेंतले कांहीं संदर्भ श्री. देवळे यांच्या पुस्तकांत आहेत. पुस्तक व प्रस्तावना ताडून वाचणाराला प्रस्तावना ही पुस्तकांतील त्रुटितें दाखविण्यासाठीं नसून कित्येक गोष्टींचें महत्त्व स्पष्टपणें निदर्शनास यावें, म्हणून लिहिल्याचें कळून येईल. पानिपतचा संग्राम हा विषय दोनशें वर्षांमागचा, मराठ्यांकडील साधनें थोडीं आणि अब्दालीच्या पक्षाचीं साधनें विपुल पण पूर्वग्रहदूषित, त्यांच्या आधारें विवेचन करणारांचा आपसांत मेळ नाहीं, यामुळें या संग्रामाचें कथन अविवाद्य होण्याची अपेक्षा बाळगणें योग्य होणार नाहीं. प्रस्तुत पुस्तकापुरतें बोलायचें तर असेंच म्हणावें लागेल कीं, पानिपतच्या संग्रामाची माहिती श्री. देवळे यांनीं ऐतिहासिक साधनांच्या आधारें मनोरंजक रीतीनें लिहून सामान्य वाचकांची चांगली सोय केली आहे.

न. र. फाटक

दोन शब्द

पानिपतच्या नुसत्या स्मरणानेंहि मनाची चलबिचल होते. दुःख आणि अभिमान या भावनांनीं चित्तवृत्ति हेलावतात. दुःख अशासाठीं कीं, या युद्धांत मराठ्यांचा पराभव झाला, फार मोठी हानि झाली. आणि अभिमान अशासाठीं कीं, या तुंबळ युद्धाच्या प्रसंगीं मराठ्यांच्या अंगचें शौर्य, धैर्य, दृढनिश्चय आदि गुण प्रकर्षानें दिसून आले.

पानिपतच्या प्रसंगाशीं संबंधित असणारीं पत्रें, याद्या, बखरी, इत्यादि साधनांची प्रसिद्धि आतांपर्यंत खूपच झाली आहे. या प्रसंगावर आधारित भाऊसाहेबांची बखर, पानिपतची बखर, नाना फडणिसांचें आत्मचरित्र इत्यादि साहित्य प्रकाशित झालें आहे.

कै. वि. का. राजवाडे यांनीं मराठ्यांच्या इतिहासाच्या साधनांचे खंड परिश्रमपूर्वक प्रसिद्ध केले. त्यांत अस्सल पत्रें पुढें आलीं. त्या पत्रांनीं इतिहासामधील गोष्टींच्या सत्यासत्यतेचा निर्णय करण्याचा मार्ग मोकळा झाला. ज्यांनीं पानिपतच्या मोहिमेंत प्रत्यक्ष भाग घेतला, अशांचीं पत्रें कै. राजवाडे यांनीं पहिल्या खंडांत छापलीं. या खंडाच्या प्रसिद्धीनें पानिपतच्या इतिहासास निराळेंच वळण लागलें. बहुतेक अस्सल साधनांचा उपयोग करून कै. गो. स. सरदेसाई यांनीं रियासती लिहिल्या आणि पानिपतच्या प्रसंगांतील गुणदोष-चर्चा केली. श्री. त्र्यं. शं. शेजवलकर यांनीं आपल्या Panipat : 1761 या ग्रंथांतहि पानिपत-प्रसंगाचें मौलिक विवेचन केलें.

हीं सारीं साधनें सामान्य वाचकांच्या आणि प्रौढ विद्यार्थ्यांच्या आवाक्याबाहेरचीं आहेत. म्हणून या साऱ्या साधनांचा अभ्यास करून आणि कोणत्याहि पूर्वग्रहांना मनांत ठाव न देतां ‘ पानिपतचा रणसंग्राम ’ हें पुस्तक लिहिलें आहे.

दि. १४ जानेवारी १९६१ रोजीं पानिपतच्या द्विशताब्दि-स्मृतिदिनास हें पुस्तक प्रकाशित होत आहे हा मी मोठाच योग समजतों. श्री. दा. पां. रानडे यांनीं मला दिलेला उत्साह आणि माझे बंधु चि. कृ. रा. देवळे यांनीं केलेलें साहाय्य यामुळेंच हें पुस्तक इतक्या चांगल्या स्वरूपांत वेळेवर प्रकाशित होत आहे. पुस्तकाचें हस्तलिखित वाचून दिलेल्या सूचनांबद्दल माझे एक स्नेही श्री. रा. चिं. ढेरे यांना मनःपूर्वक धन्यवाद. प्रा. न. र. फाटक यांनीं विवेचक प्रस्तावना लिहून देऊन मला कायमचे ऋणी केलें आहे.

७८ शुक्रवार पेठ, पुणें २.
दिनांक १० जानेवारी १९६१

शं. रा. देवळे

अनुक्रम

☆

पानिपतचा रणसंग्राम

" आपल्यांत दुही पडते,
तेव्हां शत्रूस बळ फावतें ! "

— रघुनाथराव दादा,
१२ जुलै, १७५७.

❁

" सर्वांचें एकचित्त असतें,
तेव्हां कार्य होतें ! "

— गोविंदपंत बुंदेले,
२५ जुलै, १७५९.

(' मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें ' वरून)



सदाशिवरावभाऊ

पुणें येथील राजा केळकर संग्रहांतील हें दुर्मिळ चित्र असून तें अठराव्या शतकांतील एका अज्ञात चित्रकारानें काढलेलें आहे.

'राजा केळकर' संग्रहालयाच्या कृपेनें

: १ :

पानिपतच्या युद्धाचें मूळ

" जिसका दंडा उसका राज " हा तर अगदीं सनातन असा नियम; त्यांत हिंदुस्थानची भौगोलिक रचनाच अशी कीं, कुणीतरी जबरदस्त ताकतवाला मालक असल्यां-शिवाय कारभार नीटनेटका चालणें कठीणच. औरंगजेबापर्यंत दिल्लीच्या मोंगल बादशहांची सत्ता जवळ जवळ देशभर होती. दक्षिणेंतल्या मराठ्यांनीं त्यास विशेष विरोध केला. त्या मराठ्यांना जिंकून घेण्यासाठीं पन्नास वर्षें प्रयत्न करतां करतां शेवटीं औरंगजेबाचाच दक्षिणेंत शेवट झाला.



औरंगजेब

मग दिल्लीच्या मोंगल सत्तेचे बंद तटातटा तुटले. निजामानें दक्षिणचा सुभा पळविला. अयोध्येचे नबाब स्वतःस मालक म्हणूं लागले. बंगाल, गुजराथ, माळवा, रोहिलखंड एका-मागून एक दिल्लीच्या सत्तेच्या जोखडांतून मोकळे झाले.

मराठ्यांनींहि हिंमत धरली, एकजूट केली, ताकत वाढविली, आपला प्रांत सोडवून मोकळा केला. कारभाराची नीट-

नेटकी घडी बसविली. आणि शेवटीं बाळाजी विश्वनाथ पेशवे दिल्लीच्या बादशहाच्या रक्षणासाठीं दिल्लीला फौज घेऊन गेले !


पहिले बाजीराव


त्यांचे चिरंजीव बाजीराव म्हणूं लागले, " दिल्ली हेंच परकीय राज्याच्या झाडाचें खोड. निजाम व इतर केवळ त्याच्या फांद्या ! दिल्लीच्या मुळावरच घाव घातला कीं इतर फांद्या आपोआप गळून पडतील ! " तशी त्यांनीं खटपट केली. यशहि मिळविलें.

आणि छत्रपति शाहू महाराजांच्या पश्चात् बाजीरावाचे चिरंजीव नानासाहेब पेशवे यांनीं दक्षिण हिंदुस्थान व उत्तर हिंदुस्थानभर सार्वभौम सत्ता स्थापन करण्याची वेळ जवळ जवळ आणली.


शाहूमहाराज

दिल्लीचे मोंगल बादशहा म्हणजे " अद्वितीय समृद्धिमान्, किंबहुना पृथ्वीतलाचे ठायीं दिल्लीश्वरो वा जगदीश्वरो वा " अशी त्यांची प्रसिद्धि. त्यांच्याशीं बरोबरीच्या नात्यानें करारनामा करण्याचा अधिकार कोणासच नाहीं, असा त्या काळीं समज होता. पण बाळाजी बाजीराव पेशव्यांचे कारकीर्दींत त्यांची फार विपन्न अवस्था झालेली होती. राज्याचें संरक्षण तर राहोच, पण त्यांचें स्वतःचें रक्षण करण्याचें सामर्थ्यहि त्यांच्यांत शिल्लक नव्हतें. आणि त्यांत सभोंवतालीं दरबारचे अमीर-उमराव, अबदालीसारखे परदेशी छळण्यास–लुटण्यास अगदी टपून बसलेले होते. त्यांतून निभाव लागण्यासाठीं बादशहांनीं पेशव्यांशीं बरोबरीचा तह केला. फर्मान लिहून दिलें :

" राजश्रिया विराजित बाळाजी बाजीराव यांस दिलेल्या उच्च फरमानाची नक्कल–प्रस्तुत राजश्री मल्हारराव होळकर व पादशहाचे दोस्त आणि वीरशिरोमणि जयाजीराव शिंदे यांच्याशीं तह येणेंप्रमाणें केला जातो कीं—



दिल्लीच्या बादशहाचा मराठ्यांशीं बरोबरीचा तह

श्रीमहादेवाची व खंडेरावाची व धर्माची व स्मृतीची शपथ व साक्ष तुम्हां-आम्हांस आहे कीं, आम्ही आमरणान्त तुमची आज्ञा व सेवा व चाकरी व तुमच्या शत्रूचें पारिपत्य करण्याचा मनापासून प्रयत्न करूं. मग तो शत्रु अबदाली असो किंवा दुसरा कोणी राजा असो अथवा एखादा लहानमोठा जमीदार असो. ....पन्नास लक्ष रुपयांपैकीं अबदालीच्या पारिपत्याकरितां तीस लक्ष रुपये आम्हांस पावते झाले व मुलतान, पंजाब, थटा व भकर या सुभ्याची व त्याच्या फौजदारीची व चार महालांच्या साऱ्याची व हिसार, संबळ, मुरादाबाद व बदाऊंचे फौजदारीची चौथ आमच्या सैन्याच्या खर्चाकडे



बाळाजी बाजीराव

लावून दिली आहे.....सुभ्यांचा व फौजदाऱ्यांचा पक्का बंदोबस्त करूं. पातशाही राजेरजवाड्यांचे ताब्यांतील मुलुखापैकीं जुना प्रांत कोणी बळकावला असेल तो त्याच्या ताब्यांतून काढून अर्धा सरकारांत देऊं, अर्धा फौजेच्या खर्चासाठीं आम्हांकडे ठेवूं........आणि अबदाली वगैरेचें पारिपत्य करण्याचे

कामीं आमचाच सल्ला हुजूर ऐकतील तर तें काम आम्ही स्वतःच बजावूं. हुज्जत घालणार नाहीं.........”

या तहाअन्वयें मराठ्यांना—

(१) खर्चासाठीं ५० लाख रुपये मिळाले !

(२) मुलतान, पंजाब, सिंध, राजपुताना, अंतर्वेद—रोहिलखंड या प्रांतांवर चौथाई वसूल करण्याचा हक्क मिळाला.

(३) अजमीर व आग्रा या प्रांतांची सुभेदारी मिळाली.

सर्वांत महत्त्वाचें म्हणजे या करारामुळें मराठ्यांच्या आशा-आकांक्षा, हिंमत खूप वाढली. शिंदे-होळकरांच्या फौजांनीं दिल्लींतच मुक्काम ठोकला ! पेशव्यांना आनंद वाटला. त्यांनीं त्यांचें अभिनंदन केलें :

........“शाबास तुमच्या हिंमतीची व दिलेरी रुस्तुमीची ! तुम्ही एकनिष्ठ कृतकर्मे सेवक या दौलतीचे स्तंभ आहांत ! पहिलीं यशावह कर्मे संपादलींत त्याहून अधिक हें यश संपादिलेंत ! या यशास जोडच नाहीं. इराण-तुराणपावेतों लौकिक झाला......... !”

हो....लौकिक खूप झाला, पण तसे शत्रुहि खूपच झाले ! पठाण अहंमदशहा अबदाली दुराणी चिडून गेला. रोहिले नजीबखान मनांत चडफडत कारस्थानें करूं लागले. रजपूत राजेहि मराठ्यांचा द्वेष करूं लागले ! !

चौथाईच्या पैशाच्या वसुलीसाठीं मराठी फौजा फिरूं लागल्या, तर मराठ्यांचा कांटा काढण्यासाठीं कारस्थानांचीं, द्वेषाचीं चाकें फिरूं लागलीं.

कराराप्रमाणें परदेशी अबदालीस तंबी देण्याचें शिंदे-होळकरांनीं कबूल केलें होतें. त्यासाठीं त्यांनीं पैसेहि उचलले होते. त्यामुळें अबदालीशीं एकदां कडाक्याचा सामना होणार, हें ठरून गेल्यासारखेंच होतें—अगदीं इ. स. १७५२ सालापासून !

☆ ☆ ☆

: २ :

राघोबाची पहिली स्वारी

" **प्रपंचीं** पाहिजे सुवर्ण "........एका घराच्या प्रपंचासाठीं जर सुवर्णाची जरूरी, तर मग राज्याचें तर विचारावयासच नको. त्यांतून मराठी राज्याच्या सीमा लांबवर वाढलेल्या. बादशहा व त्याच्या मुलुखाच्या बंदोबस्ताची व संरक्षणाची जबाबदारी वाढलेली. त्यासाठीं पदरची पागा, फौज हीहि वाढलेली. या सर्वांसाठीं पैसा हवाच हवा ! पैसा नसेल तर त्याचें सोंग थोडेंच घेतां येणार ? सावकारांचीं कर्जें होतीं—तीं फेडून होईपर्यंत अन्न कसें गोड लागणार ? पण पैसा कांहीं घरांत बसून पिकत नाहीं. त्यासाठीं पराक्रम-परिश्रमच हवे !



राघोभरारी

आणि सन १७५२ मध्यें बादशाही बडें फर्मान मिळून परिश्रम करण्यास, पैका मिळविण्यास मोठें क्षेत्र निर्माण झालेलें होतें. अगदीं अटक-पंजाबपासून काशीपर्यंत चौथाई वसूल करावयाची होती. आग्रा-अजमीर सुभेहि घ्यावयाचे होते. म्हणून पेशव्यांनीं रघुनाथराव यांस उत्तरेस रवाना केलें. सखारामबापू, चिंतो विठ्ठल, नारो शंकर, विठ्ठल शिवदेव हे त्याजबरोबर होते. रस्त्यांत त्यांना दत्ताजी शिंदे, जयाप्पा शिंदे, मल्हारराव होळकर, बुंदेले सैन्यासह येऊन मिळाले.



सखारामबापू

आग्रा प्रांतावर कबजा होता जाटांचा, तर अजमीर मारवाडी रजपुतांच्या ताब्यांत होतें. दोघेहि आपआपल्या ठिकाणीं पक्के बसलेले होते. बादशहाचा अंमल नांवापुरताच होता. जाट व रजपूत यांना झगडून नरम केल्याखेरीज प्रांत मुळींच मोकळे होणार नव्हते. आणि म्हणूनच हीं कामें सोपीं नव्हतीं.

रघुनाथराव ऊर्फ दादासाहेब पेशवे फौजेसुद्धां आलेले. उगाच झगडा



सुरजमल जाट

करून सरंजामाची खराबी करावयास नको म्हणून सुरजमल जाट यांनीं तहाचें बोलणें लावलें. स्वतःला यादवकुलोद्भव समजणारा, चांगलें सैन्य, सामान, किल्ले बाळगून असणारा जाट ' चाळीस लक्ष रुपये देतों ' म्हणून शरण आला. पण मल्हारराव यांच्या सल्ल्यामुळें रघुनाथराव हट्टास पेटले व त्यांनीं एक कोट खजिन्याची मागणी केली.

जाटानें आपला बंदोबस्त केला व तो कुंभेरीच्या किल्ल्यावर जाऊन राहिला. त्यानें बंदुकीच्या पांच गोळ्या व दारू पाठवून कळविलें कीं, ' चाळीस लाख रुपये देतों, ते घेणें. नाहीं-तर युद्ध ! '

झालें ! कुंभेरीला मोर्चे लागले. वेढे बसले. पण पाडाव होईना ! गड येईना ! ! त्यांत दुर्दैवानें मल्हारराव होळकर यांचा मुलगा खंडेराव मोर्च्यांत तोफेचा गोळा लागून ठार झाला. मल्हारराव यांना तो एकटाच मुलगा. त्यांना अतिशयच शोक झाला. ते केवळ बेमान झाले. चिडून त्यांनीं प्रतिज्ञा केली.

" सुरजमल जाटाचा शिरच्छेद करीन ! कुंभेरीची माती खणून यमुनेंत टाकीन ! "

ही प्रतिज्ञा ऐकून जाट घाबरले. त्यांनीं जयाप्पा शिंदे यांचेमार्फत पेशव्यांकडे तहासाठीं बोलणें लावलें. इकडे मल्हाररावांकडे दुखवटा पाठविला ! सखारामबापू व इतर कारभारी मंडळींनीं ' तह करावा ' असाच सल्ला दिला. मल्हारराव " तुम्ही खावंद आहां, ज्यास धन्याची मर्जी राजी त्यास आम्ही राजी, " असें रघुनाथराव यांना म्हणाले. शिंद्यांच्या मदतीनें तह झाला. तीस लाखांची खंडणी ठरली ! तीहि तीन वर्षांत घ्यावयाची ! ! प्रथम चाळीस लाख देत होते. लढाईंत नुकसान झाली. आणि शेवटीं प्राप्तिहि गेली ! मोहीम संपली. पण शिंदे-होळकर यांच्या मनांत एकमेकांबद्दल वैमनस्य निर्माण झालें. जाटांच्या मोहिमेपेक्षां हेंच मोठें नुकसान झालें.

कुंभेरीहून दादासाहेब मथुरेस गेले. होळकर शिकंदराबाद-दिल्लीकडे गेले. जयाप्पा शिंदे यांचें लक्ष्य अजमीर होतें. ते मारवाडांत गेले.... जसे अगदीं ज्यांच्या मनांत येईल तिकडे....!! इकडे पुण्याहून पेशव्यांचीं सारखीं पत्रें येत होतीं.....

"हिंदुस्थानांतून एकदां चाळीस-पन्नास लक्ष यावे. येतांच कर्ज वारावें....एवढा क्षयरोगासमान कर्जरोग दूर जालिया उत्तम आहे.....!"

आग्र्यानंतर अजमीर! अजमीर म्हणजे रजपुतांचा अगदीं बालेकिल्लाच होता. आग्र्याप्रमाणें त्यावरहि बादशहाचा कारभार फक्त नांवापुरताच होता. कुंभेरीहून जयाप्पा अजमीर प्रांतांत आले. त्यांच्या अजमीर, मेडतें व इतर ठिकाणीं रजपुतांबरोबर लढाया झाल्या. त्यांचा पराभव होऊन पळून ते नागोरच्या ठाण्यांत जाऊन बसले. राजपुतान्यासारख्या प्रांतांत अन्नपाणी-सामान मिळवून मोहीम चालविणें कठीण, त्रासाचें होतें. राजपुताना जिंकणें इतकेंसें सोपें नव्हतें. पण जयाप्पा हट्टाला पेटले. त्यांनीं ईर्षेनें लढाई चालविली.



जयाप्पा शिंदे

शिंद्यांचा जोर पाहून रजपुतांनीं कपटयोजना केली. तहाचें बोलणें करण्याकरितां वकील पाठविला व त्याच्याबरोबरच मराठी वेषांत मारेकरी पाठवून जयाप्पांचा खून केला! दगा झाला!

दत्ताजी शिंदे, जनकोजी शिंदे चिडून लढूं लागले. अंताजी माणकेश्वर व समशेरबहाद्दर शिंद्यांच्या मदतीस आले. रजपुतांचा सडकून पराभव झाला. फौजांनीं प्रदेश उजाड झाला. दाणा-वैरण मिळेना. रजपूत टेकीस येऊन तह झाला. त्यामुळें (१) अजमेर, झालोर शिंद्यांकडे आलें. (२) पन्नास लाख रुपये दंड मिळाला! किरकोळ भांडणें मिटवून व पैसे वसूल करून शिंदे उज्जयिनीस परतले.

अजमीरच्या स्वारींत दोन वर्षें खर्च झालीं. जयाप्पा गमावले. वेळेअभावीं प्रयाग, अन्तर्वेद इकडील मुलूख सोडविण्याचीं किफायतशीर कामें तशींच

राहिलीं. कुंभेरी व मारवाडच्या मोहिमांमुळें शिंदे-होळकरांचें आपसांत वितुष्ट फार आलें. " सोबत्याशीं तिळमात्र प्रपंच न करणें " इथपर्यंत त्याची अवस्था गेली !

शिवाय राजपुतान्यांतील हिंदु राजे यांना मराठ्यांचा वीट आला. मराठ्यांच्या लष्करी शक्तीपुढें जरी त्यांचा निभाव लागला नाहीं, तरी त्यांच्या मनांत मराठ्यांविषयींचा द्वेष मात्र सदोदित प्रज्वलित राहिला. तो इतका कीं, पुढें " परदेशी अबदालीचें पारिपत्य करूं, साहाय्यास या, " असें सुचवूनहि ते पुढें आपआपल्या ठिकाणीं स्वस्थ बसले !

एकूण मोहिमेंत पैसा मिळाला नाहीं, तो नाहींच !

☆ ☆ ☆

: ३ : नजीबखान आणि अबदाली

हिंदुस्थानच्या वायव्य सरहद्दीपलीकडे अफगाणिस्थान आहे. तेथील मुलूख डोंगराळ, ओसाड, नापीक. त्यामुळें उत्पन्नाच्या दृष्टीनें शून्यच ! सुबत्ता नसल्यानें नशीब काढण्यासाठीं अफगाण पठाणांचे तांडे हिंदुस्थानांत येत. आडदांड-धष्टपुष्ट शरीरें व धाडसी मनोवृत्ति बरोबर घेऊन ते दिल्लीच्या बाजूला जात. तिथें होतें मोंगलांचें राज्य. सैन्यांत अफगाण पठाणांना वाव मिळावयाचा. खाणेंपिणें, मौज व काम याला कांहीं तोटा नव्हता. मग आलेल्यांतील फारच थोडे परत जात.

याच क्रमाला अनुसरून बंगश हिंदुस्थानांत आले व स्थायिक झाले ! रोहिले हिंदुस्थानांत आले, तेहि इथेंच स्थिरावले ! बंगश, रोहिले हीं अफगाणिस्थानामधील खोऱ्यांच्या नांवांवरून पडलेलीं नांवें निरनिराळीं असलीं तरी ते सर्व अफगाण पठाणच.

रोहिले हिंदुस्थानांत आले आणि कटेहरला वस्ती करून राहिले; त्यांच्या तेथील वस्तीमुळें कटेहरला म्हणूं लागले रोहिलखंड !

या रोहिलखंडांत अली महंमदखान हा रोहिल्यांचा सरदार होता. त्याच्या पदरीं नजीबखानाचा चुलता नोकरीस होता. स्वतःचा जम बसल्यावर त्यानें नजीबला इकडे बोलावून घेतलें. छोटा नजीब इकडे आला आणि अली महंमदखानाच्या सैन्यांत साधा जमादार म्हणून नोकरीस राहिला. त्याला लिहितां वाचतां येत नव्हतें, कीं राजकारणहि कळत नव्हतें. त्याच्याजवळ फक्त धडधाकट शरीर, खंबीर मन, धाडस, प्रसंगावधान व चलाखपणा होता. वरिष्ठाचा, मालकाचा रागरंग पाहून बदलण्याची कला मात्र त्याला चांगली अवगत होती.


नजीबखान

अंगच्या गुणांवर नजीब चढत चढत चालला. त्याची हुशारी, तसेंच त्याच्या ठिकाणीं असणारा पठाण-रोहिल्यांचा स्वाभिमान पाहून अली महंमद-खानाकडेच असणाऱ्या दुंदेखान नांवाच्या रोहिल्या सरदारानें आपला मुलगी नजीबखानाला दिली व त्यास जांवई करून घेतलें. जांवयाची प्रतिष्ठा वाढावी म्हणून त्यास गंगेच्या पूर्वेकडील, चंदपूर, नगिना, शेरकोट, पिंजार वगैरे परगणे दिले. त्यामुळें नजीब आतां उमराव झाला.

नजीब आतां नजीबखान झाला ! नजीबखानाचे अंगीं कडवेपणा फार होता. दिल्लीच्या नाकर्त्या, विलासी सुस्त बादशाहाबद्दल त्याला तिटकारा वाटे. काफर मराठ्यांशीं दोस्ती करून बादशहाचे बडे वजीर म्हणून मिरविणाऱ्या वजिराबद्दल त्याला तिरस्कार वाटे; आणि मराठ्यांचा तर तो अत्यंत द्वेष करी.

इ. सन. १७५३ मध्यें मराठयांच्या पाठिंब्यावर शिरजोर बनलेले वझीर सफदजंग व बादशहा यांच्यामध्यें बेबनाव झाला; तेव्हां मोठ्या धैर्यानें त्यानें बादशहाची बाजू घेतली. युद्धांत बहादुरी केली. ती पाहून खूष होऊन बादशहानें त्यास सहराणपूरचा परगणा बक्षीस दिला व पुन्हा वेळ पडेल तेव्हां मदत करीन, म्हणून त्याजकडून कुराणाची शपथ घेवविली ! साधा नजीबखान आतां बादशाही उमराव झाला. बादशहा व त्याच्या बेगमांकडे त्याची मोठी पत झाली.

दिल्लीच्या बादशाहीवर मराठ्यांचा जोर जास्त! बादशहा नांवाचे मालक आणि वजीर मराठ्यांच्या तंत्रानें चालणारे! त्यांच्या जोरावर प्रत्यक्ष बेगमांवर हुकुमत चालवूं लागलेले. बेगमांना खर्चासाठीं पुरेसे पैसे सुद्धां मिळेनासे झाले. या सर्वांची नजीबखानाच्या मनास टोचणी लागली. पण या सर्वांचा बंदोबस्त करून सत्ता आपल्या हातीं घेण्याइतकी शक्ति त्याला नव्हती व त्याची कुवताहि कमी पडली असती.

सरळ गोष्ट जमत नाहीं, असें पाहून कपटानें कांटा काढावयाचा, असें त्यानें ठरविलें. कारस्थानें सुरू केलीं. नाखूष बेगमांचा पाठिंबा मिळविला. मराठ्यांच्या जुलमानें दुखावलेले रजपूत आपल्या कटांत ओढण्याचा प्रयत्न केला. अयोध्येचे नबाब शुजाउद्दौला यांच्याशीं गुप्त वाटाघाटी केल्या. सर्वांनीं मिळून कट केला व इ. स. १७५६ सालीं रघुनाथराव, मल्हारराव व शिंदे कुंभेरी-मारवाडांतून दक्षिणेंत परत जातांच अफगाणिस्थानचा बादशहा अहमदशहा अबदाली दुराणी यास सैन्यासह दिल्लीला बोलावलें. या कामासाठीं त्यानें आपला भाऊ सुलतानखान यास खास काबूलला पाठविलें.

इकडे अहंमदशहा अबदाली यासहि तेंच हवें होतें. त्याला दिल्लीच्या भांडणाशीं, राजकारणाशीं कांहीं एक कर्तव्य नव्हतें. त्याला हवी होती लूट. पैसा, सोनें व मौल्यवान् हिरेमोती! मागें त्यानें दोन स्वाऱ्या केल्या होत्या, पण त्या इतक्या किफायतशीर झाल्या नाहींत. अफगाणिस्थानच्या डोंगराळ, वैराण मुलखांत त्याला मिळकत फारशी नव्हती. तिथें सुबत्ता नांदावी म्हणून हिंदुस्थानांतील पंजाबपर्यंतचे सुभे आपल्या राज्यास जोडावे असेंहि त्यास वाटे.


नादिरशहा

अहंमदशहा अबदाली इ. सन १७२४ सालीं जन्मला. अवघ्या तेराव्या वर्षी त्यानें नादिरशहाच्या फौजेंत नोकरी धरली. नादिरशहा हा स्वाऱ्या-शिकाऱ्या व लुटालुटीचा हौशी! त्याच्याबरोबर अहंमद अबदाली अनेक स्वाऱ्यांत वावरला; दिल्लीलाहि नादिरशहाबरोबर येऊन गेला.

या सर्वांमुळें शौर्य, साहस, योजकता, महत्त्वाकांक्षा या सर्वांची वाढ त्यांच्या अंगीं खूप

झाली. प्रत्यक्ष अनुभवानें युद्धकलेचा अभ्यास, व्यासंग झाला ! तो इतका कीं, अहंमदशहा अगदीं तरबेज योद्धाच झाला ! नादिरशहाचा क्रूरपणाहि त्याच्यांत पुरेपूर उतरला !

नादिरशहाचा खून झाला ! अबदालीला स्फुरण चढलें. काबूल, कंदाहर व पेशावर हे प्रांत ताब्यांत घेऊन काबूलला स्वतंत्र राज्य स्थापून स्वतःच्या नांवाचीच द्वाही त्यानें फिरविली. त्यानें चांगली फौज तयार केली !

तोच आली संधि. नजीबखानाचे निरोपावर निरोप येऊं लागले— " मराठयांनीं दिल्ली बटकी केली ! वजीर स्वार्थासाठीं काफरांच्या सल्लयानें वागतात ! बादशहा नामर्द झाले ! बेगमा खर्चासाठीं लाचार झाल्या ! तरी तांतडीनें यावें ! "....

जें हवें तेंच वाढून आलें ! सैन्याला तयारीचे हुकूम सुटले. अफगाणांना स्फुरण आलें ! विलंब न लावतां ते दिल्लीकडे दौडत निघाले. खैबरखिंड ओलांडून अलगद हिंदुस्थानांत उतरले. जसें माडीवरून खालीं उतरावें तसेंच.

पंजाबांत वजिरानें नेमलेला अदिनाबेग सुभेदारी करीत होता. त्यास हाकून देऊन २२ जानेवारी १७५६ ला खुद्द दिल्लीला अबदालीनें धडक दिली. रस्त्यांत कुठें लढाई नाहीं, विरोध नाहीं. नजीबखान सैन्य घेऊन त्यास सामील झाला.

इकडे दिल्लींत मोठी गडबड उडाली. जीव, अब्रू, द्रव्य, मौल्यवान् वस्तु घेऊन लोक दिल्लींतून पळून जाऊं लागले. सर्वत्र घबराट पसरला.

दिल्लीला मराठयांचे अंताजी माणकेश्वर होते, पण त्यांच्याच्यानें निभाव लागला नाहीं. कारण सैन्य, सामान थोडें होतें. वजिराची फौज पगारासाठीं त्याच्यावर उलटली ! खजिन्यांत पैसा नव्हता. हातांत शक्ति नव्हती. वजीर गाजीउद्दीन सरळ उठला आणि अबदालीला शरण गेला. अबदालीस त्याचा बेसुमार राग आला. त्यानें वजिराची खरडपट्टी काढली, " एवढे मोठे वजीर होऊन राजाच्या रक्षणासाठीं बंदुकीचा एकहि बार न काढता शरण येतां. केवढी शरमेची गोष्ट ही ! आतां एक कोट रुपये द्या ! "



अब्दालीनें दिल्ली लुटली.

पण वजिराजवळ पैसा मुळींच नव्हता. त्यामुळें त्याचें कांहीं चाललें नाहीं. अबदालीनें दिल्लींत प्रवेश केला. स्वतःच्या नांवानें द्वाही फिरवली. आणि मग गरिबांपासून अमिरापर्यंत सर्वांकडून पैसा उकळण्याचा तडाखा लावला. खूप माणसें मारलीं. दहशत बसविण्यासाठीं मुंडक्यांचे ढीग रचले! रस्त्यारस्त्यांवर प्रेतें पडलीं!

नजीबखानाच्या कटांतली दुसरी व्यक्ति मुघलानी बेगम! तिनें दिल्लींतील पैसेवाल्यांची खडान् खडा माहिती अबदालीस दिली. त्या माहितीच्या आधारें खणत्या लावून द्रव्य काढण्यांत आलें.

पैशाची लूट संपल्यावर अब्रूची लूट सुरू झाली. स्त्रिया बाटवून आपल्या घरांत घातल्या.... "बहुत स्त्रिया भ्रष्टल्या! कित्येकांनीं प्राण दिले. शहाजाद्या होत्या त्यांचे विवाह आपल्या लोकांशीं करून दिले.... पातशहाच्या व शहाजाद्यांच्या बायका निका पढवून आपल्या घरांत घातल्या....!"

असा कहर २० फेब्रुवारीपर्यंत झाला. मग नजीबखानाला घेऊन अबदालीनें मथुरेस फौज पाठविली. तिथेंहि दिल्लीप्रमाणें कत्तल, लूट झाली. स्त्रियांचे धिंडवडे निघाले. मथुरा-वृंदावनाला क्षेत्राची वस्ती, देव-देवळांची गर्दी! मूर्तींवरहि वक्रदृष्टि वळून त्यांनीं मूर्ति फोडून लाथांनीं तुडविल्या.

एवढेंच नव्हे तर गोकुळ-वृंदावनास नागे बैरागी यांच्याशीं युद्ध झालें. दोन हजार बैरागी मेले, पण मरतां मरतां त्यांनीं लढून दोन-अडीच हजार पठाणहि मारले ! आग्रा-झांशी—सर्वत्र लुटालूट झाली.

इकडे उन्हाळा आला. यमुनेला पाणी थोडें होतें. कत्तलीमुळें, घाणीमुळें अबदालीच्या सैन्यांत महामारीचा रोग सुरू झाला. अफगाणिस्थानच्या थंड प्रदेशांत राहणाऱ्यांना दिल्लीचा उन्हाळा त्रासदायक वाटूं लागला. ह्या सर्व प्रकाराचीं बातमी-पत्रें पुण्यास येत होतीं :

" सर्व अनर्थास मूळ नजीबखान आहे. त्याची नजर मोठी कीं, पठाणाचें राज्य व्हावें. आपण सर्व कारभार करावा. पादशहा नांवास कोणीहि असावें ! ...."

पेशव्यांनीं या अनर्थास पायबंद घालण्यासाठीं रघुनाथराव पेशवे व मल्हारराव होळकर यांना रवाना केलें.

मराठ्यांच्या हालचालींच्या बातम्या ऐकून व हवें असलेलें लुटीचें काम मनाप्रमाणें झाल्यानें, अबदाली मोर्चे उठवून परत फिरला. नजीबखानाशीं संगनमत करून त्याला आमंत्रण देणाऱ्या बेगमांना त्यानें जबरदस्तीनें आपल्याबरोबर नेलें. दिल्लीच्या पैशाअडक्याची बातमी देणाऱ्या मुघलानी बेगमेच्या तोंडास त्यानें चांगलींच पानें पुसलीं. तिच्यावर लाहोरांत भीक मागण्याची पाळी आली.

परत जातांना त्यानें पंजाबच्या सुभ्यावर आपला मुलगा तैमूरशहा यास नेमून व सरदार जहानखानास त्याच्याबरोबर ठेवून तो त्वरेनें परत गेला !

वित्त, चित्त आणि अब्रु गेलेले प्रजाजन क्रूरपणाच्या, दुःखाच्या आठवणींनीं हतबल होऊन, कंगाल होऊन बसले !

☆ ☆ ☆

: ४ :

अटकेवर झेंडे

इ. स. १७५० पासून हिंदुस्थानच्या राजकीय पटांगणावर एक अटीतटीचा हुतुतूचा सामना चाललेला होता. एका बाजूचा कर्णधार अहंमदशहा अबदाली आणि त्याच्या संघांत नजीबखान रोहिला व त्याचे साथीदार, शुजाउद्दौला, दिल्लीच्या बादशहाच्या असंतुष्ट बेगमा व असंतुष्ट अमीर-उमराव होते. दुसऱ्या बाजूला मराठ्यांच्या तर्फे रघुनाथराव, त्यांच्या संघांत दिल्लीच्या बादशहाचे वजीर, सुरजमल जाट, शिंदे, होळकर व इतर मराठे सरदार होते.

मोठी सनद घेऊन बंदोबस्त करण्यास व खंडणी वसूल करण्यासाठीं मराठे आले व थोडाफार कार्यभाग साधून १७५६ मध्यें परत दक्षिणेंत गेले. मराठ्यांची पाठ फिरते न फिरते तोंच पंजाबची सीमापाटी ओलांडून अहमदशहा अबदाली आला. दिल्ली, आग्रा, मथुरा व आसपास त्यानें जाळपोळ, लुटालूट, कत्तल यांचा धडाका उडविला.

तोंच त्याचा बंदोबस्त करण्यास दक्षिणेंतून रघुनाथराव निघाले. निघाले जोरांत, पण इंदूरला येऊन थबकले. कारण त्यांच्याजवळ पुरेसा पैसा व फौज नव्हती. ते तांतडीनें अबदालीच्या बंदोबस्तास दिल्लीस गेले नाहींत. इंदूरहून त्यांनीं पेशव्यांना लिहिलें : " अबदाली आल्यामुळें पैसा मिळावयाची सोय दिसत नाहीं. त्याचें पारिपत्य करावें, तर फौज जमा नाहीं. तूर्त पंधरा हजार फौज आहे. जास्त जमल्याशिवाय जातां येत नाहीं. अबदाली पुढें चालून आला तर गांठ पडेल. "

अहमदशहा अबदाली दुराणी दिल्लीहून मथुरा-आग्ऱ्यापर्यंत आला. (ता. १४-२-१७५७) तेथून तो पुढें कशाला येईल ? इतक्या थोड्या मुलुखांत त्यास भरपूर लूट मिळाली होती. उन्हाळा सुरू झालेला होता, तो सोसवत नव्हता. सैन्यांत महामारी सुरू झालेली होती. त्यांत जास्त थांबावें किंवा दक्षिणेकडे यावें, तर मराठ्यांशीं लढण्यांत अडकून पडावें लागणार. असा विचार करून तो माघारीं फिरला व एप्रिल १७५७ मध्यें परत अफगाणिस्थानांत पोहोंचला.

परत जातांना त्यानें गाजीउद्दीन यास दिल्लीला वजीर नेमलें व नजीबखान यास बक्षीगिरी दिली. दोघांत त्यामुळें चढाओढ लागली.

इकडे रघुनाथराव रजपूत, जाट यांच्याकडून खंडण्या वसूल करून व फौजेची तयारी करून जून १७५७ मध्यें दिल्लीला निघाले.


त्यापूर्वींच अहमदशहा अबदाली परत गेला असल्यानें त्याच्याशीं लढण्याचें काम आपोआपच संपलें होतें. दिल्लीचा ताबा घेऊन नजीबखानाचा बंदोबस्त करावयाचा होता. दिल्ली होती नजीबखानाकडे. " नजीबखान व अबदाली दोन नाहींत.लाहोरांत अबदालीचा पुत्र व दिल्लींत नजीबखान एकविचारें वर्ततात ! " यासाठीं नजीबखानाला साफ उखडून टाकावयाचें, असें रघुनाथरावांनीं ठरविलें.

अंताजी माणकेश्वर यांना त्यांनीं अंतर्वेदींतील नजीबखानाचा मुलूख घेण्यास पाठविलें. इकडे विठ्ठल शिवदेव विंचूरकर यांनीं दिल्लीला मोर्चे लावले. दहा दिवसांत दिल्ली शरण आली आणि त्याबरोबरच कपट-कारस्थानें खेळविणाऱ्या ' खळ्या ' नजीबखानाला विठ्ठल शिवदेवांनीं पकडलें !

त्याला ठार मारून कांटा काढावा, असा रघुनाथराव विचार करीत होते. वजीर गाजीउद्दीनाहि त्यांना तसेंच सुचवीत होता. आतां आपला निभाव लागत नाहीं, असें पाहून नजीबखानानें आपलें धोरण बदललें. तो गयावयां करूं लागला. त्यानें मल्हारराव होळकर यांच्याकडे संधान बांधलें. मल्हाररावांचें रघुनाथराव यांच्यावर खूप वजन आहे, हें नजीबखानास चांगलें माहीत होतें. " नजीबखान राव मल्हारजीला आपले बाप म्हणून म्हणतात, व स्नेहाचा राबता दृढ करीत आहेत. त्यांनीं आपला मामला अंतःस्थ रीतीनें बहुतेक फैसला करून घेतल्यासारखा आहे. श्रीमंत दादासाहेबांचें लक्ष खान-मजकुराचे दुटप्पी वर्तनाकडे गेलें आहे. राव मल्हारजी यांची मुलाखत झाल्यावर याबद्दल खलबत होणार आहे."

तशीं खलबतें खूप झालीं. " नजीबखान अर्धा अबदाली, त्याचें राजकारण न करावें, " असें पेशव्यांनींहि सांगितलें.

पण हें न ऐकतां मल्हारराव होळकर यांनीं नजीबखान आपल्या कामास उपयोगी होईल, त्यास मारूं नये, अशी भीड घातली व शेवटीं रघुनाथरावांनीं मल्हाररावांचें बोलणें मानून, " मी पुन्हा दिल्लीच्या भानगडींत पडणार नाहीं, " असें नजीबखानाकडून लिहून घेऊन त्यास सोडून दिलें.



रघुनाथरावांनीं अटकेवर झेंडे लावले !

सापाला सोडल्यासारखें अनेकांना वाटलें. नजीबखान मोठ्या नाखुषीनें, पण जळफळत–मनांत मल्हारराव होळकर यांना दुवा देत दिल्ली सोडून आपल्या प्रदेशाकडे गेला. त्याचा प्रदेश मराठ्यांनीं लुटून घेतला. नजीबखान गंगा ओलांडून जातांच अंतर्वेदींतील त्याच्या प्रदेशांत मराठ्यांचीं ठाणीं बसलीं. इकडे दिल्लीचा बंदोबस्त रघुनाथरावांनीं वजीर गाजीउद्दीन याच्या मदतीनें केला.

इकडे पंजाबमध्यें शीख व बादशहाचा सरदार अदिनाबेग हे दोघे अबदालीचा मुलगा तैमूरशहा व सरदार जहानखान यांच्याशीं लढत होते. त्यांना मराठ्यांची मदत हवी होती. त्यांनीं मराठ्यांना मदतीबद्दल रोज एक लाख रुपये व मुक्काम पडला तर अर्धा लाख रुपये कबूल केले.

मानाजी पायगुडे यांच्या नेतृत्वाखालीं मराठी फौज पंजाबमध्यें आली. अबदालीचा मुलगा व सरदार हे त्यांची दहशत खाऊन लढाई न करतांच पळून गेले. मराठे पाठलाग करीत आले. पण मध्यें चिनाब नदी लागली. तिचें पाणी खूप खोल व गार. शिवाय नदी ओलांडण्यास नावाहि नव्हत्या. म्हणून मराठ्यांच्या फौजा थांबल्या. नदीअलीकडे मराठ्यांना अबदालीच्या मुलाची राहिलेली संपत्ति, जड सामानसुमान व लूट मिळाली. तुकोजी होळकर, साबाजी शिंदे, पायगुडे यांनीं अटकेपर्यंत प्रदेश हस्तगत करून

अटकेवर मराठ्यांचा झेंडा रोवला. यापूर्वी दिल्ली ओलांडून मराठी फौजा आलेल्या नव्हत्या. भीमा–कृष्णेच्या कांठचे घोडे अटकेचें पाणी प्याले ! पराक्रमाची कीर्ति पार इराण-तुराणपर्यंत गेली !

रघुनाथरावांची ही अटकेपर्यंतची स्वारी म्हणजे मराठ्यांच्या पराक्रमाचा कळस झाला ! लष्कराची लूट मिळून चंगळ झाली. प्रत्यक्ष पेशव्यांना मात्र रघुनाथरावांच्या भोळ्या वागणुकीमुळें सुमारें एक कोट रुपये कर्जच झालें ! पंजाबांतून मुलाची हकालपट्टी झाल्यामुळें अहमदशहा अबदाली मात्र चिडून गेला.

पंजाब म्हणजे दिल्लीचें दारच. त्याचा बंदोबस्त ठीक तर दिल्ली सुरक्षित ! तिथें बंदोबस्तासाठीं चांगला मातबर पुरुष हवा होता. पण होळकरांनीं ती जबाबदारी टाळली. शिंदे दक्षिणेंत होते. तेव्हां रघुनाथरावांनीं पंजाबच्या सुभ्याचा माहीतगार असणारा बादशाही सरदार अदिनाबेग याच्याकडे तेथील कारभार सोपवला. मदतीसाठीं कांहीं फौज दुय्यम सरदारांच्या हाताखालीं ठेवून ते दिल्लीकडे निघाले.

इतके दिवस दिल्ली व दिल्लीच्या सभोंवतालच्या प्रदेशांत प्रत्यक्ष वावरल्यामुळें रघुनाथराव यांना दिल्लीकडच्या राजकारणाची चांगलीच माहिती झालेली होती. कारस्थानें कशीं रंगतात, राजकारणें कशीं चालतात, शत्रु कोण, मित्र कोण, हेंहि त्यांना चांगलें दिसलें होतें. अटकेपर्यंत मराठी फौज जाऊन दौड मारून आल्यामुळें मराठी फौजेचा लौकिक चांगलाच झालेला होता; तेव्हां त्यांनीं दिल्लीसच पाय रोवून राहावें व शिल्लक राहिलेल्या गोष्टींचा पूर्ण बंदोबस्त करावा, अशी वजीर गाजीउद्दीन व इतरांची इच्छा होती. पण ती बाजूला सारून रघुनाथराव दक्षिणेंत पुण्यास व मल्हारराव इंदूरला गेले.

हुतुतूच्या सामन्यांतील एका पार्टीचा भिडू हुतुतू घालून पुन्हा आपल्या पार्टींत परत आला.

☆ ☆ ☆

: ५ : बचेंगे तो और भी लडेंगे !

रघुनाथराव पुण्यास आल्यावर त्यांनीं सर्व हकीकत पेशव्यांना सांगितली. पाताळयंत्री नजीबखान मोकळा राहिल्यामुळें तो सर्व गोष्टी बिघडवून टाकील, याबद्दल पेशव्यांची खात्री होती. म्हणूनच दत्ताजी शिंदे यांना उत्तरेंत पाठवितांना पेशव्यांनीं त्यांना चार कामगिऱ्या सांगितल्या—

(१) नजीबखानाचें पारिपत्य करावें.

(२) दिल्ली, लाहोर, पंजाबचा चांगला बंदोबस्त करावा.

(३) कर्ज निवारण्यासाठीं पूर्वेस बंगालपर्यंत स्वाऱ्या करून खंडणी मिळवावी.

(४) काशी, प्रयाग व इतर पवित्र क्षेत्रें मुसलमानांच्या ताब्यांतून सोडवून मोकळीं करावीं.

जनकोजी शिंदे व दत्ताजी शिंदे पेशव्यांशीं एकनिष्ठपणें वागणारे शूर वीर होते. ते आपल्या पराक्रमावर वरील कामें उरकतील, यांत शंकाच नव्हती.

मल्हारराव होळकर यांना मात्र नजीबखानाचें फार फार प्रेम होतें ! नजीबखान म्हणजे त्यांचा मानलेला पुत्रच ! त्यांचा स्वतःचा एकुलता एक मुलगा वारल्यामुळें कीं काय कोण जाणे, नजीबखानावर त्यांची ममता होती हें मात्र खरें. त्याचें पारिपत्य न करतां त्याचा उपयोग करून घ्यावा, असें त्यांचें मत होतें.

शिंदे मंडळींच्या मनांत मल्हाररावांबद्दल ओढा नव्हता, तरी ते राणोजी शिंद्यांच्या बरोबरचे म्हणून त्यांना काकासाहेब म्हणून ते मान देत. त्यांची भेट झाल्यावर नजीबखानाचें पारिपत्य न करतां त्याचा उपयोग इतर कामासाठीं करून घ्यावा, असें मल्हाररावांनीं शिंद्यांना सांगितलें. शिवाय सर्व बंदोबस्त होऊन राज्याचे सर्व शत्रु नाहींसे झाले म्हणजे मग सरदारांचें, शिलेदारांचें महत्त्व कमी होईल, त्यांना कामगिरीच मिळणार नाहीं; महत्त्वाच्या कामाशिवाय सरदार अगदीं निर्माल्यवत् होतील, अशी आपली कल्पना होळकरांनीं शिंद्यांना सांगितली.

आपल्या तयार फौजेसहित डिसेंबर १७५९ मध्यें शिंदे दिल्लीला पोहोंचले व तडकाफडकीं मोठ्या उमेदीनें ते कामाला लागले. रेंगाळणाऱ्या कारभाराचे दिवस संपले. खंडण्या न देणाऱ्यांवर, चुकारपणा करणाऱ्यांवर त्यांनीं तडाखे देण्यास सुरुवात केली.

वजीर गाजीउद्दीन यानें थोडी कुरबुर केली. तेव्हां शिंदे यांनीं लष्कराच्या जोरावर त्यास ताळ्यावर आणलें. पंजाब हीच अबदालीची वाट असल्यानें तिथें चांगला बंदोबस्त ठेवण्यासाठीं साबाजी शिंदे व त्रिंबक बापूजी यांना सैन्यासुद्धां शिंद्यांनीं पंजाबांत पाठविलें.

इकडे दिल्लीचा कारभार वजीर गाजीउद्दीन याच्याच्यानें चांगला होईना. त्याच्याजवळ कारभारासाठीं पैसा नव्हता; कर्तृत्व व धमकाहि नव्हती. दिल्लीचा कारभार खंबीर माणसाच्या हातीं दिल्याखेरीज पूर्वेस काशी-प्रयाग-बंगालकडे जाणें शिंद्यांना मुळींच योग्य नव्हतें. कशी काय व्यवस्था करावी, या विचारांत दत्ताजी शिंदे होते.

नजीबखानानें याच सुमारास आपल्या हस्तकातर्फे शिंद्यांशीं संधान बांधलें. दिल्लीच्या कारभाराच्या बदल्यांत त्यानें तीस लाख रुपये देण्याचें कबूल केलें. हीं झालेलीं बोलणीं दत्ताजीनें पुण्यास पेशव्यांना कळविलीं. पेशव्यांना ही व्यवस्था मुळींच पसंत नव्हती. त्यांनीं कळविलें—

" नजीबखान पुरा हरामखोर आहे. बेमान. त्यास वाढविणें सर्पास दूध पाजण्यासारखें आहे. त्याचें पारिपत्य करावें. "

" नजीबखान अर्धा अबदली, त्याचें राजकारण न करावें ! "

' पारिपत्य करा, ' असें स्पष्ट कळवून सुद्धां, मल्हारराव होळकर यांच्या सांगण्यावरून म्हणून म्हणा किंवा त्यांना पूर्वेकडे स्वारीवर जाण्याची उतावीळी झाल्यानें म्हणा, दत्ताजी शिंदे नजीबखानाशीं वाटाघाटी, तडजोडी, बोलणीं, गांठीभेटी करीतच राहिले. क्षेत्रें ताब्यांत घेण्यासाठीं व शुजाउद्दौल्याकडून खंडणी वसूल करण्यासाठीं गंगा उतरणें शिंदे यांच्या फौजेस जरूर होतें. त्या कामासाठीं गंगा नदीवर पूल बांधून देण्याची कामगिरी शिंद्यांनीं नजीबखानाला सांगितली. ती नजीबखानानें कबूल केली व दत्ताजी शिंद्यांकडून आलेलें संकट निवारण करून घेतलें. शिंदेहि खूष होऊन गडमुक्तेश्वराला यात्रा करण्यास गेले. तिथें जाऊन त्यांनीं खूप दानधर्म केला.

मिळालेल्या जीवदानाचा फायदा नजीबखानानें चांगलाच घेतला. प्रथम त्यानें आपल्या फौजेचा बंदोबस्त केला. सुरक्षित अशी नदीकांठची जागा निवडून सभोंवतीं तोफखाना नीट बसवून त्यानें मोठी जय्यत तयारी केली.

त्यानें एकीकडे गुप्त कारस्थानेंहि सुरू केलीं. प्रथम त्यानें नबाब शुजा-उद्दौला याच्याशीं संबध जोडला. वकील पाठविले. बोलणीं सुरू केलीं. खरें म्हटलें तर शुजा शियापंथी असल्यानें सुनी नजीबखानाबद्दल त्यास मुळींच प्रेम नव्हतें. त्याचा ओढा मराठ्यांकडेच विशेष होता. पण नजीबखानानें त्याच्याशीं " हे मराठे तुम्हांला पैशासाठीं लुटूं इच्छितात, तुमच्या राज्यांतील हिंदूंच्या तीर्थस्थानांवर त्यांचा डोळा आहे. तेव्हां तुम्ही मला मदत करा. आपण दोघे मिळून काफर मराठ्यांचा कांटा काढून संकट दूर करूं, " अशीं बोलणीं लावलीं. नजीबखानाचें बोलणें शुजास पटून त्यानें आपली फौज व तोफखाना मदतीस पाठविण्याचें कबूल केलें.

दिल्लीचे बादशहा आणि त्यांच्या बेगमा नाखूष होत्या. त्यांच्या खर्चाची नेहमीं अडचण असे. त्यांना नजीबखानानें फितवून अहमदशहा अबदाली याला मदतीस बोलावण्यास सुचविलें. मलका जमानी बेगमेनें त्याप्रमाणें अबदालीस तांतडीनें बोलावण्याची व्यवस्था केली.

हीं कारस्थानें पूर्ण होईपर्यंत 'आज पूल बांधतों, उद्यां बांधतों,' असे निरोप पाठवून त्यानें दत्ताजी शिंद्यांना झुलवत ठेवलें. त्याचीं कारस्थानें, कावा शेवटपर्यंत दत्ताजींच्या लक्षांत आला नाहीं.

गडमुक्तेश्वराची यात्रा उरकून दत्ताजी सरळ नजीबखानाच्या तळापाशीं समोर दोन मैलांवर स्वतःच्या फौजेसुद्धां उतरले. तिथून त्यांनीं नजीबखानाला पुलाबद्दल निरोप पाठविला. सध्यां पावसामुळें पूल होत नाहीं, असें त्यानें उत्तर दिलें. दत्ताजीनें त्यास भेटीस बोलावलें, पण नजीबखानानें भेट घेतली नाहीं. बराच चढेलपणा दाखविला. त्याचा शिंद्यांना खूप राग आला आणि त्यांनीं सरळ नजीबखानावर हल्ला केला. लष्करी जोरावर उभ्या घोड्यानिशीं हरामखोर नजीबास बुडवून टाकूं, या उमेदीनें दत्ताजी शिंदे यांनीं लढाई आरंभली. त्याची थोडीफार हानिहि झाली. पण पुरा मोड झाला नाहीं. तो दम बांधून मदतीची वाट पाहत उभा राहिला. त्याचीं कपटी राजकारणें यशस्वी झालीं.

तोंच शुजाउद्दौल्याकडून फौज मदतीस आली. इकडे अहमदशहा अबदालीसुद्धां हिंदुस्थानांत उतरून आला तो पंजाबवर तुटून पडला. पंजाबच्या बंदोबस्तासाठीं ठेवलेले साबाजी शिंदे व त्रिंबक बापूजी यांचा अबदालीपुढें निभाव लागला नाहीं. फौज उधळली ती सरळ धावत पळत उघडी-बोडकी दत्ताजी शिंद्यांच्या फौजेंत येऊन मिळाली. पाटीलबाबा उघडे पडले. ते नजीबखान व अबदाली यांच्या कात्रींत सांपडण्याची वेळ आली.

प्रसंग मोठा बाका आला. पण तरीहि न डगमगतां अबदाली व नजीब एकत्र झालेले नाहींत तोंच अबदालीस एकट्यास गांठून पिटाळून लावावें, या उद्देशानें दुआबमधून यमुना ओलांडून दत्ताजी शिंदे बाहेर पडले. त्यांनीं आपल्याबरोबरचें जड सामान, बायामुलें दिल्लींत वजिराकडे रवाना केलीं. सडे होऊन नजीबखानावरची मोहीम सोडून ते अबदालीवर त्वेषानें चालून गेले. ता. २४ डिसेंबर १७६९ ला त्यांचा अबदालीशीं सामना झाला.

चार-सहा घटका युद्धप्रसंग झाला. दत्ताजीनें अबदालीस नरम केलें.

शिंदे आपणांस एकट्याला आटोपणार नाहींत, असें पाहून अबदालीनें माघार घेऊन यमुना ओलांडून दुआबमध्यें प्रवेश केला. नजीबखानाच्या सैन्यास मिळण्यासाठीं त्यानें हा खटाटोप केला व तो यशस्वी झाला. दोघांचा मिलाफ झाला. शक्ति वाढली. नजीब व अबदालीचीं बोलणीं, वाटाघाटी झाल्या. दिल्लीवर कबजा मिळवावा, म्हणून सैन्यासह ते दोघे यमुना नदीच्या उत्तर किनाऱ्यानें दिल्लीकडे निघाले. त्यांचा रोख पाहून दत्ताजी शिंदेहि झटकन् यमुनेच्या दक्षिण तीरानें दिल्लीकडे आले. दोनहि सैन्यांच्या मध्यें फक्त यमुना नदीचें पात्र राहिलें.

अहमदशहा अबदाली व नजीब नदी उतरून अलीकडे येण्याची शक्यता असल्यानें जवळपास असलेले नदीचे सर्व उतार रोखून धरण्यासाठीं ठिकठिकाणच्या उतारांवर दत्ताजी शिंदे यांनीं आपलें सैन्य ठेवलें. मल्हार-राव होळकर राजपुतान्यांत होते, त्यांच्याकडे तांतडीनें जासूद रवाना झाले. ते मदतीस येईपर्यंत गनिमी काव्यानें लढून शत्रूस थोपवून धरण्याचा दत्ताजी शिंदे यांचा निश्चय होता.त्या दृष्टीनें शिंदे यांनीं बाया, जड सामान

दिल्लींतून दक्षिणेकडे रवाना केलें व त्यांनीं सडया फौजेंतील लहान-मोठया सरदारांना ठासून लढण्यास सिद्ध केलें.

यमुना ओलांडण्यास नदीचे जे उतार होते, त्यांत बरारी उतार बराच सोपा होता. तिथें साबाजी शिंदे रस्त्याच्या रक्षणासाठीं रस्ता अडवून उभे होते. त्याच बरारी घाटावरून नजीबखान आपल्या सैन्यास घेऊन यमुना नदी ओलांडूं लागला. त्याच्या सर्वांत पुढें येणाऱ्या सैनिकांजवळ लहान टप्प्यांच्या बंदुका होत्या. त्या बंदुकांनीं रोहिले गोळीबार करीत पुढें येत होते. त्यांच्या पाठीमागें अबदालीची फौज जंबुरे--उंटांवरील व हत्तींवरील तोफा उडवीत नदी ओलांडूं लागली.

साबाजी शिंदे यांच्या सैनिकांजवळ फक्त तलवारी व भाले होते. नदी-किनाऱ्यावरील चिखल, दलदल, झुडपें यांच्यामुळें घोड्यांच्या हालचाली झटपट होण्यास वाव नव्हता. तरीहि साबाजी शिंदे यांनीं थोडया सैन्या-निशीं रोहिल्यांच्या झुंडी अडवून धरल्या, पण बंदुकीच्या गोळ्यांनीं माणसें पटपटा पडूं लागलीं. " अडचणींत पांच-सातसें मनुष्य ठार जाहलें. तैसीं घोडींहि पडलीं. तैसेंच जखमीहि जाहले. केवळ शेणसडा होऊन गेला ! " दुराणीची फौज नदी उतरली, अशा बातम्या आल्या, तेव्हां बरोबरचे सरदार ' थोडी माघार घ्यावी ' असें म्हणूं लागले. पण माघार घेतांच फौज पळूं लागेल, शिंदे रणांगणांतून पळाले, अशी अपकीर्ति होईल--" हें अपयश मरणाहूनि ओखटें !" असे सांगून दत्ताजी शिंदे स्वतःच साबाजीच्या मदतीस धावले. त्वेषानें जबरदस्त लढाई करून त्यांनीं नदीच्या अलीकडे आलेल्या रोहिल्यांना परत अर्ध्या नदींत लोटीत नेलें.

लढाईत गर्दीत शिंदे यांचे बरोबर लढत असलेले सरदार जगदाळे पडले. ठार झाले. त्यांचें प्रेत उचलून आणण्यासाठीं दत्ताजी शिंदे घोड्यावरून पुढें धाव घेत असतांना त्यांना बंदुकीची गोळी बरगडींत लागली व ते घोड्याखालीं पडले. त्यांना उचलण्यासाठीं इतरांनीं गर्दी केली.

याच सुमारास रोहिल्यांची ताज्या दमाची फौज गोळीबार करीत पुढें आली. सैन्याबरोबर नजीबखान व कुतुबशहा होते. त्यांनीं रणांगणांत बेशुद्ध पडलेल्या दत्ताजींस त्यांच्या बुटक्या राकट बांध्यावरून तेव्हांच ओळखलें. ते धांवतच पाटीलबाबा यांच्याजवळ आले. पाहतात तों ते अर्ध-चट शुद्धीवर होते.



" बचेंगे तो और भी लडेंगे ! "

मोठ्या दिमाखानें त्यांनीं " क्यों पटेल, हमारे साथ तुम और लडेंगे ? " असें विचारलें. दत्ताजी शिंदे यांनींहि जोरदारपणें उत्तर दिलें, " बचेंगे तो और भी लडेंगे ! " कुतुबशहा व नजीबखान यांनीं शिंदे यांचा शिरच्छेद करून शिर कापून नेलें. जय झाला म्हणून त्यांनीं शहाजणें वाजविलीं.

जनकोजी शिंदेहि दत्ताजींच्या मदतीस धाऊन आले. चकमकींत त्यांच्या दंडास गोळी लागली. ते बेशुद्ध झाले. घोड्याखालीं आले. त्यांना घोड्यावर घालून सैनिकांनीं परत आणलें. शिंदे यांची फौज उधळली. ती पळून १०० मैलांवर कोटपुतळी येथें पोहोंचली. तेथें मल्हारराव होळकर आपल्या फौजेसुद्धां येऊन भेटले. त्यांनीं लोकांना धीर दिला. शिंद्यांचें सान्त्वन केलें. जखमींना दवापाणी केला व पुढील योजनांबद्दल खलवतें सुरू झालीं.

अशा रीतीनें नजीबखानानें पूर्वींचे उपकार विसरून सापाप्रमाणें उलटून मोठाच पेंचप्रसंग निर्माण केला.

☆ ☆ ☆

: ६ :

सारी दक्षिण मोकळी होती

उत्तरेंत नजीबखान रोहिले व अबदाली यांचा शह, तर दक्षिणेंत हैद्राबादच्या निजाम अल्लीची कटकट ! त्यांत निजामाची सरहद्द तर मराठी राज्याला खेटून रेटून उभी ! नगर, दौलताबाद हीं निजामी ठाणीं तर पुण्यापासून अवघ्या शें-सवाशें मैलांच्या आंतबाहेर अशींच होतीं !

उत्तरेकडे मोठीं राजकारणें करावीं, तर इकडे निजाम उंदराप्रमाणें घर कुरतडणार. अनेक वेळां लढाईत मार खाऊनहि कबूल केल्याप्रमाणें तो खंडणी देईना, तेव्हां त्याचा बंदोबस्त करण्याचें पेशव्यांनीं ठरविलें.

दि. १ ऑक्टोबर १७५९ रोजीं दसऱ्याच्या मुहूर्तावर निजामावर मराठी फौजा निघाल्या. नानासाहेब, भाऊसाहेब, दादासाहेब, विश्वासराव— सर्व निघाले.


विसाजी कृष्ण बिनीवाले नांवाप्रमाणेंच पुढें आघाडीला होते. त्यांनीं २८ ऑक्टोबर १७५९ ला नगरचा किल्ला घेतला ! अगदीं लढाई न करतां ! नगरचा किल्लेदार कविजंग म्हणून होता. त्यानें पन्नास हजारांच्या जहागिरीची लांच घेतली आणि किल्ला स्वाधीन केला ! त्यामुळें नाशिक, त्र्यंबक, जुन्नर, औरंगाबाद हा टापू पेशव्यांकडे आला. पुण्याचें अंतर वाढलें. भीति कमी झाली.

" याउपरांत मराठ्यांशीं दबोन राहावें नीट नव्हे; लढोन मरावें, " अशा निश्चयानें निजाम अल्ली निघाला, अशीं वकिलांचीं पत्रें आलीं.

नानासाहेब नगरला दाखल झाले. निजामाशीं लढण्यास भाऊसाहेब यांच्या हाताखालीं फौज बेदरकडे चालली होती. दोघांची गांठ उदगीर-जवळ पडली.

" झुंझावयाची गांठ घालितां छातीचा कोट करून चंडोलावर फौजा उडवल्या. चारसा घटका तीर, तलवार, गोळा, गोळी, बाण, हात, धोंडा याप्रमाणें मारीत मारीत खासियाचे अंबारीपर्यंत मोकळा केला........मोठी फत्ते झाली........ '' निजाम कचरला. तहाच्या वाटाघाटी सुरू झाल्या. ' साठ लक्ष रुपये देतों ' म्हणून निजाम कबूल झाला.

श्रीमंत नानासाहेब पेशवे नगरला होते. त्यांच्याकडे सर्व हकी-



उदगीरच्या लढाईंत निजामावर विजय

कतीचीं पत्रें आलीं. विजयाच्या बातम्या ऐकून त्यांना आनंद वाटला. पत्रें आणणाऱ्या जासुदांना बक्षिसें मिळालीं.

त्यांतच उत्तरेकडील बातमीपत्रेंहि येत होतीं. " अबदाली आला. पंजाब गेला ! .... फौज पळाली ! नजीब-अबदाली एक झाले ! दिल्लीकडे आले ! शिंदे यांच्या फौजेशीं युद्ध झालें ! " आणि शेवटीं जनकोजी शिंदे यांचेंच पत्र आलें :

" तीर्थस्वरूप कांका बाबा (दत्ताजी शिंदे) यांस लढाईंत गोळ्या लागोन राहिले. आम्हांसहि उजवे दंडाजवळ गोळी लागली. त्याउपर बुणग्यांत येऊन सर्वांहि बुणगे सांभाळून कोटपुतळी प्रांत जयपूर येथें आलों. तों मल्हारराव फौजेसह आले. "



मल्हारराव होळकर

बातमी वाचून नानासाहेब यांना वाईट वाटलें. पण मल्हारराव तिकडे गेल्यामुळें काळजी वाटली नाहीं. कारण मल्हारराव अनुभवी, लढवय्ये, त्या प्रदेशाचे पक्के माहीतगार असेच होते. तोंच पुन: पत्रें येऊं लागलीं.

" मल्हारराव सुभेदार वृद्ध झाले. घोड्यावर

बसून युद्ध करावयासी सामर्थ्य नाहीं. जनकोजीची जखम भरली नाहीं. युद्ध कोणीं करावें ? हरिभक्तांचें सत्त्व गेलें ! ...."

होळकरांच्या सैन्याचा पराभव होऊन ते मागें हटल्यावर अबदालीनें जाटांच्या ताब्यांतील दुआबमधील रामगड ऊर्फ अलीगड घेतला. तेथें त्यास जाटांनीं जमा करून ठेवलेला भरपूर दारूगोळा, तोफा, द्रव्य, धान्य मिळालें. शिवाय जाटांनीं पंचेचाळीस लाख खंडणीहि कबूल केली.

हीं कामें पूर्ण होईपर्यंत उन्हाळा आला. अबदालीनें ठरविलें कीं, शहाआलमला दिल्लीला बादशहा बनवून, शुजाउद्दौल्यास वजीर नेमून अफगाणिस्थानांत परत जावें.

मराठ्यांच्या तर्फेहि होळकरांचे दिवाण चंद्रचूड व हिंगणे यांनीं तहाचीं बोलणीं चालविलीं होतीं. सुरजमल जाट हेहि मध्यस्थी करीत होते. नजीबखानाचा दुआबमधील प्रदेश त्याला द्यावयाचा व अबदालीनें परत जावयाचें, अशीं बोलणीं चालली होतीं.

पण सदाशिवरावभाऊ मोठ्या सैन्यानिशीं उत्तरेस येत आहेत, अशाहि बातम्या येत होत्या. अशा वेळीं अबदालीची मदत नसेल तर नजीबखानाचा निभाव लागणें कठीणच होतें. त्यानें घाबरून जाऊन अबदालीस हिंदुस्थानांत राहण्याची विनंती केली. खर्चासाठीं त्यास दहा लाख रुपये दिले आणि धान्य व इतर साहित्य पुरवण्याची जबाबदारी घेतली. अलीगडला गवताच्या झोपड्या बांधून त्यानें सैन्याला राहण्याची सोय करून दिली. दिल्लीहून तंबू आणवून पाण्याच्या सोयीसाठीं स्वतः अबदाली मात्र अलीगडपासून पन्नास मैलांवर गंगा नदीच्या कांठावर छावणी देऊन राहिला.

इकडे दक्षिणेंत जय, तिकडे उत्तरेंत पराभव ! हा पराभव भरून काढण्यास खाशांपैकीं कुणी तरी जावयास हवें होतें.

नानासाहेब पेशवे यांनीं भाऊसाहेब, दादासाहेब या सर्वांना फौजेसुद्धां सरळ उत्तर हिंदुस्थानच्या रस्त्यावरील पटदूर गांवीं भेटीसाठीं बोलावलें. भाऊसाहेब उत्तरेंतील आपल्या सरदारांना लिहितात...." तिकडील पेचामुळें इकडे आटोपावें लागलें. नाहीं तरी सारी दक्षिण मोकळी होती.... "

ही मोकळी दक्षिण तशीच सोडून उदगीरहून दादासाहेब, भाऊसाहेब उत्तरेकडे निघाले. नानासाहेबहि नगरहून निघाले. सर्वांच्या भेटी जालन्यापासून सत्तावीस मैलांवर पटदूर येथें झाल्या. त्या भेटींतच उत्तरेच्या बंदोबस्ताची वाटाघाट झाली.

☆ ☆ ☆

: ७ : भाऊसाहेबांची नेमणूक

'**पटदूर**' हें कांहीं फार मोठें गांव नव्हतें. पण खुद्द नानासाहेब पेशव्यांची छावणीच तिथें पडल्यामुळें तें अगदीं गजबजून गेलें होतें. नानासाहेबांचा तळ नगरहून येथें येऊन पडला होता. छावणीसाठीं जाड कापडाची मोठी कनात भिंतीसारखी लावलेली होती. या बाहेरच्या कनातीस रहदारीसाठीं चार मोठाले दरवाजे ठेवलेले होते. कनातीच्या आंत लहानमोठे अनेक तंबू उभारलेले होते. त्यांत श्रीमंत पेशवे यांच्या तंबूस सुवर्णाचे कळस असून ते दूरवरून खूप रमणीय दिसत होते. हे तंबू इतके मोठे होते कीं, त्यांत कित्येक निरनिराळीं दालनें असून त्या दालनांमधून सर्व प्रकारच्या सोयी केलेल्या होत्या.

छावणीच्या मुख्य व मोठ्या दरवाजासमोरचें मैदान चांगलें साफसूफ केलेलें होतें. त्यांत शृंगारलेले हत्ती-घोडे नेहमीं उभे असत. मैदानांत निशाणें फडकत होतीं. पहाऱ्यावर असलेली फौजेची तुकडीहि निशाणापाशीं तयारीनिशीं उभी होती.

छावणीच्या कचेरीच्या तंबूत नानासाहेब पेशवे एका किनखाबी कापडाच्या गादीवर लोडाला टेकून बसलेले होते. त्यांनीं मोंगलाई थाटाचा झगा अंगांत घातलेला होता. डोक्यावर पागोटें असून त्यावर मौल्यवान् शिरपेच होता. त्यांनीं रेशीमकांठी पायघोळ धोतर नेसलेलें होतें. गळ्यांत हिऱ्यामोत्यांनीं युक्त पाचेचा कंठा होता. राजवैभवानें त्यांचें उंच, पुष्ट गोरेंपान शरीर शोभायमान दिसत असलें तरी ते सचिंत होते.



पेशव्यांच्या छावणींत अब्दालीच्या पारिपत्याचीं खलबतें

त्यांच्यासमोर साधा पोषाख केलेले, शरीरानें उंच, नमस्कारांच्या व तालमीच्या व्यायामानें धष्टपुष्ट झालेल्या शरीराचे, राकट चेहऱ्याचे सदाशिवरावभाऊ बसलेले होते. निर्भयता, निश्चयशीलता, कठोरता या सर्वांचें मिश्रण त्यांच्या चेहऱ्यावर दिसत होतें. शेजारींच रघुनाथरावहि बसले होते.

मध्यें जासुदांनीं आणलेल्या पत्रांचा गठ्ठा पडलेला होता. त्यांतील एक पत्र घेऊन भाऊसाहेब वाचूं लागले—

" उजाडण्याचे समयीं गिलचे सळमिसळ होऊन फौजेंत मिसळले. दोन-चार घटका युद्ध झालें. तेथें आनंदराव राम व शेट्याजी खराडे व त्याचा ुत्र कार्यास आले ! होळकरांची फौज उधळून पळों लागली. गंगोबा मागें फिरून मथुरेस आले. मल्हारबाबानें आग्ऱ्याचा रस्ता धरला ! .."

हें पत्र खालीं ठेवून ते गठ्ठयामधील दुसरें पत्र वाचूं लागले.....

" मोठा दीर्घ रोग अबदाली आहे. या रोगापासून श्रीमंतांनीं हिंदुस्थान सोडवावें. सरंजाम, फौजा तोफखाना फिरंगी देऊन पाठवावे. म्हणजे शिंदे-होळकर मिळोन अबदालीचें व रोहिल्याचें उत्तम पारिपत्य होऊन येईल.... "

पत्र वाचून झालें. भाऊसाहेब तें गुंडाळून खालीं ठेवीत होते तोंच नानासाहेब रघुनाथदादांकडे पाहात म्हणाले—"आतां उदगीरला निजामाचा बंदोबस्त झालेला आहे. भाऊ आतां श्रीरंगपट्टणला जातील. तुम्ही फौज घेऊन उत्तरेस स्वारीस जावें. पेंच मोठा आहे. शिंदे-होळकरांचा निभाव लागलेला नाहीं. तेव्हां स्वतःच आपल्यापैकीं कुणीतरी जावयास हवें. तसा अबदाली तुम्हांलाहि भारी वाटला तर आणखी फौज इकडून रवाना करतों. ...."

यावर दादासाहेब म्हणाले, "आपण मला उत्तरेंत स्वारीस जाण्याची आज्ञा करतां, तरी मला ऐशीं हजार फौज व एक कोट रुपये खजिना खर्चासाठीं द्यावा. मग दुराणी व आम्ही पाहून घेऊं."

त्यांचें उत्तर ऐकून सदाशिवरावभाऊंना हसूंच लोटलें. ते म्हणूं लागले, "वाहवा रे पराक्रम ! स्वारी-शिकारी करून खजिना घरीं आणावयाचा तो सोडून घरचाच कोटि रुपयांचा खजिना यांना स्वारीला हवा ! आतां थोडी निराळी परिस्थिति आहे. गेल्या स्वारीच्या वेळीं तरी दादांनीं पार लाहोर-अटकेपर्यंत मुलखगिरी करून घरीं काय आणलें ? कर्जच ना ?"

"पैशाचें काय घेऊन बसलांत भाऊ ?" नानासाहेब म्हणाले. रघुनाथदादांस राग येऊं नये, हाच त्यांच्या बोलण्यामागील हेतु. पण भाऊसाहेब पक्के हिशोबी, हुशार, चौकस असून चहूंकडे व्यवधानें सांभाळून कारभार करण्यांत पटाईत ! कचेरीची कारकुनी व लढाईवरची शिपाईगिरी या दोनाहि कसबांत ते मोठे तरबेज होते. "पैशाचें काय ?" असें नानासाहेब यांनीं म्हणतांच ते ताडकन् म्हणाले :

"ठीक आहे ! तुम्ही म्हणतां तसें पैशाचें घटकाभर राहूं द्या. पण यांच्याच्यानें जिंकलेल्या सुभ्यांचा बंदोबस्ताहि झाला नाहीं. नजीबखान रोहिला एवढा कारस्थानी. त्याला बुडवावयाचा तो तसाच राहिला. राजपुतान्यांतील संस्थानिकांची व्यवस्था नीटनेटकी झाली नाहीं. काशी-प्रयाग हीं स्थळें अजून मोकळीं झालेलीं नाहींत. हेंच काय, पण सरकारी मुलखांतील मामलतदार लोक पैशांची अफरातफर करतात, त्यांची चौकशी करून त्यांना शासन करावयाचें कामहि राहिलें. आपल्या सरदारांमधील एकोपा जाऊन स्वार्थासाठीं एकमेकांचीं भांडणें लागलीं....सगळी बजबजपुरी झाली

आहे !....या सर्व गोष्टींचा बंदोबस्त ते गेल्या स्वारींत करते तर आजचा प्रसंगच आला नसता ! ''

भाऊसाहेब यांचें बोलणें ऐकून रघुनाथदादा कांहीं फार बोलले नाहींत. कारण एक तर सदाशिवरावभाऊंचें बोलणें खरें होतें. शिवाय निजामावरच्या नुकत्याच झालेल्या उदगीरच्या लढाईतील विजयामुळें भाऊसाहेब यांचें कर्तृत्व सर्वांनाच चांगलेंच पाहावयास मिळालेलें होतें. दादा फक्त एवढेच म्हणाले, " ठीक आहे. खजिना आणि फौज मिळत नसेल, तर माझ्याच्यानें उत्तरेंत स्वारीस जावयाचें होत नाहीं. ''

इतकें बोलून ते उठले तडक कचेरींतून बाहेर पडले. आंत शांतता पसरली. नानासाहेब पेशवे गंभीर व सचिंत दिसूं लागले.

भाऊसाहेबहि क्षणभर विचारांत पडले. पण मग ते लगेच म्हणाले,

" नानासाहेब, गोमीस बहुत पाय असतात. त्यांत एक: मोडला तरी उणें पडत नाहीं. मला आज्ञा द्यावी. आतांपर्यंत आम्हीं इकडे लढाया केल्या, नर्मदा पार उतरून कोठें विजय मिळविलेला नाहीं. एक वेळ उत्तरेस जाऊन येतों. आपण मुळींच फिकीर करूं नये. सध्यांचें संकट मोठें आहे. अबदाली युद्धाच्या गोष्टी बोलतो, तर त्यास युद्धच पुरेपूर द्यावयाचें व रेंगाळत पडलेला दिल्लीचा उद्योग एकदांचा उरकावयाचा, असा माझा विचार आहे. तरी आज्ञा द्यावी म्हणजे जातों. ''

भाऊसाहेब यांचें हिमतीचें बोलणें ऐकून नानासाहेब पेशवे यांना समाधान वाटलें. " एकदोन दिवसांत काय तें नक्की करूं, '' असें म्हणून नानासाहेब उठले. पत्रें व कागदपत्रें कारकुनाकडे देऊन भाऊसाहेब आपल्या डेऱ्यांत गेले.

☆ ☆ ☆

स्वारीची तयारी

नानासाहेब पेशव्यांनीं खूप विचार केला कीं, पूर्वींच्या स्वाऱ्यांत रघुनाथदादांची व अबदालीची गांठ पडलीच नाहीं. हे इकडून गेले, तों तो स्वदेशास परत गेला होता. आतां शिंदे-होळकरांबरोबर सामना झाला. पण त्यांचा निभाव लागला नाहीं. रघुनाथदादा हे कांहीं शिंदे-होळकरांपेक्षां जास्त नाहींत. तेव्हां भाऊसाहेब यांच्यासारखा नेटाचा, कडक, परिस्थिति समजून घेणारा, त्वरित निर्णय करणारा, हिशोबी, खंबीर खासाच पाठवावा, असेंच त्यांनीं ठरविलें.



सदाशिवरावभाऊ

भाऊसाहेबांनाहि तेंच हवें होतें. त्यांनीं मोठ्या ईर्षेनें मोहिमेची जबाबदारी पत्करली.

नानासाहेब यांचे थोरले पुत्र विश्वासराव भाऊसाहेब यांच्या हाताखालींच कारभार शिकत होते. ते नुकतेच स्वतंत्र स्वाऱ्या-शिकाऱ्याहि करूं लागले होते. वय कांहीं फार नव्हतें. पण विश्वासराव मोठे दक्ष व होतकरू होते. त्यांना अनुभव मिळावा म्हणून त्यांसहि भाऊसाहेब यांचेबरोबर पाठवावयाचें नानासाहेब पेशव्यांनीं ठरविलें. एवढेंच नव्हे तर मोहिमेचें नेतेपण विश्वासराव यांचेकडे द्यावें, अशी त्यांनीं इच्छा दर्शविली. भाऊसाहेब यांचेंहि विश्वासरावांवर पुत्रवत् प्रेम होतें. त्यांनींहि या गोष्टीस आपली संमति दिली.



विश्वासराव

भाऊसाहेब व विश्वासराव यांनीं उत्तरेस जाण्याचें ठरलें. रंगपंचमीचा सण मधें पडला, तो सर्वांनीं पटदुरास साजरा केला. भाऊसाहेबांनीं फौजेची, सामानासुमानाची, दारूगोळ्याची व्यवस्था कसोशीनें चालविली.



इब्राहिमखान गारदी व भाऊसाहेब यांच्या आणाशपथा

भाऊसाहेब यांनीं आपल्याबरोबर नेण्यासाठीं फौजेची व सरदारांची निवड स्वतःच केली. निजामाशीं लढण्यासाठीं उदगीरला जमा झालेली फौज सुमारें चाळीस हजार होती. त्यांतील निवडक तीस हजार फौज त्यांनीं निवडली. लष्करी कामांत निष्णात असे बळवंतराव मेहेंदळे भाऊसाहेब यांचे उजवे हातच. ते मोठ्या जिद्दीनें तयारीला लागले. नाना पुरंदरे, हरि शिवराम खासगीवाले, नाना फडणीस अशी तरुण जिव्हाळ्याची मंडळीहि भाऊंनीं बरोबर घ्यावयाचें ठरविलें. नारो शंकर, विठ्ठल शिवदेव, महीपतराव चिटणीस, तुकोजी शिंदे, महादजी शिंदे असे उत्तरेकडील माहीतगारहि भाऊंच्या मदतीस निघाले.

युरोपियन पद्धतीची कवायत शिकलेला इब्राहिमखान गारदी नुकताच भाऊसाहेब यांचे पदरीं निजामाकडून येऊन राहिलेला होता. त्याच्या शिस्तबद्ध गारद्यांचें लढाईतील कौशल्य व अचूक मारा करणाऱ्या तोफांचें काम भाऊसाहेब यांनीं नुकतेंच उदगीरला पाहिलेलें होतें. हिंदुस्थानमध्यें हीं कवायती पलटणें नवीनच होतीं. भाऊसाहेब यांना त्याचा मोठा भरंवसा वाटे. त्यांनीं इब्राहिमखानाच्या नेतेपणाखालीं आठ हजार गार्दी व तोफखाना बरोबर घ्यावयाचें ठरविलें.

उदगीरच्या लढाईंत जखमी झालेले कांहीं शूर सरदार आपआपल्या घरीं परतले होते. त्यांना भाऊंनीं तांतडीनें उत्तरेस निघण्याचीं पत्रें लिहिलीं तीं अशीं—

॥ श्री ॥

यादी तेथील सरदारांस पत्रें

१ समशेर बहादरास पत्र कीं, तुम्हांस बुद्धिवाद रगडून लिहिला. तुम्हीं जाऊन दोन वेलेस कामकाज विशेष केलें. तेणें संतोष जाहाला. तुम्हांजवळून हमेश सर्वांहून मेहनत मर्दुमकी अधिक व्हावी, यांत आम्हांस बहुत संतोष.

१ येशवंतराव पवारास पत्र कीं, पत्र येऊन वर्तमान कलत नाहीं. यंदा स्वतां मेहनत मर्दुमकी विशेष केली हें वर्तमान श्रवणें संतोष जाहला. तुम्ही सर्वांहून अधिक करावें योग्यच आहे.

१ सोनाजी भापकर व शहाजी भापकर यांस येशवंतराव पवाराचे-प्रमाणें पत्र.

१ दमाजी गायकवाडास पत्र कीं, जखम अगदीं बरी जाहली किंवा नाहीं ? यंदा स्वतां कामकाज उत्तम केलें तर ह्या गोष्टी योग्यच आहेत.कानिष्ठ पक्षीं पांच-सात हजार फौज असावी. कामकाज विशेष व्हावें उत्तमच आहे.....

याप्रमाणें पत्रें पाठविलेले मातबर सरदार दमाजी गायकवाड, यशवंत-राव पवार, सोनाजी भापकर, समशेरबहादर व इतर अनेक आपआपल्या सैन्यासह भाऊसाहेब यांना येऊन मिळाले.

फौज सुमारें चाळीस-पन्नास हजारांपर्यंत झाली !

सरदारांपैकीं कांहींचे रुसवे होते. ते भाऊसाहेब यांनीं काढले. दमाजी गायकवाड त्याचा सरंजाम गेल्यापासून डाव्या हातानें रामराम करीत होता. त्यास भाऊसाहेब यांनीं आश्वासन दिलें कीं, मोहिमेवरून परत आल्यावर सर्व कांहीं गोष्टी मनाप्रमाणें करून देऊं. असें त्याचें समाधान करतांच तो उजव्या हातानें रामराम करूं लागला. भाऊसाहेब यांनीं यशवंतराव पवारांचा खूप गौरव केला. लहानमोठ्या सरदारांपैकीं कुणाचे

सरंजाम, जहागिऱ्या खालसा झाल्या होत्या, त्यांस त्या परत देऊं, अशीं आश्वासनें देऊन सर्वांचें समाधान केलें.

मराठ्यांची लढण्याची रीत गनिमी काव्याची. "गनिमी कावा म्हणजे धांवती लढाई किंवा भरारीचा छापा!" प्रसंग अंगावर आला तर झटपट माघार घेऊन बचाव! मग माघारें येतांना बाप मुलासाठीं थांबणार नाहीं! त्यांत बहुधा सर्व सैन्य घोड्यांवरच असल्यानें त्याच्या हालचाली झटपट होत.

पेशव्यांच्या नोकरींत आलेल्या गारद्यांची फौज ही पायदळाची फौज. शिवाय त्यांच्याबरोबर जड तोफखाना व त्यांचें सामानसुमान. हालचाली शिस्तशीर, सावकाश, धिम्मेपणानें व्हावयाच्या. तेव्हां इब्राहिमखानास अशी भीति पडली कीं, हे मराठे झटदिशीं माघारें फिरले कीं, मग रणावर आपण व आपली फौज एकटेच मागें पडूं. ही भीति त्यानें व्यक्त करतांच "कांहीं झालें तरी तुम्हांस रणांत एकटें सोडून मागें निघणार नाहीं," असें म्हणून भाऊसाहेब यांनीं इब्राहिमखानास बेलभंडार दिला. त्यांच्याकडूनहि रोटीवर हात ठेवून शपथ घेतली.

अहमदनगर व बऱ्हाणपूर येथें दारूगोळा व लढाईचें हत्यारादि साहित्य भरपूर होतें, तें तपासून स्वारीबरोबर पाठविण्याचे हुकूम सुटले. नमुन्यासाठीं नगरच्या किल्लेदाराला दिलेला हुकूमच पाहा ना—

"हिंदुस्थानचे स्वारीस जिनस जंगी पाठवावयासी पाहिजे. याजकरतां सरंजाम येणेंप्रमाणें किले नगर येथील जकिऱ्यापैकीं रवाना करणें :

बि॥ त॥——

गोळे तोफेचे बा॥ फरम्याची याद. सुमार १९०००.

सिसें वजन पक्के खंडी १०.

कागद फिरंगाणीं रजमे सुमार २०००.

सालमजकुरीं दारू नवी आली आहे. वैजापूरपैकीं वगैरे. त्या दारूपैकीं दारू. वजन पक्के खंडी ४०

गारा फतरी सुमार १०००००.

सदरहूप्रमाणें जिनस रवाना करणें. दारू सिसें आणावयास येथून पांचसे बैल पाठविले आहेत..... !"

भाऊसाहेब यापूर्वीं उत्तरेकडे गेलेले नव्हते. रोहिले, पठाण, अफगाण, राजपूत यांच्याबद्दल त्यांना फक्त दूरची माहिती. यासाठीं उत्तरेकडे वावरलेले माहीतगार असे हिंगणे व इतर जे होते, त्यांनाहि भाऊसाहेब यांनीं पत्रें लिहिलीं कीं, "खासा स्वारी दरमजल हिंदुस्थान प्रांतीं जात आहे. तर तुम्ही पत्रदर्शनीं स्वार होऊन हुजूर येणें. कितेक गोष्टी मनसब्याच्या व किफायतीच्या विनंती करीत होता ते चाकरी करून दाखवावयाचा समय आतां आहे. यास्तव पत्र पावतांच जलदीनें आम्हां सनीध येणें. दिरंग न लावणें !"

अशा रीतीनें फौज, सामान यांचा बंदोबस्त करून ता. १४ मार्च १७६० रोजीं शिवालिखिताचे मुहूर्तानें रात्रीं, नानासाहेब यांचा निरोप घेऊन भाऊसाहेब पटदूरहून उत्तरेकडे स्वारीस निघाले.


त्यांच्याबरोबर ब्राह्मण, मराठे, महार, मुसलमान, इत्यादि सर्व जातींचे लोक एकदिलानें स्वारीस निघाले.

☆ ☆ ☆

: ९ : पटदूर ते मथुरा

१४ मार्च १७६० रोजीं भाऊसाहेब पटदूरहून निघाले ते सिंदखेड, बऱ्हाणपूर, बेर्शी, सिरोंज, अरुण, नरवर अशी मजल-दरमजल करीत ३० मे १७६० ला ग्वालेर येथें पोहोंचले. मध्यंतरीं हंड्याजवळ त्यांनीं नर्मदा ओलांडली. रघुनाथरावांनीं गेल्या स्वारीच्या वेळीं परत जातांना तंबू व इतर युद्धोपयोगी जड साहित्य इंदूर व उज्जैनीस ठेवलेलें होतें. या स्वारीच्या वेळीं तें वापरावयास मिळावें, म्हणून सिरोंजला मुक्काम असतांना भाऊसाहेबांनीं हें सामान मागवून घेतलें.

अडीच महिन्यांत भाऊसाहेब यांचा सरळ सरळ प्रवास २३५ मैल झाला ! हा प्रवास सावकाश चालला होता, यांत शंकाच नाहीं. पण त्यास कारणेंहि तशींच होतीं.



भाऊसाहेबांचा आणि अहमदशहा अब्दालीचा मार्ग

इतके दिवस मराठी सैन्य फारच सुटसुटीत होतें. सर्व मदार घोड्यावर ! पडशींत सामान बांधून, तें घोड्याच्या पाठीवर, तर छोटी राहुटी घोड्याच्या खोगिरांत. मुक्काम पडला, वेळ असला, तर आटयाच्या रोटया बनवून खाल्लया. तशीच वेळ पडली तर लाह्या-फुटाणे, हुरडा यांच्या फाक्या

मारीत फौज चाले. जड सामानाचें लचांड नसल्यानें त्यांच्या हालचाली झटपट, विजेसारख्या व्हावयाच्या. शिवाय रसद मिळावी म्हणून त्यांना थांबावें लागत नसे. खोळंबा होत नसे.

पण आतांचा थाट मोठाच होता. मोठमोठे तंबू, जड तोफखाना, शिवाय फौजेबरोबर स्वतःचा बाजार. हें सर्व एका ठिकाणाहून दुसऱ्या मुक्कामावर जावयाचें, तर त्यास बराच वेळ लागे.


आणि त्यांत आतां गारद्यांचीं आठ-दहा हजार पायदळी पलटणें फौजेबरोबर होतीं. तीं कवायत शिकलेलीं असलीं तरी घोडेस्वारांबरोबर थोडींच धावणार ? त्यामुळें रोज कांहीं मैलच वाटचाल होई.

शिवाय मध्यंतरीं रस्त्यांत विंध्य-सातपुड्याचे डोंगर व त्यांतील अरुंद खिंडी, खोल व रुंद नद्या-नाले.या सर्वांचा परिणाम प्रवास सावकाश होण्यावर झाला.

मोहीम लांबची असल्यानें स्वारीसाठीं बोलावलेल्या निरनिराळ्या सरदारांना तयार होऊन येण्यास वेळ लागला. बऱ्याच जणांचीं घोडीं उदगीरच्या लढाईत पडलीं होतीं किंवा निकामी झालीं होतीं. त्यांतून जीं शिल्लक होतीं, त्या घोड्यांत रोगाची सांथ पसरली. सांथीनें बरींच घोडीं पटापट मेलीं. नवीन घोड्यांची व्यवस्था होण्यास वेळ लागला.

भाऊसाहेब स्वारीला निघाले. फौजहि चांगली बरोबर होती. तेव्हां सोबतीनें उत्तरेंतील पवित्र क्षेत्रांच्या यात्रा करण्यासाठीं, गंगास्नान व प्रभुदर्शन घेण्यासाठीं बाया-बापड्या व अनेक श्रद्धावान् निघाले. पूर्वीं स्वारीबरोबर स्त्रियांचा गुंता-गोतावळा नसे. पण या वेळीं यात्रेच्या निमित्तानें बरीच मंडळी फौजेबरोबर निघालेली. नाना फडणीस यांच्यावर भाऊसाहेब यांची फार माया होती. ते लिहितात, " मातोश्री व कुटुंबसहवर्तमान भाऊंबरोबर हिंदुस्थानांत जाऊन स्वर्गंगा, त्रिपथगा भागीरथीचें स्नान, त्रिस्थली यात्रा करावी. अंतःकरण शुद्ध होईल या भावनेकरून गेलों .... भाऊंची ममता विशेष व आंवेची व्यथा बहुत जाहली. उठावयास


नाना फडणीस



लष्कराबरोबरील यात्रिकांचीं तीर्थांतील धर्मकर्मे

शक्ति नाहीं. रेचन बहुत, ग्लानि फार. तेव्हां कूच जहालें असतां मुक्काम श्रीमंतांनीं करवावा....."

शिवाय रस्त्यांत क्षेत्रें लागलीं, तिथें "क्षौर-प्रायश्चित्त-श्राद्धादिक" कर्मे! संतमहंत, बैरागी यांचेजवळ बसून पुराणश्रवण! यामुळें फौजेच्या हालचाली झटपट होण्यास अडथळा झाला.

फौजेचा प्रवास जरी सावकाश होत होता, तरी भाऊसाहेब यांच्या निरनिराळ्या राजकारणी उलाढाली अगदीं पहिल्या मुक्कामावरून निघाल्यापासून चालू होत्या. उत्तर हिंदुस्थानांत गोविंदपंत बुंदेले, हिंगणे अशी पेशव्यांची नोकरमंडळी होती. ती जरा स्वतंत्र रीतीनें वागत असत. पण ती उत्तर हिंदुस्थानांतील माहीतगार मंडळी असल्यामुळें त्यांना पत्रें लिहून भाऊसाहेब निरनिराळ्या कामगिऱ्या सांगत होते. मुख्य बाब रसद व पैशासंबंधीं असे. त्याशिवाय त्यांच्या ताब्यांत असलेल्या ठाण्यांचा बंदोबस्त करण्याबद्दल व नियमित बातमीपत्रें पाठवून शत्रूकडील हालचालींची बातमी पाठविण्याबद्दलहि वारंवार लिहिलेलें आहे. उत्तरेकडील वजनदार अधिकाऱ्यांकडून चांगलीं हत्यारें, सैन्यभरतीसाठीं माणसें, पूल बांधण्यास नावा, अशा अनेक गोष्टींची मागणी केलेली आहे. त्यांतील कांहीं नमुने उद्‌बोधक असेच आहेत, ते असे :

" निकडीचे समयीं तरतूद न होई तर काय कामाची ? सत्वर पांच लाख रवाना करणें. सर्व त्यापुढें समजावणें.....आणखी दहा लाखांची तरतूद करणें ! "

" बाहेरील ऐवज तूर्त मिळणें नाहीं. खर्च भारी. लढाईचा प्रसंग ! तरी लिहिल्याप्रमाणें दहावीस लाखांपर्यंत तरतूद करणें........ ! "

" तरतूद करून दारूगोळा व ऐवज सत्वर येई तें करणें. "

" तूर्त वोढ आहे. बेगमी खर्चाची तुम्हीच तजवीज केली पाहिजे."

" खबर राखून लिहीत जाणें....तुमची डाक असून रोज खबर येत नाहीं असें कामाचें नाहीं. ...."

" दारू शिसें पंचवीस चाळीस-खंडी जमा होईसें करणें ...."

" बातमी यावयाची तजवीज केली तें फार उत्तम केलें. याउपरी बातमी रोजचे रोज कच्ची लिहून यावी. त्यास (अबदालीस) येथें आलियावरी पैका मिळाला काय ? बराबर त्याचा खर्च किती आहे ? कोण कोण सरदार ? किती जुमलेदार ? नजीबखान व रोहिले वरकड किती ? पायाचे माणूस किती ? तोफा किती ? कशा आहेत ? मुलखांत अमल कोणत्या जागा कसा आहे ? हें कुल वर्तमान बारीक बारीक कळवावें........ ! "


अहमदशाहा अबदाली

" शंभर जेजाले व दोन-तीनशें बंदुका खरेदी करोन सत्वर पाठविणें........ !"

" यमुनापार लष्कर उतरावें लागतें. यास्तव तुम्ही अंतर्वेदींतून नावा कुल जमा करून एका जागा कोण्हाचा उपद्रव नावेस न लागे ऐसे ठिकाणीं ठेवणें ! "

अशीं अनेक पत्रें आहेत. त्यांतील कांहीं गमतीचींहि आहेत. फौजेबरोबर यात्रेसाठीं निघालेली मंडळी होती. त्यांच्यासाठींच कीं काय कोण जाणे;

" सरकारांत गुलाबाचें प्रयोजन आहे. तरी भागीरथीच्या पाण्याचा गुलाब एक मण, वरकड गुलाब चार मण एकूण पांच मण गुलाब चांगला बेश पाठवून देणें ! "

अशींहि मागणीपत्रें आहेत. तीं सर्व वाचलीं कीं भाऊसाहेब यांचा बारकावा दिसून येतो.

अहमदशहा अबदाली हा परदेशी शत्रु हिंदुस्थानांत आलेला. त्याचा हिंदुस्थानांतील सर्वांनीं मिळून पराभव करावा, अशी भाऊसाहेब यांची भूमिका होती. तिला अनुसरून शुजाउद्दौला, अयोध्येचा नबाब, महंमदखान बंगश, माधोसिंग, बिजेसिंग व इतर अनेकांना पत्रें लिहून मदतीस यावें, असें कळविलें. वकीलहि पाठविले !


शुजाउद्दौला

" माधोसिंग बीजेसिंग व कोटेवाले राणाजी यांस सर्वांस पत्रें, वकील पाठविले आहेत. सर्व इकडील तिकडील दोहीं राजकारणावर आहेत. परंतु आमचे येण्यामुळें एकपक्ष धरून सर्व जमा होतील. याजप्रकारें त्यासहि लिहिलें असे. हे सर्व एक होऊन मल्हारबा, जाट यांसहित अबदालीचें पारपत्य करावें, हाच विचार आहे ! "

पण दुखवलेल्या राजपुतांना मराठ्यांबद्दल फारशी आपुलकी वाटत नव्हती. अबदालीइतकेच मराठेहि त्यांना परके वाटूं लागले होते. त्यांनीं भाऊसाहेब यांना कळविलें, " तुमच्या आणि अबदालीचे भांडणांत आम्ही कोणासहि मिळणार नाहीं ! "

नजीबखानानें शुजाउद्दौल्याला भेटून " मराठे काफर आहेत. अबदाली–तुम्ही–आम्ही सर्व मुसलमान एकत्र होऊन त्यांचा नायनाट करूं या ! " असें सांगून त्यास मराठ्यांस मिळण्यापासून परावृत्त केलें ! शुजा-उद्दौला हा चांगला मातब्बर होता. त्याच्याकडे चांगली फौज, तोफखाना व भरपूर पैसा होता. तो जिकडे मिळेल, त्याची सरशी होणार होती. शुजाचा ओढा मराठ्यांकडे होता. पण नजीबखानाच्या बोलण्यानें तो अबदालीस मिळाला. त्यानें त्याचा सत्कार केला.

सुरजमल जाट मात्र दहा हजार स्वार घेऊन भाऊसाहेबांस मदत करण्यास तयार झाले. भाऊसाहेब यांनीं तें मान्य केलें. तारीख ८ जूनपर्यंत फौजेचें कूच चंबळेपर्यंत आलें. तेथून जाटांचा मुलूख लागला. भाऊसाहेब यांनीं सर्व फौजेस ताकीद दिली.... "उद्यांपासून जाटांचा मुलूख लागणार. कोणत्याहि गांवास आग लावूं नये. उपद्रव देऊं नये. पारिपत्य केलें जाईल. परिच्छिन्न सर्वांस ताकीद ! "

जाटांचा मुलूख ओलांडून भाऊसाहेब फौजेसह १६ जुलैस मथुरेस दाखल झाले.


☆ ☆ ☆

: १० : मल्हारराव आणि जनकोजी

८ जून १७६० च्या सुमारास चंबळा नदी ओलांडून भाऊसाहेब आग्र्याच्या रोखानें निघाले. आग्रा सुमारें तीस मैल लांब होतें. झटदिशीं आग्र्यास जावें, असा भाऊसाहेब यांचा विचार होता. पण चंबळा नदीनंतर आतां गंभीर ऊर्फ बाणगंगा नदी लागली. पावसाळाहि लवकर सुरू झालेला होता. त्यामुळें नदी दुथडी भरून वाहात होती. नदीचें पात्र भरून शिवाय सभोंवतालीं कित्येक मैल पाणी पसरलेलें होतें. रस्ता न मिळाल्यामुळें फौजेस आठ-दहा दिवस कुचंबत पडावें लागलें.

एके दिवशीं सायंकाळ टळून गेली तरी फौजेच्या मुक्कामावरील कचेरीच्या तंबूंत पुढील व्यवस्थेसंबंधीं विचार करीत येरझारा घालीत भाऊसाहेब फिरत होते. आषाढ वद्य पक्षांतील अष्टमी. त्यांतहि आभाळांत ढग आलेले. त्यामुळें छावणी अंधारांत बुडूं लागली होती. तोंच हुजऱ्या आंत आला व लवून मुजरा करून हळू आवाजांत म्हणाला, " बाहेर मल्हारराव व शिंदे आले आहेत. "

विचारांत गढून गेलेले भाऊसाहेब थबकले ! गंभीर झाले. पण झटकन् तंबूच्या बाहेर आले.



मल्हारराव आणि जनकोजी भाऊसाहेबांस भेटतात.

नुकत्याच पेटविलेल्या मशालीच्या उजेडांत दोन व्यक्ति खालीं जमिनीकडे पाहात उभ्या होत्या. त्यांचीं तोंडें उतरलेलीं होतीं. दोघेहि थकलेले दिसत होते. एक व्यक्ति चांगली साठ-पासष्ट वर्षांच्या वयाची, वृद्धत्वाची छाया शरीरावर पडलेली होती. पायांत जोडा, गुडघ्यापर्यंत काच्याचें धोतर, अंगांत आंखूड अंगरखा व डोक्यावर पागोटें असा तिचा वेष होता. चेहऱ्यावर मिशांचे कल्ले मात्र राकटपणा दाखवीत होते. दुसरी व्यक्ति जेमतेम अठरा-वीस वर्षांची—अगदीं तरुण. तिनें पायांत जोधपुरी चढावा, लांब तंग विजार, गुडघ्यापर्यंत अंगरखा घातलेला होता. त्या व्यक्तीचा उजवा हात गळ्यांत बांधलेला होता व कानशिलांवरून डोक्यावर पट्टी बांधलेली होती. डोक्यावर शिंदेशाही पगडी होती.

भाऊसाहेब बाहेर आले तेव्हां दोघांनींहि त्यांना मुजरा केला. पण तो अधोवदन होऊनच! भाऊसाहेब झटकन् पुढें झाले. त्यांनीं त्या तरुणास एका हातानें छातीशीं धरलें. दुसऱ्या हातानें वृद्धाचा हात आपल्या हातांत घेतला. क्षण गेला, दोन क्षण गेले. कुणी बोलेना, कुणी हालेना. वातावरणांत ऐकूं येत होते फक्त हुंदके आणि निःश्वास !!

दोघांनाहि हाताशीं धरून भाऊसाहेब यांनीं कचेरीच्या तंबूत नेलें. त्या दोघांपैकीं एक होते मल्हारराव होळकर व दुसरे होते जनकोजी शिंदे!

वयानें थकलेले सुभेदार आणि पराभवानें थकलेले जनकोजी शिंदे पाहून भाऊसाहेब यांना खूप वाईट वाटलें.

शिंदे आणि होळकर म्हणजे मराठी राज्याचे भक्कम आधारस्तंभ ! आतां मल्हारराव चांगले साठ-पासष्ट वर्षांचे वयस्क झालेले होते. थोरल्या बाजीरावाच्या कारकीर्दींत ते व राणोजी शिंदे दोघे साध्या बारगिरापासून चढत चढत स्वपराक्रमावर वीस-पंचवीस हजार फौजेचे धनी—संरजामदार झाले होते. दोघांच्या शिपाईगिरीचा दरारा सर्वत्र होता. उत्साहानें काम उरकण्याबद्दल दोघांचीहि प्रसिद्धि होती. पण आतां वय झाल्यानें मल्हार-रावांची लढाईची तरुणपणची तडफ कमी झाली होती. त्यांच्याबरोबरचे पेशवे बाजीराव गेले, चिमाजीआप्पा गेले, राणोजी गेले, फार काय, वयानें लहान जयाप्पा शिंदे, दत्ताजी शिंदे, तेहि गेले ! ! त्यांच्याबरोबरीचा कुणी नव्हता, असें म्हटलें तरी चालेल. त्यांत कुंभेरीवर त्यांचा एकुलता एक मुलगा गेला. तो गमावल्यानें मल्हारबाबांना मोठा धक्काच बसला होता. त्याच्या मृत्यूस कारण झालेल्या जाटाचा सूड घ्यावा, ही त्यांची प्रतिज्ञा रघुनाथराव, त्यांचे कारभारी व शिंदे यांच्यामुळें त्यांना सोडून द्यावी लागली होती. त्यांनीं केलेली नजीबखानाची तरफदारीहि पेशव्यांना पसंत नव्हती ! आपलें कुणी ऐकत नाहीं, मालक महत्त्व देत नाहीं, यामुळें त्यांच्या स्वभाव कांहींसा मत्सरी, कांहींसा चिडखोर बनलेला. शिंदे यांच्याबद्दल मनांत आढी असल्यामुळेंच कीं काय, ते दत्ताजी शिंदे यांच्या मदतीस गेले नाहींत. खुद्द पेशव्यांनीं दत्ताजी शिंदे यांच्या मदतीस जाण्याबद्दल आज्ञा देऊनहि ते राजपुतान्यांत लहानसहान उद्योग करीत बसले !

ते वेळींच मदतीस जाते, तर नजीबखान रोहिले यांचें पारिपत्य आधींच होऊन अफगाणिस्थानांतून आलेला अबदाली आयताच एकटा सांपडला असता व शिंदे-होळकरांपुढें सफा झाला असता. उत्तरेंतून नुकतेच अटकेपर्यंत स्वारी करून आलेले रघुनाथराव यांचेंहि असेंच मत होतें.

“ दोन्ही सरदार एकत्र असलियास उत्तम रीतीनें पठाणाचें पारिपत्य होईल. पठाणांत कांहीं फार बल नाहीं. त्यांनीं मागील वर्षीं दहशत खादली आहे. सारांश, एकदिल फौज असलियानें काम सहजांत होतें .... ! ”

पण तें घडलें नाहीं. स्वारीचा सर्व भार दत्ताजींवर पडला ! आणि त्यामुळें त्यानें सर्वनाश ओढवून आला. तो स्वतः मल्हाररावांनाहि सांवरतां आला नाहीं. त्यांच्या फौजेची खूप खराबी झाली. या नुकसानीशिवाय, मालकांचे हुकूम पाळले नाहींत, मित्रांना मदत केली नाहीं, हे दोषहि माथीं आलेले. त्यामुळें मल्हारराव खिन्न होते.

मल्हारराव येऊन भेटण्याच्या आधीं त्यांचे विश्वासू कारभारी गंगोबा तात्या चंद्रचूड भाऊसाहेब यांना भेटले होते. भेटींत त्यांनीं फसलेल्या राजकारणाची, लढायांची माहिती दिली होती. त्यांनीं चर्चेंत मल्हारराव यांच्याबद्दलचा भाऊसाहेब यांचा राग बराच कमी केला होता. तो पूर्ण गेला नसला तरी नवीन मोहिमेवर लक्ष ठेवून त्यांनीं राग गिळून टाकला !

जनकोजी शिंदे वयानें तरुण—केवळ अठरा-वीस वर्षांचे ! पण पक्के स्वामिनिष्ठ, शूर ! लहान वयांत त्यांच्यावर मोठीच आपत्ति कोसळलेली होती. फौज उधळलेली. वीरशिरोमणि चुलते गमावलेले ! मरणापेक्षां अपयश वाईट, हीच शिंदे यांची कल्पना ! पण तें पदरांत बांधून त्यांना धन्याच्या दाराशीं यावें लागलेलें !

भाऊसाहेब यांनीं दोघांचा समाचार घेतला, समाधानें केलीं. त्यांना आपणांजवळ ठेवून घेतलें. त्यांना बरोबरची फौज, नवीन तोफखाना, सामान दाखविलें. मल्हारराव उत्तरेकडील माहीतगार. त्यांच्याशीं भाऊसाहेब यांचीं पुढील तजविजीबद्दल बोलणीं सुरू झालीं. फौजेबरोबरचें, बाजारबुणग्यांचें, बायाबापड्यांचें, यात्रेच्या निमित्तानें निघालेल्यांचें लटांबर मागें ठेवून सड्या सुटसुटीत फौजेनें पुढें जाऊन लढाई करावी; एवढेंच नव्हे तर खासा भाऊसाहेब यांनीं आणखी पुढें न येतां सरदारांचीं मोहरीं पाठवून मोहीम यशस्वी करावी, असें मल्हाराररावांचें मत होतें.

मल्हाररावांच्या पाठोपाठ सुरजमल जाट व वजीर गाजीउद्दीन भाऊसाहेब यांना येऊन भेटले. त्यांचेंहि मत मल्हारराव यांचेप्रमाणेंच पडलें.

भाऊसाहेब यांचेकडे शत्रूकडील हालचालींची बारीकसारीक माहिती येत होती.

अहमदशहा अबदलीची फौज अलीगड व त्याच्या आसपास पन्नास मैलांवर होती. ती सुमारें तीस हजार होती. त्याचे मुख्य मदतनीस नजीब-


खान रोहिले व सरदार जहानखान शुजाउद्दौल्यास आपल्या बाजूस ओढण्यासाठीं कानपूरजवळ बिठूरला गेले होते. त्यांच्याजवळहि सुमारें वीस हजार फौज होती.

शुजाउद्दौला हें त्या वेळीं फार मोठें प्रस्थ होतें. तो गंगा-यमुनांच्या कांठच्या दोन सुपीक प्रांतांचा मालक असून त्याच्याकडे वाडवडिलांनीं मिळविलेलें खूप द्रव्य होत.त्याच्या पदरीं अठरा-वीस हजार चांगली शिकविलेली फौज व उत्तम तोफखाना होता. फौजेचे पगार नियमित मिळत, त्यामुळें ती मालकावर खूष होती—एकनिष्ठ होती.

मराठे व अबदाली दोघांनाहि शुजाउद्दौल्यानें आपल्या पक्षास मदत करावी, असें वाटे. मराठ्यांनीं शुजाचे वडील दिल्लीला वजीर असतांना मदत केलेली होती. म्हणून मराठ्यांबद्दल मनांतून त्यास आपुलकी वाटे. शिवाय नजीबखान व शुजा यांच्यांत शिया-सुनी भेद असल्यानें रोहिले व अबदाली यांच्याबद्दल शुजास फारसा ओढा नव्हता.

भाऊसाहेब पटदूरहून निघाल्यापासूनच शुजाउद्दौल्याशीं संधान बांधीत होते. आग्र्याच्या अलीकडे आल्यावर मराठ्यांच्या तर्फे नारो शंकर व शिंदे यांचे दिवाण रामजी अनंत दाभोळकर दोघे शुजास भेटले. दिल्लीची केवळ वजिरीच नव्हे, अगदीं हवें तें देण्याचें अभिवचन मराठ्यांतर्फे त्या दोघांनीं दिलें. दिल्लीला अबदाली-नजीब यांचा अमल झाला, तर तुमचा मुळींच फायदा होणार नाहीं, असेंहि त्यांनीं बजावलें. भाऊसाहेब यांचीं खास पत्रें वकिलांनीं शुजास दिलीं. निदान अबदालीस न मिळतां तटस्थ राहावें, असें वकिलांनीं सुचविलें.

शुजाउद्दौल्याला मराठे आपल्या बाजूस वळवण्याच्या खटपटीस लागलेले पाहून अबदालीनें दिल्लीच्या बादशहाची बेगम मलका जमानी हिला शुजाकडे पाठविलें. पण शुजाउद्दौल्यानें तिची फारशी दखल घेतली नाहीं. हें पाहून अबदालीनें नजीबखान व सरदार जहानखान यांना बरोबर सैन्य घेऊन शुजाकडे पाठविलें. नजीबखानानें फौजेचा दबाव आणला व तो स्वतःच नबाबांना जाऊन भेटला. त्या वेळीं मराठ्यांकडून आलेलीं पत्रें शुजानें नजीबखानाला दाखविलीं. नजीबखानानें मोठीं लाघवी भाषणें करून सांगितलें कीं, “ मराठे लोक काफर आहेत. त्यांच्या मनांत सर्व



[अबदाली अलीगडला छावणी करून होता. शुजाउद्दौला बिठूर कानपूरला होता. शुजास आपल्याकडे वळवून घेण्यासाठीं सैन्यासह नजीबखान कानपूरला गेला होता. ही स्थिति पाहून भाऊसाहेब यांनीं ठरविलें कीं, "आग्र्याजवळ नावांचा पूल करून यमुना ओलांडावयाची. अबदाली व नजीबखान यांच्या मध्यभागीं जाऊन दोघांना एकमेकांपासून अलग करावयाचें आणि एकएकट्याला गाठून त्यांच्या पराभव करावयाचा!" पण यमुनेला पाणी फार असल्यानें आणि पूल करण्यास नावा न मिळाल्यानें हा बेत फसला ! —जुलै १७६०.]

मुसलमानांचा नायनाट करावयाचा आहे.तुमच्या राज्यांतील हिंदु तीर्थक्षेत्रें त्यांना हवीं आहेत.तरी काफरांवर विश्वास न ठेवतां इस्लामच्या संरक्षणासाठीं,वाढीसाठीं अबदालीची बाजू घ्यावी. त्यानें खुद्द अबदालीचीं पत्रें-वचनें, कुराणाच्या शपथेसुद्धां आणून दिलीं. त्या सर्वांना भुलून शुजाउद्दौल्यानें अबदालीकडे सैन्यासह जाण्याचें ठरविलें.

इकडे नजीबखान सैन्यासह शुजाउद्दौल्याकडे गेला आहे व अबदाली दुआबामध्यें एकटाच आहे, असें पाहून भाऊसाहेब यांनीं असा एक नामी बेत योजला कीं,तांतडीनें मजल दरमजल करीत नावांचा पूल बांधून यमुना उतरावयाची व दुआबामध्यें घुसून तिथें छावणी करून बसलेल्या अबदालीस एकटेंच गांठून त्याचें पारिपत्य करावयाचें. सैन्याचा एक भाग नजीबखानावर पाठवून त्यासहि एकट्यास गांठून धुळीस मिळवावयाचें! या वेळीं मराठ्यांच्या फौजेची ताकद-तयारी उत्तम होती. उत्साहहि खूप होता. पण यमुना नदी दुथडी भरून वाहत होती. पूल करावयास नावाहि नव्हत्या! ! ज्यांच्यावर नावा जमा करण्याचें काम सोपविलें होतें, त्यांच्याकडून नावांचा बंदोबस्त झाला नाहीं. त्यामुळें यमुना नदी ओलांडून दुआबामध्यें प्रवेश करणें अशक्य झालें. लढाईचा एक उत्तम बेत नावांच्या अभावानें फसला. त्यामुळें सैन्याच्या उत्साहावर विरजण पडलें.

मराठ्यांच्या बेताची कुणकुण लागल्यामुळें नजीबखान शुजाउद्दौल्यास त्याच्या सैन्यासुद्धां घेऊन जलदीनें अबदालीस येऊन मिळाला. शुजाच्या आगमनामुळें अबदालीची शक्ति वाढली. इतर लहानमोठे मुसलमानहि अबदालीकडे आले. अबदाली परदेशांतून आलेला हिंदुस्थानचा शत्रु न राहतां इस्लामचा रक्षणकर्ता झाला. हिंदूविरुद्ध मुसलमान असें या लढ्याला स्वरूप मिळालें.


☆ ☆ ☆

: ११ : दिल्लीचा कब्जा

यमुनेनें वाट न दिल्यानें दुआबामध्यें जाऊन अबदालीचें पारिपत्य करावयाचा बेत सोडून द्यावा लागल्यावर भाऊसाहेब यांनीं दुसरा बेत ठरविला. नदींतून पलीकडे जाण्यास वाट नव्हती, तेव्हां नदी ओलांडण्याची भानगड न ठेवतां, नदी-अलीकडचें राजधानीचें शहर दिल्ली सर करून तिथें आपला तळ देण्याचें भाऊसाहेब यांनीं ठरविलें. सुराजमल जाट आणि वजीर गाजीउद्दीन या दोघांनाहि ही कल्पना पसंत पडली; कारण स्वत: सुरजमल जाटाला दिल्लीचा ताबा हवा होता व गाज़ीउद्दीन यास वजीरगिरी हवी होती.

दिल्लीच्या रस्त्यावरील मथुरेला भाऊसाहेब १७ जुलै १७६० च्या सुमारास पोहोंचले. तिथून त्यांनीं मल्हारराव होळकर, जनकोजी शिंदे व बळवंतराव मेहेंदळे यांच्या नेतृत्वाखालीं दिल्लीकडे सैन्य रवाना केलें.

फौजेबरोबर यात्रा करण्यासाठीं बरीच मंडळी आलेली होती. त्यांना घेऊन भाऊसाहेब मथुरा-वृंदावनास यात्रा करण्यास गेले. नाना फडणीस या यात्रेकरूंत होते. त्यांनीं यात्रेचें वर्णन फारच उत्तम रीतीनें केलें आहे. ते आपल्या आत्मचरित्रांत लिहितात— "दोन दिवसांनंतर मुक्तिपुरीं श्रीमथुराक्षेत्रीं गेलों. तेथें क्षौर-प्रायश्चित्त-श्राद्धादिक करून तदनंतर पुढें भगवान् पूर्णब्रह्म राधाकृष्ण याणें सकल लीला केल्या असें जें वृंदावन त्या स्थळास गेलों. तेथें कालियाडोहीं कदंबवृक्ष ज्याजवर भगवान् बसून वस्त्र-हरण करिता जाहला त्याच्या शाखा अद्यापि यमुनेंत गेल्या आहेत, त्यांखालीं जाऊन स्नान-तर्पण करून तदनंतर गोपीचंदनाचे टिळे व तुळसीच्या माळा घालून भगवंताचें ध्यान करीत होत्साता वृंदावनांत अटलबिहारी, कुंजबिहारी व बालबिहारी, राधाकिशोर, गोविंदजी या भगवंताच्या मूर्ती यांचीं दर्शनें घेतलीं. त्यांत कुंजबिहारी मध्याह्नकालीं चोपाळ्यावर निद्रिस्थ, कपाट लावलेलें, परंतु चोपाळ्याची दोरी बाहेर ओढीत असत. ती आपले हातीं ओढून भगवान् जो यास आंदोलनलीला केली. तेथोन श्रृंगारवट जेथें भगवंतें राधेस श्रृंगार केले, तेथें जाऊन वटदर्शन घेऊन पुढें बंशीवटी म्हणजे जेथें भगवंतें मुरलीवादन केलें तेथें



मराठ्यांनीं किल्ल्याला मोर्चे लावले.

जाऊन वटाचें दर्शन केलें. तेथून सेवाबन, कुंजबन हीं स्थळें कुंज असे कीं, भगवान् लीला करतो असाच भास होत असावा. सर्वहि वृक्ष छत्राकार, ठेंगणे, भूमिस्थ पल्लव कंटक वृक्षासहि परंतु कंटक नाहीं. हें पाहून आनंदमय होत्साता यमुनातीरीं रेतींत, भगवान् जो यानें बालरूपी लीला केली. पादारविंदसंबंधीं रेणु रज:कण त्याची प्राप्ती मस्तकीं वंदावयास ब्रह्मादिक देव इच्छितात. तेथें जाऊन लोळून ती रेती मस्तकावरी घेतली....तेथोन ज्ञानगुदडीस गेलों. तेथें थोर थोर संत महंत बैरागी, भगवत्पर होत्साते सायंकाळचे साहा घटिका दिवसास येऊन बसून, पुराणश्रवण करीत आहेत. भगवंताच्या कथा, नामें गाताहेत. त्यांचें दर्शन घेऊन चार घटिका पाहून चित्त बहुत शांत जहालें. अनेक जन्मांचें पुण्य कीं, असें वृंदावन दृष्टीस पडलें. तेणेंकरून भगवंताच्या मूर्ती व भगवद्भक्त यांचे दर्शनेंकरून नेत्र पवित्र झाले. पादेंकरून चालत गेलों तेणेंकरून पायांचें सार्थक जाहलें. हस्तेंकरून नमस्कार करितां जाहालों, तेणेंकरून हस्त पवित्र झाले. मुखेंकरून नामस्मरण केलें, तेणें मुख पवित्र झालें. कर्णेंकरून भगवत्कथाश्रवण केलें तेणेंकरून श्रोत्र पवित्रता पावले. स्नानेंकरून सर्व देह पवित्र झाला........आनंदातें पावलों ...." स्वारीच्या धावपळींतहि यात्रेचा हा आनंद भाऊसाहेबांसुद्धां सर्वांनीं लुटला !

इकडे शिंदे-होळकर-मेहेंदळे फौजेसुद्धां दिल्लीला पोहोंचले व त्यांनीं अगदीं सहज दिल्लीचा ताबा घेतला. किल्ल्यांतहि शें-पन्नास लोक घुसले, पण किल्ल्याचीं दारें उघडून इतर सैनिकांना रस्ता खुला करण्याऐवजीं ते लुटालूट करूं लागले. एवढ्यांत किल्ल्याचा किल्लेदार अबदालीचा याकूब-अली सैन्यासह आला व त्यानें आंत घुसलेल्या सैनिकांस हाकून दिलें. मराठ्यांनीं किल्ल्याला मोर्चे लावले. तोफांचा मारा करतांच भक्कम बुरूज पडावयास लागले.... "आंतील लोक घाबरे होऊन कौल मागों लागले. सबब त्यांस कौल देऊन हत्यारांसुद्धां बाहेर काढून दिलें. जागा फारच बेश मजबुदीची आहे!"

याकूबअलीनें किल्ला मराठ्यांच्या स्वाधीन केला. अबदाली व शुजा-उद्दौला यमुना नदीच्या दुसऱ्या तीरावरून दिल्लीची मराठ्यांनीं उडवलेली दुर्दशा पाहात होते. पण ते मदतीस येऊं शकले नाहींत.... "दिल्ली घेतल्यामुळें अबदालीची कमर तुटली. लढाई पाण्यावर तहकूब आहे.... तोंपर्यंत फुटाफूट करणें तें करतों...." असें भाऊसाहेब लिहितात!

दिल्ली म्हणजे बादशाही राजधानीचें शहर. अहमदशहा अबदाली अगदीं जवळ असतांना मराठ्यांनीं तें घेतल्यामुळें मराठ्यांचें वजन खूप वाढलें. सैन्याचा उत्साह वाढला. इकडे अबदालीच्या बाजूस गडबड उडाली. शुजाउद्दौला यास अबदालीस येऊन मिळाल्याबद्दल पश्चात्ताप होऊं लागला. अबदाली व त्याचीं भांडणें सुरू झालीं.... "शुजानें कळविलें, मजला या नजीबखानानें फसविलें. भाऊसाहेब, सरदार, गोविंदपंत, प्रत्यक्ष मातु:श्री सर्व सांगत कीं, तुम्ही अबदालीकडे न जाणें, त्यांचें न ऐकोन या कुंटणाचे बोलास लागोन आलों. आतां फजित पावलों. यावरून अबदालीच्या लष्करांत गडबड उडाली. सर्व लहानथोर मराठ्यांशीं सलूख करून देशास जावयाचा मनसुभा करितात. लढाईची हिंमत याजमध्यें राहिली नाहीं. दहा हजार घोडे, उंट, खेचर अनूप शहरीं गेलें. नित्य मरतात...."

मराठ्यांच्या सैन्यांत भलताच उत्साह आला. अबदाली शरण आला तरच त्यास परत जाऊं द्यावयाचें, नाहीं तर लढाई करून त्याचें पूर्ण पारिपत्य करावयाचें, अशा विचारांत भाऊसाहेब होते.

☆ ☆ ☆

: १२ :

वैराण दिल्ली

दिल्ली ताब्यांत आल्यावर सुरजमल जाट व वजीर गाजीउद्दीन यांची भाऊसाहेब यांच्या पाठीमागें भुणभुण सुरू झाली. जाट कांहीं दिल्लीच्या लढाईत नव्हते; तरी सुद्धां दिल्लीचा ताबा माझ्याकडे द्या, असें ते म्हणूं लागले. इकडे गाजीउद्दीन वजिराचा ताबा मागूं लागले. सुरजमल जाट सांगूं लागले.... " दिल्लीचा शहरपन्हां आपणांस देवावा आणि गाजीउद्दिनास वजिरी द्यावी. शिंदे-होळकर-आम्ही मिळोन गिलच्यांवर जातों. आपण मागें चंबळवर राहून कुमक करावी, स्वतः गिलच्यांवर जाऊं नये...."

या योजनेला नानासाहेब पेशवे यांची आज्ञा हवी, असें सांगून भाऊ-साहेब यांनीं ती मान्य केली नाहीं. भाऊसाहेबांनीं दिल्लीचा कारभार नारो शंकर यांच्याकडे सोपवला. त्यांना 'राजेबहाद्दर' असा किताब देऊन त्यांच्या हाताखालीं पांच हजार फौज दिल्लीच्या रक्षणासाठीं ठेवली. वजीरपदाची जागा, अबदालीकडे जाऊन पस्तावलेल्या शुजाउद्दौल्यास त्या जागेचें आमिष दाखविण्यासाठीं तशीच मोकळी ठेवली.

याचा व्हावयाचा तोच परिणाम झाला. जाट व गाजीउद्दीन दोघेहि रुसले. म्हणूं लागले, आम्ही तुम्हांस सोडून निघून जातों. त्यांच्या म्हणण्या-कडे भाऊसाहेब यांनीं फारसें लक्ष दिलें नाहीं. शेवटीं जाट व वजीर रुसून निघून गेले.

भाऊसाहेब यांनीं त्यांची समजूत काढण्यास होळकरांचे दिवाण गंगोबा चंद्रचूड व शिंद्यांचे दिवाण रामजी अनंत दाभोळकर यांना पाठ-विलें. पण जाट आणि वजीर परत आले नाहींत किंवा अबदालीसहि जाऊन मिळाले नाहींत.

...." इकडे भाऊसाहेब आणि तिकडे अहमदशहा अबदाली दुराणी दोनहि बलिष्ठ आणि दोघांचीं सुकृतेंहि ताजव्यांत घातलीं आहेत. थोडेच दिवसांत याचा निवाडा दिसोन येईल. तोंपावेतों आपले जागां दम बांधोन स्वस्थ राहावें....!" असें ठरवून जाट निघून गेले.

जाटांना नाखूष करून दिल्लीचा कारभार जरी भाऊसाहेब यांनीं आपल्या हातांत ठेवला, तरी थोड्याच दिवसांत पैसा, अन्नधान्य, गवत यांची मोठी टंचाई पडली. दिल्लीच्या आजूबाजूचा पन्नास मैलांपर्यंतचा प्रदेश, सारख्या चाललेल्या लढायांमुळें वैराण झालेला होता. यमुनेच्या पलीकडून सामान आणावयाचें, तर तो भाग शत्रूच्या ताब्यांत होता. शिवाय यमुनाहि भरून वाहात होती. त्यामुळें सामान येणें अशक्यच होतें. सैन्याचा पसाराहि मोठा होता. त्यामुळें सामानाशिवाय फार हाल होऊं लागले. सैन्याबरोबर असणाऱ्या मंडळींनीं आपआपल्या घरीं लिहिलेल्या पत्रांवरून अडचणींचें स्वरूप चांगल्या रीतीनें कळून येईल—

हरिपंत फडके यांच्या भावाचें हें एक पत्र असें आहे— "यमुनेचें पाणी उतरावयास महिना पंधरा दिवस पाहिजेत. लष्करांत मोठमोठ्यास फाके जातात. घोड्यास दाणा ठाऊक नाहीं. लष्कर गळालें. कर्ज मिळत नाहीं. अशी पंचाईत कधीं गुदरली नव्हती...."

(१५ सप्टेंबर १७६०)

याच तारखेच्या नाना फडणीस यांच्या पत्रांत मजकूर आहे कीं.... "दिल्लीचा किल्ला श्रीमंतांनीं घेतल्यावर अबदाली दिल्लीपलीकडे येऊन राहिला. यमुनेस पाणी फार. नावा सर्व त्याचे हातीं लागल्या. तेथेंच मुक्काम करून राहिला आहे. श्रीमंत अलीकडे आहेत. आम्हांस त्यांची सर्व फौज दिसते........आमची फौज भारीच आहे. परंतु पोटास नाहीं. घोडीं दाणा खावयास विसरलीं. माणसास अन्न मिळतां कठीण. खर्चाची तजवीज झाल्यास पोटास मिळेल. आपली सारी फौज एकदिल आहे...."

खर्चाची तजवीज होण्यास पैसे हवे होते. उत्तरेकडे गोविंदपंत बुंदेले, बर्वे व इतर मामलतदार होते, त्यांना पैसे पाठविण्याबद्दल भाऊसाहेब यांनीं वारंवार आज्ञा पाठविल्या. अजिजीनें लिहिलें तरी त्याचा उपयोग झाला नाहीं. भाऊसाहेब गोविंदपंत बुंदेले यांना लिहितात.... "येथें दरमहा पांच-सहा लाख रुपये लागतात, तरी तुम्हांस लिहिल्याप्रमाणें मातबर ऐवज येऊन पोहोंचतें करणें...." (२४ जून १७६०)


"तुमचे पदरीं मामला केवढा! तुम्हांपासून रुपया येणें किती! आणि कांहींच येत नाहीं. येथें खर्चाची निकड. हें कांहींच मनांत नाहीं.

अपूर्व आहे....आतां तरी खावंदाचे इतबारी, मातबर मामलत, पदरीं पत चांगली. जर दगा फार जाला तर एक सालचा ऐवज सरकारांत कर्जदाखल मेळवून द्यावा. परंतु सरकारचें काम अडूं न द्यावें...." (१० जुलै १७६०)

खर्चाची तंगाई झाल्यानंतरचें भाऊसाहेब यांनीं रागानें लिहिलेलें पत्र असें आहे—

" येथील खर्चाचे ओढीकरतां ऐवजाविशीं तुम्हांस वारंवार फारच लिहीत गेलों. परंतु ह्या गोष्टी तुमच्या चित्तांत किमपि न येतां चालढकलीवरी हा कालपर्यंत नेलें. धातुपोषणार्थ मात्र लिहितां कीं, मजला ऐवजाचे तर्तुदीशिवाय दुसरा अर्थ नाहीं. तर्तूद केली, करतों, एका दो दिवशीं रवानगीहि करितों, येतों, कार्यावरी आज्ञेप्रमाणें जातों, ऐशा गोष्टी रिकाम्या लिहितां. मात्र निदर्शनास यांतील एकहि येत नाहीं. यामुळें तुमच्या कर्तृत्वाची तारीफ वाटते! ते कोठपर्यंत लिहावी? लिहितां लिहितां भागलों, हें तुमच्या कर्तृत्वास उत्तम नाहीं. याउपरि पत्र पावतांच रसदेचा व बाकीचा ऐवज मातबर भरणा करून अविलंबें रवाना करणें........"
(४ नोव्हेंबर १७६०).

....पण पैसा-रसद भाऊसाहेब यांना मिळाली नाहीं. दक्षिणेंत श्रीमंत नानासाहेब पेशवे यांच्याभोंवतीं रघुनाथराव, सखारामबापू ही मंडळी होती. उत्तर हिंदुस्थानांत त्यांनीं अगोदर केलेल्या स्वाऱ्यांमुळें झालेल्या कर्जाबद्दल भाऊसाहेबांनीं मागें त्यांची निंदा केली होती. पण आतां त्यांचा नाइलाज झाला....त्यांनीं पेशव्यांना पैसे पाठविण्याबद्दल पत्रें लिहिलीं.... " जिकडे कामास जावें तिकडे मेळवून खावें. रड लिहिणें उत्तम नाहीं हें खरें. परंतु घरचा पैका जमादारखान्याकडील आणून खावा, असाच प्रसंग आहे. घरचा पैका आणणें वाईट वाटतें. पण इलाज नाहीं. ....!" दक्षिणेंतूनहि पैसे मिळाले नाहींत! त्यामुळें स्थिति फारच वाईट झाली. त्यांतून तोंड काढण्यासाठीं भाऊसाहेब यांनीं किल्लयाच्या दिवाणखान्यास रुप्याचें छत होतें, तें काढून त्याचे रुपये पाडले. ते नऊ लक्ष भरले! या नऊ लक्ष रुपयांवर एक महिना गुजराण झाली. पैशासाठीं दिल्लींतील नागरिक, अमीर-उमराव किंवा बादशहाचे नातेवाईक यांची कुणाचीहि लूट मराठ्यांनीं केली नाहीं.



दिवाणखान्यास रुप्याचें छत होतें, तें काढून रुपये पाडले.

मराठ्यांच्या सैन्यांत इब्राहिमखान गारदी यांच्या हाताखालीं उत्तम तोफखाना होता. तोफखान्यांतील तोफा ओढण्यासाठीं बैलांचा वापर केला जाई. पावसामुळें मराठ्यांच्या तोफखान्यांतील बरेच बैल मेले. बैलांच्या अभावीं तोफखानाच बंद पडण्याची वेळ आली. भाऊसाहेब लिहितात.... "सरकारांत तोफखान्याकडे बैलांचें प्रयोजन जरूर फारच आहे.... पावसामुळें तोफखान्याचे बैल खराब झाले. मरतात. यास्तव तुमचा तालुका इटावे वगैरे जवळ आहे. तेथील तूर्त पांचशें बैल सत्वर जमा करून हुजूर पाठविणें ....बैल चांगले मजबूत गाड्यांचे कामाचे ऐसे ....जे जे जमा होतील, तितकेच जलदीनें रवाना करीत जाणें. बैलाविणें खोळंबा झाला आहे." ....

(१७ ऑगस्ट १७६०).

पैसा, रसद यांच्या अभावामुळें, पावसामुळें विजयी मराठ्यांच्या सैन्याची शक्ति दिवसेंदिवस कमी होऊं लागली. लढाई करावयाची, पण यमुनेला पाणी फार असल्यानें कांहींच इलाज चालला नाहीं. दोनहि सैन्यें एकमेकांसमोर स्वस्थ बसलीं !

नजीबखान व शुजाउद्दौला यांच्या प्रदेशास लागूनच असलेल्या प्रदेशांत पेशव्यांचे गोविंदपंत बुंदेले व गोपाळराव बर्वे होते. शत्रूच्या

प्रदेशांत घुसून तिथें दंगा व लुटालूट करा, म्हणजे त्याच्यावर मागून चांगलाच शह येईल, असें भाऊसाहेब यांनीं दोघांना कळविलें. पण पावसाळ्यामुळें, नदीला पाणी आल्यानें व त्या प्रदेशांतील शिरजोर झालेल्या जमीनदारांमुळें शत्रूवर शह आणण्याचें काम बुंदेले-बर्वे यांच्याकडून होऊं शकलें नाहीं. भाऊसाहेब यांनीं मात्र दिल्लींत ठासून बसून आग्र्यापासून कुंजपुऱ्यापर्यंतचे यमुना नदीवरील घाट व उतार रोखून धरले. वेळप्रसंगीं उपयोगी पडाव्या म्हणून कांहीं बोटी दिल्लीजवळ जमा करून ठेवल्या.

☆ ☆ ☆

: १३ : उभयपक्षीं स्तब्धता

दिल्ली आणि दिल्लीच्या आसपासच्या प्रदेशांत सारख्या लढाया, मोहिमा, स्वाऱ्या, लुटालूट यांचें सत्र दहा वर्षे चाललें होतें. त्यामुळें शेती पिकत नव्हती. मुलूख ओसाड झाला होता. लोक कफल्लक झाले होते. त्यांतच आणखी भर म्हणून कीं काय, अहमदशहा अबदाली व मराठे एकमेकांना बुडवावयास यमुनेच्या उत्तर-दक्षिण तीरांवर तळ देऊन बसले ! त्यांची दोघांची चांगली लाख–दीड लाख फौज; फौजेंतले घोडे, बैल आणि खेचरें ! सर्वांनीं टोळधाडीप्रमाणें प्रदेश अगदीं उजाड करून टाकला.

मराठे मोठ्या वीरश्रीनें दिल्लीला आले, विजयी झाले आणि एखाद्या ओसाड गांवांत जावें त्याप्रमाणें, अगदीं घासभर अन्नाला महाग झाले. बैल, घोडीं या जनावरांचे हाल तर विचारूंच नका !

तिकडे अहमदशहा अबदाली दुआबामध्यें गंगेच्या कांठीं छावणी करून बसला होता. नजीबखानानें दिलेल्या रसदीवर व पैशावर त्याची आणि त्याच्या सैन्याची गुजराण चाललेली होती. त्यानें भाऊसाहेबांनीं दिल्ली सर केल्याचें पाहिलें; आणि गंगाकांठचा तळ उचलून त्यानेंहि

आपला मुक्काम दिल्लीला यमुनेच्या तीरावर आणून ठेवला. इतका जवळ कीं, दोन सैन्यांमध्यें फक्त यमुनेचा खंदकच !

एकादशीच्या घरीं शिवरात्र पाहुणी, असाच प्रकार झाला ! दिल्लीच्या वैराण मुलखाचा चटका त्याच्या सैन्याच्या पोटालाहि चांगलाच बसला ! दोस्त नजीबखान रोहिले यांनीं दिलेला पैसा संपला. आणखी मागितला तर त्यानें हिरमुसल्या तोंडानें आपले रिकामे खिसे दाखविले ! लूट मिळावयाची आशाच नव्हती ! तोंच टंचाईच्या जोडीला पावसाळा आला. नेहमींपेक्षां जरा लवकर आणि चांगला जोरदार ! खेचरें, घोडे, उंट मरूं लागले ! माणसांचे हाल होऊं लागले. मोकळ्या वातावरणांत हमेशा वावरणारे सैनिक सारखे नुसते छावणींत कामाशिवाय कोंडून पडल्यानें कंटाळले. परत जावें तर पुढचें काफरांचें सैन्य पाठीमागें लागून लांडगेतोड करणार. काफरांवर तुटून पडावें तर दुथडी वाहणाऱ्या यमुनेनें त्यांना पाठीशीं घातलेलें ! त्यांत आणखी भर पडली भांडणांची ! अबदालीचे हिंदुस्थानांतील दोस्त दोघे : एक जिगरदोस्त नजीबखान साहेब आणि दुसरे नबाब शुजाउद्दौला साहेब. त्यांच्यांत धुसफूस सुरू झाली. शुजाच्या पैशावर कंगाल खानसाहेब नजीबचा डोळा !

नबाब शुजाउद्दौला याचा स्वभाव व वागणें चैनीचें, अगदीं नबाबी थाटाचें. लढाईच्या दगदगीची व साहसी जीवनाची त्याला आवड नव्हती. मराठ्यांशीं तह करून मामला निकालांत काढावा, हा आपला विचार त्यानें अबदालीस सांगितला. त्यानें ठीक म्हटलें ! इकडे भाऊसाहेब यांची स्थिति जवळ जवळ अबदालीसारखीच असल्यानें त्यांनाहि, फायदेशीर असेल तर, तह हवाच होता.

वकील-मुत्सद्दी यांचीं जाणीं-येणीं सुरू झालीं. शुजाउद्दौल्याकडून राजा देवीसिंग वकील, तर भाऊसाहेब यांचे विश्वासू भवानीशंकर !........ " सलुखाचा पैगाम लागला. अबदालीच्या अटी शुजाच्या वकिलातर्फे आल्या, त्या येणेंप्रमाणें :—

(१) सरहिंद (पंजाब) पर्यंतची हद्द अबदालीस करून देणें.
(२) पादशाही बंदोबस्त आपले (अबदालीचे) हातानें करणें.
(३) पादशाही वजीरगिरी नबाब शुजाउद्दौला यांना देणें.

(४) पादशहाची बक्षीगिरी (सेनापतिपद) नजीबखान यांना देणें. ''

कोण शहाणा मान्य करणार या अटी ? त्या मान्य करणें म्हणजे आतांपर्यंतच्या सर्व खटाटोपावर पाणी सोडण्यासारखेंच ! भाऊसाहेब यांनीं या अटी अमान्य केल्या. विचारणा आली म्हणून आपल्या अटी पुढें मांडल्या, त्या अशा :—

(१) अबदालीची हद्द अटकपर्यंत असावी.

(२) दिल्लीच्या पादशाही कारभारांत अबदालीला कांहीं हक्क नाहीं. मराठे सर्व कारभार करतील !

(३) वजिरी शुजाउद्दौला यांना देऊं. तशी ती देऊं केली आहेच.

(४) नजीबखानाबद्दल मात्र बोलों नये.

...." याप्रमाणें सलूख कांहीं आमचे जाहाल्याशिवाय होत नाहीं. बोलतां चालतां होईल तें पाहूं. केवळ आमच्याच चित्तानुरूप अगर त्याचेच चित्तानुरूप कसें होईल ? यास्तव जसें बनेल तसें करावें लागेल. नदीपार जाहालिया लढाई प्राप्त होईल....लढाईस न पडतां अब्रू राहून सर्व प्रयत्न होतील ते करूं. शेवटीं एकत्र जमून लढाई करूं ! ''....

(१६ सप्टेंबर १७६०)

लढाईस न पडतां अब्रू राहून सर्व प्रयत्न करूं, या श्रीमंत भाऊसाहेब यांचे लिहिण्यावरून त्यांनीं फार तर पंजाबपर्यंत अबदालीची सरहद्द तात्पुरती कबूल केली असती. पण दिल्लीच्या कारभारांत ढवळाढवळ आणि नजीबखानाला बक्षीगिरीचा तुरा, याला त्यांचा सक्त विरोध होता.

खानबहादूर नजीब यांना मात्र अबदाली व मराठे यांचा तह होणें मुळींच नको होतें. कारण तह करून अबदाली परत अफगाणिस्थानांत गेल्यावर नजीबला आधार नव्हता. मराठे आपणांस ठेचून काढतील, याबद्दल त्याच्या मनांत खात्री होती. त्यानें हर प्रयत्नानें तहाच्या वाटाघाटी यशस्वी होऊं दिल्या नाहींत. एवढेंच नव्हे तर, " भाऊसाहेब यांची दिल्लीला आलेली फौज पाहून, काफरांना भिऊन लढाई न देतां माझ्यासारख्या मित्राचा बळी देऊन तुम्ही तह करणार ! हें आपल्यासारख्या



आपल्या नाटकी भाषेनें नजीबखानानें अबदालीस युद्धास प्रवृत्त केलें !

वीर गाजीला शोभतें काय ? तुमच्यासारखे गाजी काफराचीच दोस्ती करूं लागले, तर इस्लामचें काय होणार ?" अशा नाटकी भाषेनें नजीबखानानें तहापासून अबदालीस परावृत्त केलें असावें.

शेवटीं दोघांनीं लढून सर्व गोष्टींचा निकाल लावण्याचें ठरविलें. पण यमुना भरून चाललेली ! त्यामुळें एकमेकांना भिडण्यास मार्ग नव्हता. दोन्हीहि सैन्यें मनगटें चावीत बसलीं. दोघांनाहि पैसा, अन्न, वैरण यांचा तुटवडा असल्यानें, वेळ-सवड असून तयारी न होतां दोघांचीहि खराबी होत होती.

पण भाऊसाहेब यांच्यावर तशा अवस्थेंतहि त्यांच्या सैन्याचा विश्वास संपूर्ण कायम होता : सैन्यांतील एक सरदार सखोजी जाधव आपले वडील पिलाजी जाधव यांना लिहितात—

...." गिलच्यांचा मुक्काम यमुनेच्या पलीकडे आहे. गिलच्यांचे वकील श्रीमंतांकडे येतात. यांचेहि त्यांजकडे जातात. जाबसाल लागले आहेत. आपला दबा भारी....श्रीमंत जें करणें तें उत्तमच करतील आणि श्रीकृपेनें व आपल्या पुण्यप्रतापें सर्व गोष्टींचें यशच येईल."

(१८ सप्टेंबर १७६०.)

नाना फडणीस लिहितात —

...." उत्तरेकडील यवन शत्रुत्वेंकरून यमुनापैलतीरीं पाऊण लाख सेनेसहवर्तमान येऊन उतरला. परंतु यमुना भरपूर चालली. तेणें उभय पक्षीं स्तब्धताच जाहली !"

☆ ☆ ☆


: १४ : कुंजपुरा आनंदकुंज झालें !

यमुना नदी दुथडी भरून वाहात होती आणि दिवसांमागून दिवस जात होते. मराठ्यांना दिल्लीला येऊन स्वस्थ बसल्याला चार महिने झाले होते. यमुनेच्या पलीकडे अबदाली जो हात जोडून बसला, त्याचीहि कांहीं हालचाल दिसेना. तहाच्या वाटाघाटींचा डोंगर दोघांच्या वकिलांनीं पोखरला, पण दोघांनाहि मान्य अशा अटींचें पिल्लूं त्यांतून निघालें नाहीं. सर्व बाजूंनीं कोंडी झाली.

भाऊसाहेब यांनीं प्रथम ही कोंडी फोडण्याचें ठरविलें. त्यांनीं यमुना नदीचे उतार तपासून पाहिले. कांहीं थांगपत्ता लागेना. शेवटीं उताराच्या रस्त्यांवर, घाटांवर त्यांनीं देखरेख-पहारे ठेवले.

एक उतार मात्र फार महत्त्वाचा होता आणि तो म्हणजे दिल्लीपासून उत्तरेकडे अठ्याहत्तर मैलांवर कुंजपुऱ्याजवळ कर्नाळ या ठिकाणीं. कुंजपुरा गांव व किल्ला अबदालीच्या सरदारांच्या ताब्यांत होता. किल्ल्यांत खूप पैसा, खजिना, धान्य, वैरण सांठवलेली होती. ही सांठवलेली सामग्री व पंजाबचा फौजदार अली समदखान यानें पंजाबमधून आणलेली रसद याच कुंजपुऱ्याजवळच्या उतारानें दुआबामध्यें जात होती. त्या रसदीच्या जोरावर तो स्वस्थ होता. शिवाय वेळ पडली तर नदी उतरून पंजाबा-मधून स्वदेशीं निघून जाण्याचा त्याचा मार्गहि सुरक्षित होता.

याच सुमारास पंजाबमधून मराठ्यांच्या आशा उंचावतील अशा बातम्या येत होत्या. पंजाबांत शिखांनीं अबदालीच्या तेथील अधिकाऱ्या-



[दिल्लीला यमुनेच्या दक्षिण तीरावर भाऊसाहेब यांचा मुक्काम होता, तर नदीच्या पलीकडे उत्तर तीरावर नजीबखान व शुजाउद्दौला यांच्यासह अब्दाली उतरला होता. मध्यंतरीं यमुना दुथडी भरून वाहात होती. दिल्लीला स्वस्थ बसून उपयोग नव्हता, म्हणून भाऊसाहेब कुंजपुरा घेण्यास गेले. इकडे त्यांनीं गोविंदपंत बुंदेले, बर्वे इत्यादि सरदारांना दुआबमध्यें घुसून अब्दालीची रसद मारण्यास व नजीबखान आणि शुजा यांच्या प्रदेशांत दंगे करण्यास व जाळपोळ करण्यास सुचविलें. ते गोविंदपंतांस लिहितात : " कुंजपुऱ्यास पारिपत्यास जात आहों. अब्दाली तिकडे कूच करून आलीया उत्तम. तिकडेच लढाई पडेल. तुमच्या रोखानें आला तर आम्ही यमुना उतरून कुंजपुऱ्याचें पारिपत्य करून अब्दालीच्या पाठीवर येतों. अब्दालीचें पारिपत्य यथास्थित व्हावें असा डौल आहे. "

— ता. १३ ऑक्टोबर १७६०.]

विरुद्ध ठिकठिकाणीं दंगे सुरू केले होते. त्यांचा मराठ्यांना नुसता पाठिंबा होता, इतकेंच नव्हे तर त्यांनीं ठिकठिकाणीं ढोलकीं वाजवून दवंड्याहि दिल्या कीं, " भाऊसाहेब पेशव्यांचा अंमल येत आहे. " एवढेंच नव्हे तर भाऊसाहेब यांचा जय व्हावा व अहमदशहा अबदालीस त्याच्या लूट, कत्तल, जुलूम या कृत्यांबद्दल चांगली अद्दल घडावी, म्हणून प्रार्थना म्हटल्या गेल्या. शिखांचे सरदार अल्लासिंग यांनीं भाऊसाहेब यांना कळविलें कीं, " मी सैन्यासह तुमच्या मदतीस येतों ! "

भाऊसाहेब यांना फार आनंद झाला. त्यांच्या डोक्यांत कल्पना आली कीं, दिल्लींत माशा मारीत बसण्यापेक्षां चला कुंजपुऱ्याला जाऊं, लूट मिळवूं, रसद मारूं, अबदालीची वाट बंद करूं; आणि अफगाणिस्थानांतून आलेल्या परदेशी अबदालीला हाकून लावण्याच्या कामीं मदतीस येणाऱ्या शिख मित्रांशीं हातमिळवणी करूं.

दिल्लीचा बंदोबस्त करून ऑक्टोबर १७६० च्या पहिल्या आठवड्यांत भाऊसाहेब यांनीं आपल्या सैन्यास कुंजपुऱ्याकडे कूच करण्याचा हुकूम दिला. शिंदे, होळकर, विठ्ठल शिवदेव विंचूरकर यांनीं हा मुलूख पूर्वीं पाहिलेला होता. ते आघाडीला निघाले. भाऊसाहेब, विश्वासराव यांचेबरोबर हुजुरातीचीं पथकें निघालीं. त्यामागें इब्राहिमखान गारदी यांचा तोफखाना व कवायती पलटणें चाललीं. पिछाडीचें संरक्षण दमाजी गायकवाड करीत होते. फौज उत्साहांत चालली आणि चार महिन्यांचा आळस झडून गेला.

इकडे अबदालीकडे गडबड उडाली. ही मराठ्यांची टोळधाड कुठें जाते, यावर लक्ष ठेवण्यासाठीं अबदालीनें ताबडतोब फौज पाठविली. ती फौजहि यमुनेच्या दुसऱ्या म्हणजे उत्तर तीरानें टेहळणी करीत चालली !

अबदालीच्या छावणींत नजीबखान रोहिले मोठे डोकेबाज ! त्यांनीं कंडी उठवली ! मराठ्यांनीं पादशाही बुडविली ! विश्वासराव दिल्लीचे पादशहा झाले ! धावा, धावा, इस्लाम धोक्यांत आला !

वास्तविक औरंगजेब वारला तेव्हांच खरी मोगल बादशाही बुडालेली होती. त्याच्यानंतर येणारे बादशहा हे जसे पत्त्यांतले बादशहा. खरे

हुकूमशहा होते वजीर आणि बक्षी ! वजिराच्या मनांत आलें कीं नामधारी बादशहाचा खून होई ! वजिरांच्या मनांत आलें कीं, ते बादशहाच्या छाताडावर बसून चाकूनें त्याचे डोळे बाहेर काढीत. एवढेंच काय पण आतां नजीबखानाला पाठीशीं घालून बसलेल्या अबदालीनें बादशाही शहाजाद्या जितक्या होत्या, तितक्यांचे विवाह स्वतःच्या लोकांशीं लावून दिले होते आणि बेगमांना फरपटत ओढीत दिल्लींतून नेलें होतें. तेव्हां हेच नजीबखान गप्प होते. 'धावा धावा' म्हणून त्या वेळीं आवाज काढते, तर आवाजच बंद झाला असता त्यांचा त्या वेळीं ! आतां सुद्धां बादशाहीचें सोयरसुतक त्याला कांहींच नव्हतें. मराठ्यांना बदनाम करणें, त्यांच्याविरुद्ध धमाल उठविणें, एवढाच त्याचा हेतु होता !

भाऊसाहेब यांना कुंजपुऱ्याच्या रस्त्यावर ह्या कंड्या समजल्या. त्यांनीं ताबडतोब नाना पुरंदरे व सटवोजी जाधव यांना दिल्लीला परत पाठविलें. त्यांनीं दिल्लीस येऊन तिथें नामधारी बादशहा असलेल्या शहाजहान सानी यास बादशाहीवरून दूर केलें. शहरामध्यें त्यांनीं कायदेशीर वारस असणाऱ्या अली गौहर बादशहाच्या नांवाची द्वाही फिरवली. त्या वेळीं अली गौहर पाटण्यास होता. त्याचा मुलगा जवानखां दिल्लींत होता. त्याची युवराज म्हणून नेमणूक झाली. त्याची हत्तीवरून मिरवणूक काढून प्रार्थनेसाठीं त्यास पुरंदरे व सटवोजी यांनीं जुम्मा मशिदींत नेलें. मिरवणुकीच्या वेळीं हिंगणे युवराजाशेजारीं हत्तीवर बसले. सटवोजी जाधव मागें हातांत मोरचेल घेऊन ते उडवीत उभे होते. युवराजाची आजी बेगम झिन्नत महाल दिल्लींत होती, तिच्याकडे खर्चासाठीं पंचवीस लाख रुपये मराठ्यांनीं मागितले. तिनें पांच लाख दिले. त्यावर त्यांनीं संतोष मानला. नव्या बादशहाच्या नांवाचे नवे शिक्के तयार झाले. नवे रुपये टांकसाळींत पाडले गेले.

मराठ्यांनीं तडकाफडकीं केलेल्या या कृत्यानें राजनिष्ठ लोकांना बरें वाटलें. त्यासाठींच हा सर्व फार्स होता ! सुरजमल जाट रुसून गेला होता. त्यास बादशहाच्या नेमणुकीची बातमी कळली तेव्हां त्यास समाधान वाटलें. मराठ्यांच्या स्वारीच्या हेतूविषयीं त्याच्या मनांत शंका राहिली नाहीं. बेगम झिन्नत महाल अबदालीकडे गेली. त्यास तिनें सर्व हकीकत स्वतः सांगून, मराठ्यांशीं तह करावाच, अशी त्यास गळ घातली.

दिल्लींत ही खुशाली चालली होती तों इकडे मजल-दरमजल करीत आघाडीचे शिंदे-होळकर-विंचूरकर कुंजपुऱ्यास पोहोंचले. नजीबखान रोहिल्याचा भाऊ नजीबतखान किल्ल्याच्या बंदोबस्तासाठीं होता. अफगाण सरदार अब्दुल समदखां दहा हजार फौजेसुद्धां नुकताच पंजाबमधून रसद घेऊन आला होता व अबदालीकडे जाण्यासाठीं यमुनेचें पाणी उतरण्याची वाट पाहात होता. नजीबखानाचे गुरु व दत्ताजी शिंदे यांचा वध करणारे कुत्बशहा मदतीला होतेच. किल्ल्याच्या बाहेर त्यांचा तळ पडला होता. त्यावर आघाडीचे वीर कोसळले. ते दत्ताजीच्या वधाचा बदला घेण्याच्या त्वेषानें लढूं लागले, तेव्हां मदतीला असलेलें सैन्य व सरदार किल्ल्यांत पळाले.

यमुनेच्या दुसऱ्या तीरावर अबदालीची टेहळणीची फौज आलेली होती. तिनें मराठ्यांच्या हालचालींची बातमी अबदालीला कळविली. ती ऐकून अबदालीनें किल्लेदाराला पत्र लिहिलें कीं, " नदीचें पाणी उतरेपर्यंत तग धरा. " हीं पत्रें मराठयांच्याकडेच सांपडलीं. मग मुळींच वेळ न घालवितां मराठ्यांनीं मागें राहिलेला तोफखाना पुढें आणला. जलदीनें मोर्चे बांधले. इब्राहिमखान गारदी यांनीं तोफांचा अचूक मारा केला.

डोळ्याचें पातें लवतें न लवतें तोंच विजेप्रमाणें गोळे उडून तटावर पडले. किल्ल्याला खिंडार पडलें. लोकांना स्फुरण चढलें. ' हरहर महादेव ' गर्जना करीत दमाजी गायकवाड यांनीं खिंडारांतून घोडे आंत घुसविले. तीन बाजूंनीं किल्ल्यावर हल्ले झाले. मुडद्यांच्या राशी व रक्ताचे पाट ! कुंजपुरा सर झाला. गांव ताब्यांत आलें. किल्ल्यावर झेंडा चढला. ती तारीख १७ ऑक्टोबर १७६० ही होती.

लढाईत किल्लेदार नजीबतखान जखमी झाला व त्या जखमांनीं मेला. दत्ताजी शिंदे यांचा शिरच्छेद करणारे मिया कुत्बखां व अब्दुल सयदखां जिवंत सांपडले. त्यांचा शिरच्छेद करून मुडदे कोल्ह्यांपुढें टाकले ! पठाण, रोहिले, गिलचे यांची सुमारें दहा हजार फौज कापली गेली. शिल्लक राहिलेले दांतीं तृण धरून शरण आले. त्यांचीं शस्त्रें काढून घेऊन त्यांना मराठयांनीं घालवून दिलें.

फार मोठा विजय मिळाला. दिल्लीची कोंडी फुटली. ह्या सर्वांबरोबर मराठयांना सात लाख रुपये रोख, पांच हजार घोडे व उंट आणि हत्ती खूप

मिळाले. दहा हजार खंडी सांठवून ठेवलेला गहूं मिळाला. पैशाऐवजीं भुकेल्या फौजेला धान्यच पगार म्हणून देण्यांत आलें. स्वारांच्या घोड्यांना व तोफखान्याकडील बैलांना गवत, घास, दाणा पोटभर मिळाला. कुंजपुरा हातचा गेल्यानें पंजाबांतून शत्रूचा अफगाणिस्थानांत परत जावयाचा रस्ता बंद झाला. फौजेची शक्ति व हिंमत वाढली. दिल्लीनंतर पुन्हा एकदां इब्राहिमखान गारदी यांच्या तोफखान्याची बांकी करामत दृष्टीस पडली.


कुंजपुरा आनंदकुंज झालें !

☆ ☆ ☆

: १५ : हिंमत-इ-मर्दान मदद खुदा !

कमकुवत मनाचा कुणी लेचापेचा शत्रु असता
तर तो बसल्या ठिकाणींच गार झाला असता,
इतका जबरदस्त विजय भाऊसाहेब यांनीं कुंजपुऱ्यावर मिळविला होता. अबदालीच्या डोळ्यांदेखत त्याच्या बाजूच्या दहा हजार फौजेची कत्तल झाली; त्याचे शूर सहकारी पडले ! सांठविलेला दाणागल्ला गेला, रसद गेली, जनावरें गेलीं. स्वतः अबदाली दुआबामध्यें कोंडून पडला. पळून जायचें म्हटलें तर रस्तासुद्धां काफर मराठ्यांच्या हातांत पडलेला ! हिंदुस्थानांत शुजासारखे मित्रहि असे मिळालेले कीं, ज्यांचें लक्ष लढण्यापेक्षां तह करून पळण्यावर जास्त ! 'हिंदुस्थानांत या' म्हणून बोलावणाऱ्या नजीबखानाची अक्कल इतकी कीं, गंगा-यमुनेच्या दुआबामध्यें इतके दिवस घालवूनहि त्याला यमुनेंत एकहि सोयीस्कर उतार दाखवतां येईना ! हें सर्व पाहून अबदालीस फार चीड आली, खूप संताप आला !

सर्व बाजूंनीं आकाश कोसळलें तरी अबदाली घाबरला-डगमगला नाहीं. तो स्वतः कसलेला शिपाई व अनुभवी सेनापति होता. वयाच्या बारा-तेराव्या वर्षापासून अनेक लढायांच्या धुमश्चक्री त्यानें पाहिलेल्या होत्या. नादिरशहाचा तो चेला ! आठ-दहा वर्षांत चार वेळां येऊन हजारोंनीं लोकांच्या कत्तली करून, जाळपोळ करून, त्यानें कोट्यवधि रुपयांची



"चलो दोस्तो ! रास्ता मिला ! अल्लाने दिखलाया है !"

लूट नेलेली होती. या खाऱ्यांतून जातांयेतां त्यानें अनेक नद्या अनेक वेळां ओलांडल्या होत्या. त्या प्रत्यक्ष अनुभवामुळें नदी ओलांडण्याचें तंत्र त्याला स्वत:ला चांगलें माहीत होतें. धारिष्ट व साहस यांच्या जिवावर तर तो हिंदुस्थानांत आलेला होता.

त्यानें आपल्या सर्व सरदारांना जमविलें. त्यांना त्यानें विचारलें, "क्यों दोस्तो ? क्या गनीम शेर और हम बकरी बनें ? चलो काफरोंके कत्तल का बदला लेंगे...." अशा प्रकारें पठाणांच्या सूडाच्या भावना त्यानें चेतवल्या, अल्लाची प्रार्थना केली. छावणी मोडून, सामान गुंडाळून, त्यानें फौजेस आपल्याबरोबर चलण्याचा हुकूम केला. त्याची फौज यमुनेच्या उत्तर किनाऱ्यानें कुंजपुऱ्याच्या दिशेनें निघाली. दिल्लीपासून वीस मैलांवर बागपतजवळ फौजेचा मुक्काम पडला. रस्त्यांत ठिकठिकाणीं अबदाली स्वत: पाण्याचे ठाव घेत होता व नदीला उतार शोधीत होता.

बागपताचे जवळ यमुना नदीचें पात्र चांगलें चार-पांच मैल रुंद असून तिथें नदीच्या पाण्याचे लहानमोठे प्रवाह बनलेले होते. त्या पात्रांतील एक ठिकाण अबदालीनें निवडलें. त्यानें निवडलेली जागा

नेहमींच्या उताराची नव्हती. ठिकठिकाणीं पाण्यांत लाकडें पुरून त्यानें खोलीचे अंदाज घेतले.

त्यानें नदीच्या कांठावरील वाळूंत चादर आंथरली, गुडघे टेकले, हात आभाळाकडे केले, डोळे मिटून त्यानें अल्लाची प्रार्थना केली. उठून, चांदीच्या पत्र्यावर कांहीं चौकोनी आकृति काढून व त्यावर कुराणामधील मंत्र लिहून त्यानें ते पत्रे नदींत सोडले. स्वतःचे कपडे आवरले. बाजूला उभ्या असलेल्या घोडेस्वारांकडे निष्ठुरतेनें पाहात तो म्हणाला, "चलो दोस्तो, रास्ता मिला ! अल्लाने दिखलाया है ! इस बाजूसे आगे बढो !" घोडेस्वारांनीं घोडे पाण्यांत घातले. आणि विश्वास ठेवा अगर ठेवूं नका. घोडेस्वार नदीपार झाले !


त्या रस्त्यानें नदी उतरण्याचा अबदालीनें सर्व फौजेला हुकूम दिला. तोफखाना हत्ती-उंटांवरून नदीपार झाला. तो स्वतः मात्र, निम्मी फौज नदी ओलांडून अलीकडे आल्यावर आला. तीन दिवसांत सर्व फौज नदी-पार झाली. धांदलींत कांहीं स्वार पाण्यांत वाहवले. पण त्यामुळें कांहीं फार मोठें नुकसान झालें नाहीं. अबदालीस त्याच्या दैवानें हात दिला.

लष्करी कौशल्याच्या दृष्टीनें वाखाणणी करावी, अशी ही नदी ओलांडण्याची करामत अबदालीनें २५–२६ ऑक्टोबर १७६० रोजीं केली.

बागपतापाशीं जिथें अबदालीनें नदी ओलांडली, तिथें टेहळणीसाठीं मराठ्यांचीं लहान पथकें होतीं तीं पळून गेलीं.

नदीपलीकडे अबदालीनें दोन दिवस मुक्काम केला. रसद, रस्ते, सामान यांची व्यवस्था करून सूड घेण्याच्या ईर्षेनें मोठ्या त्वेषानें मराठ्यांच्या सैन्यावर हल्ला करण्यासाठीं अबदाली निघाला.

दिल्लीची कोंडी फोडून भाऊसाहेब कुंजपुऱ्यास गेले होते व त्यांनीं तो घेतला होता. यमुनेचें पाणी ओसरण्यास अजून महिनाभर तरी अवकाश लागेल, असा त्यांचा अंदाज होता. त्या महिनाभरांत ज्या ठिकाणीं भगवान् गोपालकृष्णानें अर्जुनास गीता सांगितली, त्या कुरुक्षेत्राची यात्रा करावी, अशी त्यांची व त्यांच्याबरोबरांच्या मंडळींची इच्छा होती. त्याच मुदतींत शीखांशीं गांठीभेटी घेण्याचाहि त्यांचा विचार होता. धान्य व गवताची सुबत्ता असल्यानें महिनाभरांत लष्कराची तयारीहि करून घ्यावी आणि



[भाऊसाहेब यांनीं कुंजपुरा घेतल्यावर अबदाली बागपतजवळ यमुना ओलांडून त्वेषानें त्यावर चालून आला. भाऊसाहेबहि कुंजपुऱ्याहून त्यावर धडकले. पण दोन्ही फौजांची दृष्टादृष्ट होतांच दोघेहि पानिपतजवळ थबकले आणि छावण्या करून राहिले. भाऊसाहेब गोविंदपंत बुंदेले यांना लिहितात: "अबदालीची हिंमत फार आहे; तरी त्यास गिळणार. लढाई लवकर होऊन येईल. तुम्ही जलदी यमुनेपलीकडून येऊन बागपतपर्यंत धमामा चालवून त्यास रसद न पोहोंचे, फौजेस शह पडेल तें करावें, रसद मारावी, गडमुक्तेश्वर वगैरे नजीबचे प्रांत जाळावे. अंतर्वेदींतून अबदाली निघाल्यामुळें तो प्रदेश मोकळा झाला आहे, तरी यमुनेपलीकडील प्रांतांतून त्यास येत असलेली रसद बंद पाडावी."

— ता. १ नोव्हेंबर १७६०.]

नदीचें पाणी उतरतांच अबदालीचा मोड करावा, असा त्यांचा विचार होता. त्यास अनुसरून त्यांनीं आग्रा ते कुंजपुऱ्यापर्यंतचे उतार-घाट अडवून धरले होते. वेळप्रसंगीं उपयोगी पडाव्या म्हणून नावाहि जमा करून ठेवल्या होत्या. पण त्यांचे सर्व विचार तसेच राहिले. अबदाली नदी ओलांडून चालून येतो, ह्या बातम्या येऊन धडकल्या.

भाऊसाहेब यांनीं तावडतोब आपला रोख बदलून माघारीं वळून अबदालीच्या रोखानें फौजेचा मोर्चा वळविला. स्वतः ते गोविंदपंत बुंदेले यांस लिहितात........ "अबदाली यमुना बागपताजवळ उतरला....तेथें तीन दिवस मुक्काम करून तो आज दोन-अडीच कोस पुढें आला. आपल्या सैन्याची आघाडी आणि पिछाडी यांत तो अंतर पडूं देत नाहीं. आम्हीं कुंजपुऱ्याहून पानिपतास आलों. अबदालीच्या सैन्यांत आणि आमच्या सैन्यांत अंतर थोडेंच आहे. त्याच्या आमच्या आघाडीच्या सैनिकांची गोळागोळी होते. याप्रमाणें तीन दिवस चालू आहे. दाणा दोन-अडीच शेर गिलच्याचे लष्करांत आहे. आमची हिंमत फार आहे. तरी यास गिळणार ! त्याच्याशीं लढाई लवकरच होऊन जाईल...."

(१ नोव्हेंबर १७६०).

पण भाऊसाहेब यांचे अंदाज चुकले. अबदाली खूप त्वरेनें, त्वेषानें पुढें आला. मराठ्यांकडून टेहळणी करण्यासाठीं पांच हजारांचें एक पथक बाजी हरी देशपांडे यांच्या हाताखालीं गेलें होतें. त्या पथकाचा अबदालीच्या सरदारानें फडशा पाडला. अबदालीची दौड, धडक व हिंमत पाहून भाऊसाहेब चकित झाले आणि पानिपतजवळ थबकले.

☆ ☆ ☆

: १६ : यवनास थोर भय झालें !

युद्धाच्या वेळीं न डगमगतां, योग्य असे निर्णय झटपट घेण्यांत व निर्णयाप्रमाणें तरतूद करण्यांतच सेनापतीचें खरें कौशल्य असतें. शत्रूच्या हालचाली, लढाईच्या

प्रदेशाचा भूगोल, लढाईच्या दिवसांतील ऋतुमान, हवामान व स्वतःच्या शक्तीचें पूर्ण ज्ञान; या सर्व गोष्टी डोळ्यांपुढें असल्या कीं कसलेला सेनापति शत्रूचे डावपेंच सहज हेरूं शकतो. प्रतिभावान् कवीप्रमाणें ते त्याला अगोदरच दिसूं लागतात. या डावपेचांना उधळून लावण्याच्या स्वतःच्या योजना झटपट आखून, त्या योजनांप्रमाणें सर्व तरतूद करून कुशल सेनापति विजयश्रीला स्वतःकडे खेचून आणतो. मात्र अंदाज किंवा तोंड देण्याची तरतूद यांत थोडी जरी चूक झाली, तरी पत्त्यांच्या बंगल्याप्रमाणें लढाई कोसळते, ती सांवरतां येत नाहीं, पैसा व प्राण यांची हानि होतेच होते. शिवाय पराभवाचें मापहि पदरांत पडतें तें निराळेंच !

कुंजपुऱ्याचा विजय हातांत पडला त्या वेळीं मल्हारराव होळकर यांनीं सल्ला दिला कीं, " येथें लूट, रसद मिळाली त्यावर समाधान मानून झटपट दिल्लीला परत फिरावें. तसें केलें म्हणजे स्वतःचा प्रदेश पाठीशीं घालून अबदालीशीं झुंजतां येईल, झुंजून त्याला मागें रेटतां येईल; अबदालीचा जोर झाला तर स्वतःच्या प्रदेशांत माघार घेतां येईल. माघार घ्यावी लागली तरी रसद तुटणार नाहीं. बरोबरच्या मुलामाणसांचे, बाजारबुणगे यांचे हाल होणार नाहींत. लढाईत त्यांची अडचणहि होणार नाहीं. अगदीं सहज निभाव लागेल." पण भाऊसाहेब यांनीं हें सांगणें विचारांत घेतलें नाहीं.

त्यांचा अंदाज निराळा होता. त्यांना वाटे, यमुनेचें पाणी अजून महिना पंधरा दिवस उतरणार नाहीं. पाणी उतरलें नाहीं तोंवर अबदालीस सैन्यासह नदी ओलांडतां येणार नाहीं. मग मल्हाररावांनीं सुचविल्या-प्रमाणें परत दिल्लीस जाण्याची घाई कशाला ?

पण हा अंदाज सपशेल चुकला ! धोका पत्करून नदीपार होण्याचें दिव्य अबदालीनें केलें ! जनावरें व सामानासह पाऊण लाख फौज नदी ओलांडून अलीकडे आली ! ज्या गोष्टीची कल्पनाहि भाऊ-साहेब यांनीं केली नव्हती, ती गोष्ट झटपट, अचानक झाली.

चुकलेला अंदाज व डाव सांवरण्यासाठीं भाऊसाहेब कुंजपुऱ्याहून दिल्लीकडे येण्यासाठीं सैन्यासह परत फिरले. परत फिरतांना त्यांचा दुसरा अंदाज असा होता कीं, एवढ्या मोठ्या फौजेस नदींतून पार होण्यास चांगले आठ-दहा दिवस सहज लागतील. शिवाय, त्यांच्यांत अव्यवस्था व


गोंधळहि झालेला असेल. या विस्कळीत अवस्थेंतच नदीकांठीं त्यांना गांठून तलवारीच्या धारेच्या पाण्यानें रक्तांत—किंवा ते मागें हटले तर यमुनेच्या पाण्यांत साफ बुडवून टाकावें, असा मनसुबा रचून भाऊसाहेब जोरांत परत फिरले.

पण पहिल्या अंदाजाप्रमाणें त्यांचा हा अंदाजहि चुकलाच ! तीन दिवसांत नदीपार होऊन, सर्व तरतूद करून अबदालीची जोरांत वाटचाल सुरूहि झालेली होती. शिवाय अबदालीनें आपल्या सैन्याचीं छोटीं छोटीं पथकें यमुनेचे उतार, घाट राखीत बसलेल्या मराठ्यांच्या सैन्याच्या तुकड्यांना हाकून देण्यास रवाना केलीं—त्या पथकांनीं आपली कामगिरी चोख बजावली.

भाऊसाहेब यांच्याकडून टेहळणी करण्यासाठीं बाजी हरी देशपांडे यांच्या हाताखालीं दोन-अडीच हजार स्वारांचें पथक पुढें पुढें हिंडत होतें. त्या पथकाशीं अबदालीच्या फौजेची गांठ पडली. दोघांची चकमक झाली. त्या वेळीं बाजी हरीच्या बातमीच्या पथकांतील बाराशें स्वारांचीं शिरें कापून नेलीं ! फारच थोडे लोक परत गेले.

अबदालीचा त्वेष व हालचालींची चपलता पाहून भाऊसाहेब यांना आश्चर्य वाटलें. एकदम चालून जाऊन लढाई करणें अवघड आहे हें त्यांच्या लक्षांत आलें. लढाई न देतां हुलकावणी देऊन दिल्लीकडे जावें, तर मराठ्यांच्या सैन्याबरोबर बाजारबुणगे, स्त्रिया, मुलें, यात्रेकरू इत्यादि बिनलढाऊ लोकांची गर्दीहि खूप होती. त्यांना बरोबर घेऊन दिल्लीकडे झुकांडी मारणें कठीणच होतें. या सर्व अडचणी पाहून पानिपत गांवाजवळ थांबावें, असें भाऊसाहेब यांनीं ठरविलें. पानिपत गांवाजवळ तंबू ठोकून मुक्कामाची जागा तयार केली. ती तयार होतांच तेथें मुक्काम केला.

फौजेची छावणी दहा-बारा चौरस मैल पसरलेली ! छावणी-भोंवतीं पन्नास हात रुंद व बारा हात खोल असा खंदक खणला गेला. त्यामधून निघालेल्या मातीच्या ढिगांवर तोफांचे मोर्चे चढविण्यांत आले. सर्व छावणीभोंवतीं तोफखाना पसरून छावणीचा बचाव करण्याची योजना करण्यांत आली. छावणीच्या पाठीमागून यमुनेचा कालवा जात होता, तो ताब्यांत असल्यानें छावणीस पाण्याची व्यवस्था उत्तम झाली.



पानिपताजवळील भाऊसाहेबांची छावणी

अबदालीची फौज तीन-चार मैलांवर असल्यानें रात्रीं-अपरात्रीं हल्ला येण्याचा संभव होता. म्हणून रात्रीं छावणीभोंवतीं घोडेस्वारांच्या पथकाचे पहारे असत.

इकडे अबदालीनेंहि मराठ्यांच्या समोरच आपच्या फौजेची छावणी केली. अबदालीनें लढाई करण्याचा प्रयत्न केला, पण तो यशस्वी झाला नाहीं. यमुनेच्या पलीकडील प्रदेशामधून रसद आणविण्याची व्यवस्था नीटनेटकी व्हावयाची होती. ती पूर्ण होण्यासाठीं लढाईची घाई न करतां अबदालीहि छावणींत स्वस्थ राहिला.

मराठ्यांच्या छावणींत उत्साह मात्र भरपूर होता. कुंजपुऱ्याकडील लुटीचें घबाड हातीं असल्यानें कशाचीहि चणचण नव्हती. मराठ्यांच्या स्थितीचें वर्णन स्वतः भाऊसाहेबच करतात कीं....“अबदालीची आमची गांठ पानिपताजवळ पडली आहे. तोफखान्याचा आराबा रचून लढाई करावयास तयारी केली आहे. त्याच्यानें (अबदालीच्यानें) इकडे तिकडे जाववत नाहीं व कांहीं करवत नाहीं. दीड-पावणेदोन कोसांची तफावत

उभयतांत आहे. पेंढारी व लुगारे व राऊत नित्य उंटें, घोडीं व तट्टे-बैल अबदालीच्या आघाडी-पिछाडीवरी जाऊन गोटापासून घेऊन येतात.... ”

(४ नोव्हेंबर १७६०)

सेनापतीपेक्षां सामान्य सैनिक, पथककरी यांचा उत्साह खूप होता. अशा सैनिकांपैकीं कृष्ण जोशी यांनीं परिस्थितीचें वर्णन व पुढील बेत याबद्दल फारच चांगला अभिप्राय लिहिला आहे. ५ नोव्हेंबर १७६० ला पानिपतच्या छावणीच्या मोर्च्यांतून कृष्ण जोशी लिहितात.... “ नित्य थोडें थोडें युद्ध होत आहे. श्रीमंतांहीं चोहोंकडे तोफखाना पसरला आहे. यवनास थोर भय जाहलें आहे. पुढें येववत नाहीं. आमचे सैनिक यवनाचे समक्ष उभे राहून, नित्य शेंपन्नास यवन मारून, उंट-घोडीं आणितात. दोन हत्ती पेंढारी यांनीं काल आणिले. यवनाच्या सैन्यांत रसद बंद झाली आहे. यामुळें (रुपयास) पीठ तीन शेर, चणे चार शेर, तूप अर्धा शेर याप्रमाणें महर्घ आहे. आमच्या सैन्यांत गहू सोळा शेर, चणे बारा शेर, तूप अडीच शेर, याप्रमाणें सवंगाई आहे. आणखी दोन-चार दिवसांत यवन चालोन तोफावरी येईल तर क्षणमात्र बुडेल. न ये तर आमचे लोक जाऊन युद्ध करणार. सर्व सैन्यांत उत्साह आहे कीं, अबदाली व नजीबखान व शुजा आठ चौ रोजांत क्षयास जातील. अबदाली शहानशा बहुत युद्धें केलेला, परंतु दो कोसांवरी येऊन आठ दिवस बसून कांहीं पराक्रम नाहीं. त्याजमुळें आमची फौज बहुत शेर आहे. अबदालीनें स्वदेशास जावें तर मार्ग नाहीं, युद्ध करावें तर परिणाम नाहीं. उगेच बसावें तर भक्षावयास नाहीं. याप्रमाणें विचारांत पडला आहे.... ! ”

मात्र इतका उत्साह, इतके नेट, इतकी स्वस्ताई असतांनाहि अगोदरचे दोन अंदाज चुकले असल्यामुळें कीं काय भाऊसाहेब छावणींत थबकले व दुसरे मनसुभे रचूं लागले !

☆ ☆ ☆

: १७ :

चकमकी

अबदाली व भाऊसाहेब दोघेहि चांगले लाख लाख फौजेचे धनी ! एकमेकांचा पाडाव-पराभव करण्यासाठीं दोघेहि टपलेले. दोघेहि एकमेकांच्या समोर डेरेदांडे उभारून, छावण्या करून बसले. तरी ते स्वस्थ थोडेच बसणार ? तुल्यबळ असल्यामुळें अगदीं निकाली नाहीं तरी झटापटीच्या लहानमोठ्या लढाया दोघांच्या सैन्यांत चालू होत्या.

पक्की बातमी मिळवून, नजर ठेवून, एकमेकांची रसद मारणें, छावणीच्या आजूबाजूला चरणारे घोडे, बैल, उंट पकडून आणणें; टेहळणी करीत फिरत असणाऱ्या शिपायांच्या टोळक्यांवर हल्ले करून मारामार करणें हें दोन्ही बाजूंनीं चालू होतें. त्यांत अबदालीच्या सैन्यांत शिस्त कडक असल्यामुळें त्याच्या छावणींतून सहसा कोणी बाहेर पडत नसे.

२२ नोव्हेंबर १७६० रोजीं कार्तिक शुद्ध पौर्णिमा होती. त्या दिवशीं चंद्रग्रहण होतें. संध्याकाळच्या वेळीं अबदाली यांचा वजीर शहावलीखान मराठ्यांच्या छावणीची टेहळणी करण्यासाठीं थोडी फौज बरोबर घेऊन छावणीजवळून फिरत होता. फिरतां फिरतां छावणीजवळच्या विहिरीजवळ तो थांबला. जवळच जनकोजी शिंदे यांच्या फौजेचे तंबू होते. शिंद्यांकडच्या लोकांनीं वजिरास ओळखलें व त्यावर निकराचा हल्ला केला. लढाई जुंपली. त्यांत वजिराकडचे बरेच स्वार कापले गेले. निभाव लागत नाहीं, असें पाहून वजिरानें शिलकी स्वारांनिशीं पळावयास सुरुवात केली. शिंदे यांचीं पलटणें वजिराचा पाठलाग करूं लागलीं; तीं थेट अबदालीच्या छावणीपर्यंत आलीं.

वजीर व त्याचे स्वार जीव घेऊन पळत आहेत व मराठ्यांकडील शिपाई त्यांचा पाठलाग करीत आहेत, हें अबदालीच्या छावणींतील शिपायांनीं पाहिलें. मग छावणींतील रोहिले, गिलचे मदतीला धावले !.... " उभय दलें एकमेकांवर आदळलीं. मराठ्यांनीं त्या दिवशीं शर्थ केली. शिंदे केवळ इरेस पडले. गिलचा मारून माघारा सारून गोटांत घातला, त्यांच्या तोफा कित्येक ओढून आणिल्या. रोहिले दुराणी यांचे हजार सैनिक ठार झाले.

त्यांचे घोडे-माणसें मिळून पांचशें जायां झाले. संध्याकाळ आली नसती तर तेच दिवशीं पारिपत्य उत्तम झालें असतें.... ! ”

इब्राहिमखान गारदी तोफखान्याच्या कामांत अगदीं तरबेज असेच होते. उंचवट्यावरच्या तोफांतून ते छावणीवर तोफा डागीत, त्यामुळें अबदालीच्या गोटांत खूपच हानि झाली. तोफांच्या करामतीचें वर्णन करतांना सेनापति सदाशिवरावभाऊ लिहितात : “ सरकारच्या मोर्चास व त्यांच्या मोर्चास बाणाबाणाची तफावत होती. इकडील मोर्चांनीं धमधमा बांधून त्यावरून तोफांचा मार दिला, तो त्यांच्या (अबदालीच्या) डेऱ्यापावेतों लागू होऊन माणसें घोडीं मरूं लागलीं. त्या भयानें ते दोन कोस मागें सरून गेले. आपले मोर्चे देखील उठवून नेले, हे त्याची हिंमत आहे.... ”


(६ डिसेंबर १७६०)

तोफखान्याच्या माराची कटकट वांचविण्यासाठीं व नदीपलीकडून येणाऱ्या रसदीशीं नीट संबंध जोडण्यासाठीं अब्दालीनें आपली छावणी उठवून चार मैल मागें घेतली.

छावणी मागें गेल्यामुळें मराठ्यांच्या तोफांचे गोळे अबदालीच्या छावणीच्या अलीकडे पडूं लागले.

ही अडचण दूर करण्यासाठीं ता. ७ डिसेंबर १७६० रोजीं मराठे तोफखान्याची नवी रचना करण्यांत गुंतले होते. तोफाहि मूळ छावणी-पासून ओढून पुष्कळ पुढें आणलेल्या होत्या. या नव्या हालचाली नजीबखान रोहिल्यानें पाहिल्या व अबदालीचा छावणी न सोडण्याचा हुकूम मोडून बाहेर पडून तोफांची रचना करीत असलेल्या मराठ्यांच्या फौजेवर त्यानें जोराचा हल्ला चढविला. तो सहन न होऊन मराठ्यांची फौज तोफा सोडून छावणीकडे पळूं लागली. हल्ल्याविषयीं गैरसावध असणारें मराठ्यांचें सैन्य नजीबखानानें मार देत ढकलीत अगदीं छावणीच्या खंदकाजवळ आणलें.

हें पाहून इब्राहिमखान गारदी व बळवंतराव मेहेंदळे यांनीं आप-आपल्या तुकड्यांसह मोठ्या त्वेषानें नजीबखानाच्या सैन्यावर उड्या घातल्या. लढाई खूप जोरांत झाली. “ तीन-चार हजार रोहिल्यांचीं



बळवंतरावांना गोळी लागली आणि ते घोड्याखालीं आले !

मुंडकीं उडालीं.... " मुडद्यांवर मुडद्यांचे ढीग पडले. रक्ताचे ओढे वाहवले. नाना फडणीस लिहितात : " ते दिवशींच शत्रूचें सर्वच सैन्य नाश पावावें, परंतु रात्र जाहली यामुळें राहिलें."

सैन्याचा असा भीम पराक्रम झाला. परंतु...." तशांत एकाएकींच बळवंतराव यांचे आयुष्याची दोरी तुटली. आयुष्याची मर्यादा जाली म्हणोन गोळी लागतांच घोड्यावरच प्राण निघोन गेला ! ठार होऊन घोडियाखालीं आले. तों दुराणीची गांठ पडली. त्यांनीं बळवंतराव यांचें शिर कापावयास उरावर पाय देऊन गळ्याची घाटी सोडविली. हें अनुचित पाहून खंडेराव नाईक निंबाळकर यांनीं त्या मुडद्यावर पडून शिपाई-गिरीची शर्थ करून मुडदा सोडविला !

बळवंतराव मेहेंदळे हे शूर व साहसी. भाऊसाहेब यांचे अगदीं उजवे हातच. ते रणांगणांत पडल्यामुळें लढाईत शत्रूचें नुकसान करूनहि सर्वांना फार हळहळ वाटली.

अशा लहानमोठ्या चकमकी दोन्ही सैन्यांत होत होत्या.

☆ ☆ ☆

सती ताईसाहेब मेहेंदळे

मरणाला न भिणाऱ्याला जर शूर म्हणावयाचें, तर समोर उभ्या नसणाऱ्या मृत्यूला आमंत्रण देऊन, त्याच्या हातावर स्वतःच्या जीवनाचा संकल्प सोडून निर्भयतेनें सती जाणाऱ्या स्त्रियांनाहि शूरच म्हटलें पाहिजे. अशा स्त्रियांचें शौर्य तर कांकणभर सरसच होय. म्हणूनच सती जाणाऱ्या स्त्रियांना वंदनीय मानतात.

बळवंतराव मेहेंदळे गोळी लागून लढाईत पडले. त्यांचें शव मोठ्या शिताफीनें सोडवून, पालखींत घालून फौजेच्या लोकांनीं वाजत गाजत छावणीकडे आणलें. भाऊसाहेब पेशवे व इतर मोठी मंडळी शवास सामोरी गेली होती. शव पाहून भाऊसाहेबांसुद्धां सर्वांना फार वाईट वाटलें.

बळवंतरावांच्या शवाची पालखी घेऊन बरोबरचे सर्व जण मेहेंदळे यांच्या तंबूपुढें थांबले. भाऊसाहेब यांनीं स्वतःच्या अंगावरची शाल जमिनी-वर आंथरली व त्यावर बळवंतराव यांचें शव पालखीमधून काढून ठेवलें.

तंबूंत बळवंतराव यांची बहीण व इतर स्त्रिया होत्या, त्यांनीं रडून एकदम आकान्त केला. बळवंतरावांच्या पत्नी ताईसाहेब खिन्न वदनानें, शांतपणें तंबूबाहेर आल्या. शवापाशीं बसून त्यांनीं मृत पतीचें डोकें आपल्या मांडीवर घेतलें; डोळ्यांत पाणी आणून बळवंतराव यांच्या तोंडाकडे पाहात त्या शोक करूं लागल्या : " इतके दिवस माझ्यावर प्रेम-ममता करून आतां मला सोडून कां गेलांत ? मजवर कां रागावलां ? निष्ठुर कां झालां ? एक शब्द तरी राव, माझ्याशीं बोला. " असे त्यांच्या तोंडून निघणारे शब्द ऐकून उभे असलेल्या सर्वांनाच गहिंवरून आलें. भाऊसाहेब यांच्याकडे पाहून ताईसाहेब निश्चयानें म्हणाल्या, " माझें सौभाग्य गेलें ! आतां एक दिवसहि मला राहावयाचें नाहीं. माझ्या सहगमनाची तयारी करावी. " ताईसाहेब यांचा निश्चय ऐकून त्यांच्याजवळच शोक करीत असलेला त्यांचा पुत्र आप्पा अगदींच गोंधळून गेला. " आई, आतां मला कोण आहे ? मला टाकून जाऊं नकास. मी कुणाच्या तोंडाकडे पाहूं ? " असें म्हणत त्यानें ताईसाहेब यांच्या गळ्यास मिठी मारली. " बाबा, आतां देवावर भरंवसा ठेव. मला मोहांत पाडूं नकोस ! " असें म्हणून ताईसाहेब यांनीं मुलास दूर केल.

भाऊसाहेब पुढें झाले. त्यांनीं आप्पाला जवळ घेण्याविषयीं ताईसाहेब यांना सांगितलें. मुलाच्या भवितव्यावर लक्ष देऊन सती जाण्याच्या निश्चयापासून मन दूर करावें, असें विनवलें.

" आतां हा आप्पा आपले पदरांत घातला आहे. तुम्हीच त्याचा प्रतिपाळ करा. मला सती जाऊं द्या. मायाजाळांत गुंतवूं नका. " असा आपला निश्चय ताईसाहेब यांनीं सांगितला. त्या तो पूर्ण करतील याबद्दल भाऊसाहेब यांच्या मनांत खात्री असल्यामुळें त्यांनीं सतीची तयारी करण्याविषयीं आज्ञा दिल्या.

भाऊसाहेब यांनीं बळवंतरावांच्या प्रेतयात्रेची तयारीहि सुरू करविली. ताईसाहेब आंत गेल्या. त्यांनीं नव्या नवरीप्रमाणें वस्त्रें, अलंकार घातले. कपाळावर मळवट भरला. उपाध्यायांनीं त्यांच्याकडून सती जाण्याचा संकल्प सोडविला. त्यांनीं सुवासिनींना हळदकुंकू, नारळ, फुलें यांचीं वायनें दिलीं. त्यांचें धैर्य व निश्चय पाहून अनेकांना धन्यता वाटली. अनेकांनीं त्यांचें दर्शन घेतलें. शेंकडों स्त्रियांनीं त्यांच्या पायांवर डोकें ठेवून सतीचे आशीर्वाद घेतले.

सर्व तयारी झाल्यावर स्मशानयात्रा निघाली. मागें ताईसाहेब घोड्यावर बसून निघाल्या. त्या तेजस्वी, पवित्र दिसत होत्या. त्यांच्यापुढें वाद्यें वाजत होतीं. मागून स्त्रिया व पुरुष चालले होते. रस्त्याच्या दोन बाजूंस उभे राहून फौजेंतील लोक सतीला नमस्कार करीत होते.

सर्व जण स्मशानांत पोहोंचले. मैदानांत चंदनाची चिता रचून ठेवलेली होती. त्या चितेवर बळवंतराव यांचें शव यथाविधि ठेवण्यांत आलें. जवळच अग्नि तयार केला होता. त्यास ताईसाहेब यांनीं आहुति दिल्या. अग्नीची प्रार्थना केली. हात जोडून सर्वांना नमस्कार करून ताईसाहेब चितेवर चढल्या. त्यांनीं बळवंतरावांचें मस्तक मांडीवर घेतलें. तें पाहून जमलेल्या मंडळींच्या डोळ्यांत अश्रु उभे राहिले. अनेकांनीं चितेस प्रदक्षिणा घातल्या. ब्राह्मण मंत्र म्हणूं लागले. अग्नि देण्याची वेळ आली. त्या वेळीं भाऊसाहेब पुढें झाले व म्हणाले, " ताईसाहेब, शास्त्राच्या संमतीनें अजूनहि चितेखालीं पुन्हा उतरतां येईल. " त्यावर " आतां एक क्षणभरहि वेळ लावूं नये,

मला जाऊं द्यावें. " असें म्हणून त्यांनीं आपली नजर आकाशाकडे वळविली. हातहि उंच आकाशाकडे केले.

भाऊसाहेब यांनीं आप्पास चितेस अग्नि देण्यास सांगितलें. शास्त्रमार्गे त्याच्या हातून करून उपाध्यायांनीं चिता पेटविली. खोबरें, कापूर, तेल, गवत यांच्यामुळें चितेनें भरकन् पेट घेतला. चिताग्नीमध्यें ताईसाहेब यांचा देह दिसेनासा झाला ! बळवंतराव व ताईसाहेब यांचे देह अग्नीनें दिव्यरूप झाले ! 'धन्य धन्य' म्हणत भाऊसाहेबांना व सतीला निरोप देणारे इतर हळूहळू परत फिरले. ताईसाहेब यांच्या निर्भय सहगमनाचा खोल ठसा इतिहासाच्या पानावर कायमचा उमटला.

☆ ☆ ☆

: १९ : डाव उलटला

शत्रु किती का मोठा असेना, त्याचें अन्नपाणी तोडलें कीं त्याचें मुंडकें तुटलेंच ! आणि तेंहि पुन्हा अगदीं तलवारीच्या फटकाऱ्याशिवाय ! व्यूह-रचना नाहीं, हाणाहाणी नाहीं, कीं मारामारी नाहीं. कांहीं नाहीं ! शहेन्शहा अहमदशहा अबदालीसहि त्याची रसद बंद करून उपासमारीनें जेरीस आणावा, अशी भाऊसाहेब यांची फार इच्छा होती. यमुना उतरून तो छावणी करून राहिला होता.

त्याच्या फौजेस यमुनेच्या पलीकडून, दुआब प्रांतांतून, रोहिल्यांच्या व शुजाउद्दौल्याच्या प्रदेशांतून रसद येत असे. ती तोडून टाकण्याची कामगिरी भाऊसाहेब यांनीं गोविंदपंत बुंदेले यांना सांगितली. रसद लुटतां लुटतां रोहिले व शुजा यांच्या प्रदेशांत जाळपोळ, लूट करावी, असेंहि त्यांनीं कळविलें.

पंतांनीं ही कामगिरी सुरू केली असती तर अबदालीची उपासमार झाली असती. त्याचे मित्र नजीबखान व शुजाउद्दौला हे दोघे आपआपल्या

प्रदेशाचें रक्षण करण्यासाठीं धावत गेले असते. इकडे अहमदशहा एकटाच सांपडला असता. त्याला वठणीवर आणणें हें काम अगदीं सहज करतां आलें असतें. म्हणूनच भाऊसाहेब गोविंदपंतांना त्याबद्दल सारखें लिहून आज्ञा करीत होते.

गोविंदपंत बुंदेले थोरल्या बाजीरावाच्या कारकीर्दीपासून उत्तर हिंदुस्थानांत कामगिरीवर होते. प्रथम ते साधे कारकून होते. चांगला कारभार करून पुढें ते मोठ्या लौकिकास पोहोंचले, कमावीसदार झाले. ते पेशव्यांकडे नियमित रसद रवाना करीत असत. रसदीचा दरसालचा ऐवज दोन लाखांपासून चौदा लाखांपर्यंत होता. पेशव्यांनीं त्यांस ह्या नियमितपणाबद्दल पालखी, अबदागिरी देऊन त्यांचा गौरव केलेला होता. पंत खूप बहुश्रुत, तोंडाचे गोड व झटपट काम करणारे होते. बुंदेलखंडांतील मराठ्यांच्या प्रदेशास रोहिले व शुजाउद्दौला यांनीं त्रास देण्यास सुरुवात केली, तेव्हां पंतांनीं थोडीफार शिपाईगिरी करून त्यांचा बंदोबस्त केला होता. त्यामुळें त्यांचा लौकिक मोठा होता. मात्र त्यांना धनलोभहि फार होता.

भाऊसाहेब दक्षिणेंतून निघाल्यापासून त्यांनीं गोविंदपंतांना अनेक कामें सांगितलीं होतीं. त्यांच्याकडे नावा मागितल्या, हत्यारें दारूगोळा मागितला, रसद मागितली, खजिना मागितला, तोफेसाठीं बैल मागितले. यांतलें कांहीं थोडेंफार त्यांनीं पोहोंचतें केलेंहि! पण भाऊसाहेब यांना हवीं होतीं तशीं मात्र सर्व कामें लागीं लागलीं नाहींत. त्यांतच अबदालाची रसद बंद करायची व नजीबखान व शुजा यांच्या प्रदेशांत शह घावयाचा हीं कामें त्यांना जमलीं नाहींत.

भाऊसाहेब गोविंदपंतांना लिहितात : "तुम्ही जलदीनें यमुनेपलीकडून येऊन बागपतेपावेतों हमामा चालवून अबदालीस रसद न पोहोंचे, फौजेस शह पडे ऐसें करावें...." (१ नोव्हेंबर १७६०)

पुन्हा लिहितात : "रसद मारावी. गडमुक्तेश्वर, शामळी वगैरे नजीबखानाचे प्रांत जाळावे. मागें रसद बंद होऊन मुलुकाचा बोभाट होय, असें जरूर करणें. इरेस धरून तडकून येऊन काम करणें."

(१ नोव्हेंबर १७६०)


पण गोविंदपंतांच्यानें हीं कामें रेटलीं नाहींत. एक तर पंत खरे

जातिवंत कारकून. लढाईच्या कामांत ते वाकबगार नव्हते. शिवाय हीं काम करील अशी मोठी, चलाख फौजहि त्यांच्या पदरीं नव्हती. पंतांचें वय या वेळीं साठ-पासष्ट होतें ! तिसरें, नजीबखान व शुजाउद्दौला हेहि गाफील नव्हते. आपआपल्या प्रदेशाचा बंदोबस्त त्यांनीं केलेला होता. गोविंदपंतांच्या हालचालीवर त्यांचें चांगलें लक्ष होतें.

इकडे नजीखानाकडे हेरांनीं बातम्या आणल्या कीं, " गोविंदपंत रोहिल्यांच्या मुलुखांत पैसा व रसद गोळा करीत आहेत. " अबदालीच्या सल्ल्यानें अताईखान या ताज्या दमाच्या अफगाण सरदारास पंतांच्या बंदोबस्तासाठीं रवाना करण्यांत आलें.

इकडे पंत सावकाश रसद, पैसा गोळा करीत होते. शत्रूकडील कुणी आपल्या पाठीवर आहे, याची त्यांना कल्पनाच नव्हती.... " तों अविंधांनीं घोडीं घातलीं, सरमिसळ जाहले. गोविंदपंतांस घोड्यावर बसावयाचा अवकाश थोडा होता. कोस अर्धा कोस पळाले तों गोविंदपंत घोड्यावरून खालीं पडले ! त्या वेळीं कांहीं मातबर माणसें होतीं, त्यांनीं घोड्यांवरून उड्या टाकून गोविंदपंतांस पुन्हा घोड्यावर घातलें. तेथून पुढें आणखी कोसभर सांभाळून नेलें. तों शत्रूची दाटी भारी झाली. तमाम शिर कापीत सुटले. त्या वेळीं पुन्हा गोविंदपंत घोड्यावरून खालीं पडले. पाय मोडला. उठावयास हिंमत नाहीं. लोकांस उड्या टाकून यांना काढावयाचें अवसान पुरेनासें जाहलें. त्यांचा पुत्र होता तो टाकून गेला, तेथें दुसऱ्यावरी शब्द कशास ठेवावा ?....गोविंदपंत पाडाव सांपडले. त्यांच्या व खाशाच्या गांठी पडल्या. त्यांस गोविंदपंत अजीज होऊन, बहुत काकुळती येऊन, मजला प्राणदान देणें, क्रोड रुपये देतों, म्हणोन बोलिला. पण ते काळदैत्य, त्यास करुणा कैची ? तात्काळ शिरच्छेद करून धड तेथेंच ठेवलें ! आणि शिर घेऊन गेले. ते समई दीड हजार फौजेचीं शिरें कापिलीं. "

ही डिसेंबरची २० तारीख होती........ गोविंदपंतांचें शिर रुमालांत घालून अबदालीनें भाऊसाहेब यांना नजर म्हणून पाठविलें ! आणि वर निरोपहि पाठविला कीं, ' आतांपर्यंत पृथ्वीतलावर गोविंदपंतांनीं आपली व्यवस्था पाहिली. आतां दुसऱ्या जगांत आपल्या आगमनाची पूर्व-



अब्दालीनें गोविंदपंतांचें शिर भाऊसाहेबांना नजर म्हणून पाठविलें !

तयारी करण्यासाठीं पंतास पुढें स्वर्गात पाठविलें आहे. ' भाऊसाहेब यांना फारच वाईट वाटलें. त्यांनीं शिराचें यथाविधि दहन करविलें !

शिरच्छेद होण्याच्या आधीं गोविंदपंतांनीं चार लाख रुपयांचा खजिना भाऊसाहेब यांचेकडे पाठविण्यासाठीं दिल्लींत नारो शंकर यांचेकडे दिलेला होता. अबदाली मधेंच तळ देऊन बसलेला. त्यासाठीं मोठ्या हुशारीनें नारो शंकर थोडा थोडा खजिना गुप्तपणें, रात्रीं बे-रात्रीं रवाना करीत.

पंतांनीं पाठविलेल्या चार लाख रुपयांपैकीं एक लाख वीस हजार रुपये मानाजी पायगुडे यांच्या पलटणींतील स्वाराबरोबर ३१ डिसेंबर १७६० रोजीं पाठविले ते भाऊसाहेब यांना पोहोंचले.

नंतर २ जानेवारी १७६१ रोजीं नारो शंकर यांनीं पुन्हा तीन लाख दहा हजार रुपयांच्या थैल्या मल्हारराव होळकर यांच्या फौजेंतील पाराशर दादाजी यांच्याबरोबर रवाना केल्या. सोयीसाठीं प्रत्येक स्वाराबरोबर पांचशेंची थैली दिली. शिवाय बंदोबस्त-संरक्षणासाठीं पंचेचाळीसशें स्वार घेऊन ते निघाले.

शत्रूच्या जवळून जावयाचें असल्यानें रात्रीच्या अंधारांतून गुपचूप जावें, म्हणून ते खजिना व फौज घेऊन संध्याकाळीं दिल्लीहून निघाले. रात्रभर चालून ते पानिपतजवळ आले.

त्याच दिवशीं अबदालीची कांहीं फौज मुख्य छावणी सोडून दिल्लीच्या रस्त्यावर येऊन उतरली होती. ही गोष्ट पाराजीपंतांस ठाऊक नव्हती. चौकशी करावी म्हणून लांबून त्यांनीं स्वार पाठविला. त्यास अबदालीच्या लोकांनीं हा इब्राहिमखान गारदी यांचा गोट आहे, असें खोटेंच सांगितलें ! तें पाराजीपंतांच्या स्वारांना खरें वाटलें. ते निर्धास्तपणें खालीं उतरले. थंडीचे दिवस होते. त्यांनीं शेकोट्या पेटवून घोडीं शेकाजवळ उभीं केलीं. स्वार थंडीनें आंखडलेले हातपाय शेकूं लागले. कुणी चिलमी भरून तंबाखू ओढूं लागले. गैरसावध असतांनाच कापाकापी सुरू झाली ! अबदालीच्या लोकांनीं स्वारांचीं डोकीं कापून कत्तल केली ! घोडीं घेतलीं. खजिना आयताच सांपडला ! एवढ्या लोकांमधून फक्त पाराशर दादाजी दिल्लीस परत गेले !

असा सर्व डाव भाऊसाहेब यांच्याच अंगावर उलटला ! अबदाली-ऐवजीं त्यांचीच रसद बंद झाली. गोविंदपंत वारल्यामुळें थोडीफार मदत येण्याची जागाहि बंद झाली !

जो प्रसंग भाऊसाहेब यांनीं अबदालीसाठीं मनांत योजला होता, तो त्यांच्यावरच गुदरला !

☆ ☆ ☆

: २० : लष्कर गलबललें

सैन्य चालतें पोटावर, पोट चालतें भाकरीवर, भाकरी मिळतें पैशानें आणि पैसा मिळतो पराक्रमानें. पराक्रम गाजविण्यासाठीं तर सैन्यानें चालून जावयाचें ! असें हें सैन्य-पोट-भाकरी-पैसा आणि पराक्रमाचें चक्र आहे ! यांपैकीं एखादी बाब

जरी कमी पडली तरी तें चक्र कोलमडून पडतें ! मग बाजू सांवरतां सांवरत नाहीं.

पराक्रम करण्यासाठीं मराठी सैन्य पानिपतला आलें. तिथें छावणी करून बसलें. छावणीभोंवतींचा खंदक आणि त्याच्याबाहेर पसरलेला तोफखाना यांच्यामुळें छावणीचें रक्षण झालें. पण छावणींत बंद होऊन पडलेल्या हजारों माणसांना व जनावरांना लागणारें अन्न, धान्य, गवत, चंदी, सरपण व पैसा सर्व कांहीं बाहेरून आणावें लागे ! थोडीफार रसद पुरविणारे गोविंदपंत तर गेले ! दिल्लीकडून चोरूनमारून कांहीं यावयाचें, तो रस्ता बंद झाला. मागें जंगल. तिकडून कांहीं येत नव्हतें. अबदालीनें सर्व रस्ते पक्के रोखले. गिलच्यांच्या टोळ्या मराठ्यांच्या छावणीभोंवतीं फिरूं लागल्या. जर कुणी बाहेर आला तर ते मुंडकेंच उडवीत. त्यामुळें छावणी-मधून बाहेर पडणेंहि बंद झालें. पत्रांची ये-जा बंद पडली. खजिना संपला ! तेव्हां भाऊसाहेब यांनीं स्वारीबरोबरचे चांदी-सोन्याचे दाग-दागिने आटवून नवीन रुपये पाडून लोकांना खर्चाला दिले. त्यावर जेमतेम आठवडा दोन आठवडे निभावले !

छावणीच्या पाठीमागें पानिपत गांव होता. गांवाभोंवतीं बागा होत्या; पण त्यांत कांहीं शिल्लक राहिलें नाहीं. बागांतील झाडें गेलीं, पालापाचोळा गेला, गांवांतील घरावरचे वासे, दारें, छपरें–सर्व सैन्यानें काढून नेलें. मुलूख वैराण झाला तरी भागेना. कसें भागणार ? चांगलीं लाख सव्वालाख माणसें व हजारों जनावरें ! त्यांना काय म्हणून नको ! सर्वच हवें ! आणि पाहावें तों सर्वच दुर्मिळ ! !.... " दाणापाणी याची रसद फौजेंत पोचेनाशी जाहली. आणि जामदारखान्यांतील खजिना झाडून उडाला. अन्न-दुष्काळ, दाम-दुष्काळ दोन्ही एक जाहाले. मनुष्यास अन्नाचें खोबरें झालें. दिवसामध्यें अर्ध पाव अन्न मिळेनासें झालें. घोडे मनुष्यांची हिंमत. माणसास मिळेना, तेव्हां हत्ती-घोडे यांचा विचार काय पाहावा ? लष्कर जेरीस आलें ! तमाम फौजेंत निरवानिरव बोलूं लागले. जगून परत जाऊं, असा भरंवसा नाहींसा झाला...."

" लष्कराभोंवतीं दोनशें कोसांचा टापू उजाड पडला. उपाय चालेना.... "

नाना फडणीस छावणींतच होते. ते लिहितात : "…. या दोन महिन्यांत (डिसेंबर १७६० व जानेवारी १७६१) मनुष्यें पशु बहुत मेले. अन्नाची महर्गता. दुर्गंधी एकाच ठिकाणीं, असे श्रम पावले ! "

" (शत्रु) मोठे दगेबाज, याजकरितां आरब पसरून खंदक खणून मोंगलाई रीतीनें राहिले आहेत. दोन महिने लढाई यांची होते. अद्यापि लढावें हाच निश्चय उभयता पक्षीं झाला आहे. ईश्वर काय परिणाम लावील तो खरा. मनसबा भारी पडला आहे. पैसा नाहीं. महागाई फार. त्यामुळें लष्कर गलबललें आहे. " (२९ डिसेंबर १७६०).

गलबललेल्या लष्कराला हिंमत देण्यासाठीं व जखमी-आजारी यांची जातीनें चौकशी करण्यासाठीं भाऊसाहेब व विश्वासराव छावणींतून फेरफटका करीत असत. खिन्न शिपायांना ते उत्तेजन देत.

केवळ दिवसांच नव्हे तर, छावणीभोंवतींचे पहारे सावध आहेत किंवा नाहींत ते पाहात, कुणी फितूर छावणींत कांहीं घातपात करीत नाहीं ना, याचा शोध घेत भाऊसाहेब एकटेच छावणींत रात्रींहि फिरत असत.

* * *

पौष महिन्यांतील मध्यरात्र संपून गेलेली होती. मराठयांच्या छावणींत अंधार पसरलेला होता. थंडीचा कडाका चांगलाच पडलेला होता. सर्वत्र शांतता होती. पण मध्येंच कुत्र्यांचें भुंकणें, रडणें किंवा थोड्याशा अंतरावर कोल्हेकुई ऐकूं येत होती. ओरडण्याच्या दिशेनें कुणी तरी नजर टाकीत होते, पण अंधारांत त्याला कांहीं दिसत नव्हतें. मरून उघड्यावर सडत पडलेल्या प्राण्यांची दुर्गंधी मात्र वाऱ्याच्या झुळुकीबरोबर चांगलीच जाणवत होती. पाय न वाजवतां, अंधाराकडे डोळे फोडून पाहात एक उंच, भक्कम व्यक्ति हळूहळू पण चाहूल लागूं न देतां शिपायांच्या राहुट्यां-जवळून जात होती. त्या व्यक्तीनें शालजोडी लपेटून डोकें, अंग झाकून घेतलेलें होतें.

शिपायांच्या एका राहुटींत कुजबुज ऐकूं येत होती. कुजबुजीचा कानोसा घेण्यासाठीं ती व्यक्ति थांबली. राहुटींत संवाद जरी हळू आवाजांत चाललेला होता तरी थंड वेळेमुळें तो चांगला ऐकूं येत होता.

" सटवा, अरं सटवा, डोळा लागला कां रं ? "

" छे ! नाहीं रे आनंदा ! झोप म्हणून लागत नाहीं गड्या आतांशा ! परवां घोडं वैरणीवांचून तडफडून मेलं, तेंच सारखं माझ्या डोळ्यांपुढें दिसतं. आणि माझ्या बी पोटांत दोन दिवस अन्न नाहीं. नुसतें पडून हातापायाला सज आली आहे. अंग तर लईच ठणकत आहे. कशी रे लढाई आपल्याच्यानं होणार आतां सटवा ? "

" अरं, कसली लढाई घेऊन बसला आहेस आनंदा ? भाऊसाहेब पडले आहेत इरेला ! आणि त्यापायीं आज आपण मात्र अन्नाला मोताद होऊन सडत पडलों आहोंत इथं. मला तर गड्या असं वाटतं कीं, सकाळींच उठावं, कचेरीला जावं अन् सरळ रावसाहेबांना सांगावं : महाराज, पोटाला उपास घालून जीव कां घेतां ? लढाईला तरी धाडा. एवींतेवीं मरायचंच, मग असं सडून मरण कशापायीं ? तलवारीच्या घावानें मरण आलं तर नांव तरी होईल ...."

" बस कर सटवा, लई बोलूं नये माणसांनीं. तुझ्याहून लई शहाणे आहेत भाऊसाहेब अन् रावसाहेब—त्यांना चाललाय् सल्ला द्यायला. गप्प पड, लागेल डोळा आतां ! "

आंतला आवाज थांबला, तशी बाहेर संवाद ऐकत असलेली उंच धिप्पाड व्यक्ति झटकन् अंधारांत सटकली. काय आवाज झाला म्हणून पाहावयास सटवा बाहेर आला. त्याला कांहीं दिसलं नाहीं. कानांवर फक्त शब्द आले...." शिव शिव ! "

☆ ☆ ☆

: २१ : इमान हीच आमची जात !


वाघाला पिंजऱ्यांत कोंडावें, तसें मराठ्यांचें सैन्य अबदालीनें छावणीच्या कोंडवाड्यांत कोंडलें. जनावरें दावणीला लागलीं, घोडे ठाणबंद झाले आणि कर्तीसवरतीं माणसें स्वस्थ बसून उठवणीला आलीं. " पिंजऱ्यामाजीं वाघ सांपडे, पोरेंटोरें मारिती

खडे !" तसे नजीबखान, शुजाउद्दौला लढाई करायला अधीर झाले. पण अबदालीनें त्यांचें मुळींच ऐकलें नाहीं. युद्धकलेंत निपुण असणारा अबदाली लढाई न करतां सावधपणानें स्वस्थ बसला. उपासमारीनें दिवसेंदिवस मराठ्यांच्या सैन्याची शक्ति कमी होत होती. शरीराच्या शक्तीबरोबर मनाची हिंमतहि गळेल, असा त्याचा कयास होता.

भाऊसाहेब यांना मात्र आतां सुटकेचे दोन मार्ग होते. पहिला आणि सोपा म्हणजे अबदाली सांगेल त्या अटी निमूटपणें कबूल करून तह करण्याचा व दुसरा मार्ग म्हणजे अबदालीवर तुटून पडून, वाट काढून सैन्यासह दिल्लीला जावयाचा.

कचाट्यांत सांपडलेल्या मराठ्यांना सोडण्यास अबदाली तयार नव्हता. मानहानीच्या अटी लादून घेण्यासाठीं मराठे हिंमत हरलेले नव्हते. त्यामुळें पहिला उपाय सुटला !

मल्हारराव होळकर, जनकोजी शिंदे, दमाजी गायकवाड, विंचूरकर, पवार, भापकर असे अनुभवी सेनापति, वीरशिरोमणि मराठ्यांच्या फौजेंत होते. सर्वांनीं एके ठिकाणीं बसून खूप विचार केला....शेवटीं बेत ठरविला कीं...." आतां कुजून मरूं नये. गिलच्यांचें बळ दिवसेंदिवस बहुत होत चाललें. आणि आपलें लष्कर झडत चाललें. मातबर मनुष्यें गेलीं. घोडींहि बहुत मेलीं. याजकरितां पायउतारा जाहाले. आतां एक वेळ हा मुक्काम सोडून बाहेर मोकळे रानीं निघून जावें, दिल्लीचा रस्ता सोडून दुसरीकडे जावें, तरी झाडी मातबर आहे. मार्ग नाहीं. तोफखाना नेतां येणार नाहीं. यासाठीं दिल्लीचे रस्त्यानें जाण्याचा मार्ग उत्तम आहे. परंतु वाटेवर गिलच्यांचा मुक्काम राहिला आहे. ते जाऊं देणार नाहींत. यास्तव बंदोबस्तानें निघोन जावें. नदी पाठीशीं घालून पुढें गिलच्यांचे तोंडावर तोफखाना ठेवावा. सर्व बुणगेसुद्धां झुंज देत मारीत मारीत जावें. पुढें मुक्काम जाहल्यावर दिल्लीकडून सरंजामहि येऊन पोंचेल. लष्कर आबादान जाहल्यावर पुन: गिलच्यांचें पारिपत्य करावें....'' या सर्व योजनेंत तोफखान्याचेंच खरें साह्य होणार होतें. तोफखान्याचे मुख्य इब्राहिमखान गारदी यांनीं सांगितलें कीं, "सर्वत्र एकदिलानें वर्तावें. गोल बांधून मध्यें बुणगे घालावे. चहूंकडून चार सरदार मातबर देऊन जिकडील



" हा इब्राहिमखान मरण पत्करील, पण निमकहराम होणार नाहीं ! "

तिकडे बाजू वांटून घावी. कोस दोन कोस लढत भिडत दिल्लीस जाऊन पोहोंचावें ! "

या गोल बांधून दिल्लीला जाण्याच्या योजनेची मुख्य जबाबदारी तोफखान्यावर व तोफखान्याचा प्रमुख इब्राहिमखान गारदी याच्यावर होती.

तो स्वतः कुशल योजना करणारा, शूर योद्धा तर होताच, पण इतर सर्व गुणांपेक्षा इब्राहिमखान याची स्वामिनिष्ठा व इमानीपणा हे गुण विशेष गौरव करण्याइतके मोठे होते.

इब्राहिमखानाच्या कवायती पलटणाची शिस्त, तोफांचा अचूक मारा करण्याचें कौशल्य अबदालीस मागें दिल्लीस, कुंजपुऱ्यास व आतां दोन महिने पानिपतावर चांगलेंच पाहावयास सांपडलें होतें. इब्राहिमखानाच्या तोफांमुळेंच भाऊसाहेबांच्या छावणीचें रक्षण होत होतें.

इब्राहिमखानाला मराठ्यांच्या सैन्यांतून फोडून आपल्या बाजूला आणतां आलें तर मराठ्यांच्या सैन्याचा धुव्वा उडवितां येईल, असा विचार करून अहमदशहा अबदालीनें खास दूत इब्राहिमखानाकडे पाठविला. दूतानें बरोबर आणलेलीं अहमदशहाचीं खास पत्रें इब्राहिमखान गारदी यांचेकडे

दिलीं. पत्रांत लिहिलें होतें....“ तुम्ही आम्ही एक जात. या समयीं आम्हांकडे यावें. तुम्हांस पंचवीस लाख रुपयांचा मुलूख देतों. पादशाही उमराव किताब देतों ! ”

पैसा, मान, इस्लामच्या रक्षणासाठीं जातभाईशीं मिलाफ— किती तरी आमिषें. कुणी हलक्या मनाचा लोभी असता तर ताबडतोब फितूर झाला असता. फितूर होऊन, छावणीकडे तोफांचीं असणारीं तोंडें मराठ्यांच्या छावणीकडे वळवून गारद्यांनीं तोफा उडविल्या असत्या, तर एका क्षणांत युद्धाचा निकालच लागला असता.

पण इमान हीच खरी इब्राहिमखान यांची जात. मग त्यांचा जन्म मुसलमान आई-वडिलांच्या पोटीं झालेला असेना का ! असें सांगतात कीं, त्यांनीं अबदालीस निरोप घेऊन आलेल्या दूताजवळ फक्त कमरेची कट्यार दिली. दूत पुनः पुनः निरोप मागूं लागला, तेव्हां संतापून गारदी म्हणाले, “ अरे जा, अबदालीला सांग कीं, इब्राहिमखान वेळ पडली तर मौत पत्करील; पण किताब, जहागीर, पैसा यांना भुलून तो कधींच निमकहराम होणार नाहीं. आणि तुम्ही-आम्ही एकजातीचें असलों आणि भाऊसाहेब काफर हिंदु असले, तरी ते दिल्लीच्या पादशहाची इज्जत करतात व सध्यां असंख्य यातना सोसून ते बादशाहीसाठींच झगडत आहेत. तुम्ही मात्र स्वतःच्या जातभाईची–बादशहाची इज्जत मागेंच लुटून नेली आहे. तुम्हीच चोर, लुटारू आहांत, परदेशी आहांत. माझे जातभाई असलां तरी पारिपत्य करूं. सोडणार नाहीं. फितुरीच्या हलकट गोष्टी इतःपर काढूं नयेत........”

पानिपतच्या मोहिमेच्या वेळीं भाऊसाहेब यांच्या हातून कमीअधिक चुका झाल्या असल्या, तरी त्यांची इब्राहिमखानाची निवड मात्र अगदीं बिनचूक अशीच म्हणावी लागेल.

इब्राहिमखान खरा निजामाच्या पदरीं उदयाला आला, वाढला. फ्रेंचांच्या हाताखालीं त्यानें कवायतींचें व तोफखान्याचें शिक्षण घेतलें. त्याचें संघटना-कौशल्य पाहून निजाम त्याच्यावर फार खूष असे. १७५८-मध्यें निजामाच्या दरबारीं असणारा मुसा बुसी पांडेचरीला गेला. त्याच्या जाण्याबरोबर इब्राहिमखानाचेंहि बिनसलें. तो निजामाकडची नोकरी

सोडून पेशव्यांकडे नोकरीस आला. भाऊसाहेब यांनीं त्याचा खूप आदरसत्कार केला.

उदगीरची लढाई भाऊसाहेब यांनीं तोफा मारून जिंकली ! पानिपतच्या मोहिमेंतील कुंजपुरा, दिल्ली या ठिकाणच्या लढाईत तोफांची करामत सर्वांच्या चांगलीच नजरेंत भरली. तोफांमुळें छावणीचा बचावहि उत्तम झाला.

त्या तोफांवर व इब्राहिमखानावर विश्वास ठेवून " गोल बांधून मधें बुणगे घेऊन भिडत लढत दिल्लीला पोहोंचण्याची " मसलत भाऊसाहेब यांनीं सरदारांच्या विचारानें पक्की केली.


१० जानेवारी १७६१ रोजीं मकरसंक्रांतीचा सण होता, तो सर्वांनीं आनंदानें साजरा केला. नंतर सर्व व्यवस्था नीटनेटकी करून पौष शु० ८ शके १६८२ (तारीख १४ जानेवारी १७६१) या दिवशीं मराठ्यांची फौज मोठ्या तयारीनें शत्रूची फळी फोडून निघून जाण्यास छावणींतून बाहेर पडली.

☆ ☆ ☆

: २२ : शिरकमळें हींच भूलिंगास कमळें झालीं !

पानिपतचें युद्धक्षेत्र फार पुरातन. कौरव-पांडवांच्या युद्धापासून या रणक्षेत्रावर खूप लढाया झालेल्या होत्या. या रणक्षेत्रावर छावणी करून दोन महिने राहिलेल्या मराठ्यांनीं शेवटीं युद्धाचा निश्चय केला. " लढत भिडत अबदालीला बगल देऊन दिल्लीला पोहोंचण्याची " योजना आखली. निश्चय झाला !

पण ती योजना सहजासहजीं पार पाडतां येणार नव्हती. इतके दिवस उपासमारीनें जर्जर करून बरीच मनुष्यहानि आणि जनावरांचें नुकसान केल्यानंतर अबदाली मराठ्यांना निसटून जाऊं देण्यास मुळींच तयार नव्हता. मराठ्यांचा पूर्ण पराभव करावा, हीच त्याची मनापासूनची इच्छा होती.



[पानिपतच्या रणांगणावर समोरासमोर उभीं ठाकलेलीं सैन्यें : क्रमांक १ ते १३ मराठ्यांचें सैन्य असून त्यांत क्रमांक १ येथें इब्राहिमखान गारदी, क्रमांक ५ येथें भाऊसाहेब आणि विश्वासराव, आणि क्रमांक १३ येथें मल्हारराव होळकर आहेत. क्रमांक १४ ते २७ अब्दालीचें सैन्य. त्यांत क्रमांक २२ येथें नजीबखान असून सैन्याच्या मागें क्रमांक २७ जवळ अब्दालीचा तंबू आहे. ↓↓↓↓↓ या खुणा तोफखान्याच्या ओळी दाखवितात. → → अशा बाणांनीं हल्ल्याच्या दिशा दाखविल्या आहेत.]

मराठ्यांच्या लष्करांत दिल्लीकडे निघण्याची तयारी रात्रभर सुरू होती. सामानासुमानाची बांधाबांध करणें, निरोप घेणें. प्रत्यक्ष लढाईच घायचा प्रसंग आला तर ती कशा प्रकारें करावयाची, यांच्या योजनांत-विचारांत सर्व छावणी गढून गेली होती. सरदारांनीं आपआपल्या सैन्यास त्यांच्या त्यांच्या जबाबदारीची जाणीव करून दिली.

भल्या पहाटेस नौबतीचा इशारा झाला. तो ऐकून निरनिराळे सरदार आपआपल्या सैन्यासह तयार होऊन निघाले. कुणीं जाळीदार चिलखतें घातलीं, कुणीं चामड्याचीं बख्तरें घातलीं, डोक्यावर शिरस्त्राणें, टोप घातले,...." कुणी हातीं पट्टे, गदा, फिरंगाणा (फिरंगी तलवार), बिचवे, कटारा, पेशकब्जे, वाघनखें, भाले, कोयते, फरश, बंदुका, बरच्या असे शस्त्रसंभार कटितटीस बांधून सर्व जण आपआपल्या वाहनांवर आरूढ झाले. सर्वांच्या अंगीं अतिस्फुरण होतें, तशीच स्वामिनिष्ठाहि होती...."

स्वतः भाऊसाहेब आणि विश्वासराव यांनीं स्नानें केलीं. नंतर पूजा-अर्चा करून देवाची प्रार्थना केली. मग थोडा फराळ करून, युद्धाचा पोषाख करून, शस्त्रास्त्रें घेऊन ते तयार झाले. निशाण-बारदारांनीं निशाणें धरलीं. कूच करण्याचा नगारा झाला. निरनिराळे सरदार भाऊसाहेब यांना मुजरे करून नेमून दिलेल्या ठिकाणीं जाऊं लागले.

मध्यभागीं स्वतः भाऊसाहेब आणि विश्वासराव होते. त्यांच्याबरोबर हुजुरातीची फौज तयार होती. त्यांच्या उजव्या बाजूस जनकोजी शिंदे आणि मल्हारराव होळकर आपल्या सेनेसह होते. भाऊसाहेब यांच्या डावीकडील आघाडीस दमाजी गायकवाड, यशवंतराव पवार, अंताजी माणकेश्वर, विठ्ठल शिवदेव विंचूरकर व समशेरबहादूर होते. सर्वांच्या पुढें इब्राहिमखान गारदी यांनीं आपल्या तोफखान्याची रचना केली.

मागें बाजारबुणगे आणि स्त्रिया असून त्यांच्या बाजूस किरकोळ पलटणें होतीं.

फौज निघाली. निश्चय करून जोरानें, जोमानें निघाली ! शिंगें, नगारे, तास हीं रणवाद्यें वाजूं लागलीं. त्यांचे आवाज ऐकून सैनिकांना स्फुरण चढलें. घोडीं नाचूं लागलीं. भित्र्यांची घाबरगुंडी उडाली. " वीरांचा निश्चय हाच कीं, शरीर तृणप्राय मानून मर्दुमीचा हिय्या न सोडतां,

समशेरींची शर्थ करून दाखवावी. कौरव-पांडव सकल सेनेसहित कुरुक्षेत्रीं धारातीर्थीं सुस्नात जाहले, तदनुरूप आपणहि व्हावें ! " असा सर्वांचा निश्चय !

इकडे अबदालीस मराठ्यांची फौज लढाईस निघाल्याची बातमी पोहोंचलीच. त्यानेंहि आपल्या सैन्याची रचना केली आणि फौज युद्धास उभी केली. त्याच्या सैन्याच्या मध्यभागीं त्याचा वजीर शहावलीखान होता. उजव्या बाजूस रोहिले सरदार व डाव्या बाजूस नजीबखान रोहिले व शुजाउद्दौला असे दोघे होते. सैन्याच्या पुढें तोफखाना, उंटांवरचा तोफखाना हाहि होता. तेहि मोठ्या तरतुदीनें लढाईस उभे राहिले.

शुजाउद्दौला व नजीबखान या हिंदुस्थानांतील मित्रांवर अबदालीचा पूर्ण विश्वास नसल्यामुळें त्यांची योजना अबदालीनें आपल्या खास तुकड्यांच्या मध्यें केली. त्यांना हवी तशी हालचाल करतां येऊं नये, हाच त्याचा मुख्य हेतु होता. अबदालीनें नुकतेच नवीन सैनिक व घोडे आणवून सैन्याची शक्ति वाढविलेली होती. मराठ्यांचें सैन्य चालून आलेलें पाहून त्यानें तावडतोब सैन्याची रचना करून सर्वांना ताकीद दिली. तो स्वतः मात्र लढाईच्या मोर्चांत उभा न राहतां, मोर्चामागें सुमारें दोन मैल असणाऱ्या आपल्या राहुटींत जाऊन झटपट पुढील व्यवस्थेस लागला.

दोन्ही सैन्यांची नजरानजर सुमारें ९ वाजतां पडली. शत्रु टप्प्यांत आला आहे, असें पाहतांच दोन्ही पक्षांकडून तोफांची सरबत्ती झाली. तोफांचे आवाज आणि धूर यांनीं आकाश भरून गेलें.... दिनमणीचा अस्त जाहला, असा भास जाहला. दोन्ही फौजा जवळ येतांच मिसळून युद्ध होऊं लागलें. भाल्यांच्या फेकी, तलवार-पट्ट्यांचे वार, छोट्यामोठ्या बंदुकांतून गोळागोळी अशी एकच धमाल उडून गेली.

' हरहर महादेव ' व ' दीन दीन ' या घोषणांनीं कानठळ्या बसल्या.

दमाजी गायकवाड व विठ्ठल शिवदेव यांनीं शत्रूवर घोडीं घातलीं. पण मारा पाहून त्यांनीं पिछेहाट केली. तावडतोब रोहिले पुढें सरूं लागले, तेव्हां इब्राहिमखान गारदी यांनीं तोफांचा मारा करून व पायदळी पलटणें पुढें आणवून रोहिल्यांना थोपवलें. त्यांच्या हल्ल्यामुळें आठ हजार रोहिले ठार झाले !

भाऊसाहेब व विश्वासराव यांच्या नेतृत्वाखालीं मध्यभागीं असलेल्या हुजुरातीच्या फौजेनें मध्यभागीं असणाऱ्या अबदालीचा वजीर शहावलीखान याच्या फौजेवर हल्ला चढविला. तो फारच जोराचा होता.... " धो धो वाहणाऱ्या नदीनें वाटेंत येणारें सारें कांहीं गिळून टाकावें, त्याप्रमाणें मराठ्यांनीं दुराणीचें सैन्य गिळून टाकलें. लढाई इतकी निकराची होती कीं, आकाश आणि पृथ्वी दिसेनाशी झाली. आणि हें दृश्य पाहून आकाशाचे डोळे दिपून गेले ! " असें वर्णन प्रत्यक्ष रणांगणावर हजर असलेले काशीराज यांनीं लिहून ठेवलें आहे.

याच लढाईत अबदालीकडील अताईखान ठार झाला ! वजीर शहावलीखान याचा मुलगा मेला ! बरोबरची तीन-चार हजार फौजहि मरून पडली. इतर फौज हाय खाऊन पळूं लागली ! पराभव व्हावयाची वेळ आली. वजीर तोंडांत मारून घेऊन रडूं लागला. " काबूल लंबा है । यारो, भागो मत ! " असें ओरडून तो पळणाऱ्या सैनिकांना परत बोलावूं लागला.

अबदालीस ही बातमी समजतांच त्यानें आपले खास शिपाई पाठवून त्यांच्याकडून पळून जाणाऱ्या फौजेस परत फिरवलें. " पळणाराला कापून टाका " असा त्यानें हुकूम दिला. तो ऐकून तेरा-चौदा हजार लोक फिरून रणांगणांत आले. तोंपावेतों भाऊसाहेब, विश्वासराव, इब्राहिमखान गारदी, यशवंतराव पवार, समशेरबहादर, अंताजी माणकेश्वर, जनकोजी शिंदे यांनीं सर्वांनीं आपआपल्या सैनिकांसह अबदालीच्या सैन्याची दाणादाण उडविली !........ " नामी नामी सरदार नांवाबिनांवांचे यांणीं जीवित्वाची तमा न धरतां बेलाशक हैदोसच केला. कोणास क्षतें वर्मीं लागलीं, ते विष्णुलोकास गेले व कोणीं रणांगणीं मूर्च्छित पडले व कोणाचीं शिरें तुटून धडावेगळीं जाहलीं व कोणाचीं उदरें फुटोन अंतर-माळा लोंबूं लागल्या. कितीकांचीं शरीरें त्या गर्दीच्या रवंदळींत चिरडून गेलीं....रक्तोदकें भूलिंगास अभिषेक जाहला आणि शिरकमलें हींच भूलिंगास कमलें अर्पण जाहलीं.... ! "

आतां सुमारें २ वाजले होते. सकाळपासून लढून मराठे अगदीं थकून गेले होते. उपासमारीमुळें अशक्त झालेल्या, घोडे मरून गेल्या-

मुळें पायींच धावणाऱ्या मराठ्यांच्या सैन्यानें निकराची लढाई दिली. शत्रूला धडकी भरविली. परंतु नंतर एकाएकीं दुर्दैव ओढवलें ! ....

लढाईच्या धुमश्चक्रींत विश्वासराव लोकांना उत्तेजन देत घोड्यावरून फिरत असतां, त्यांना छातींत गोळी लागली ! ते तत्काळ गतप्राण झाले ! सेवक लोकांनीं त्यांचें शव हत्तीवर अंबारींत ठेवलें ! हें वर्तमान भाऊसाहेब यांना समजतांच त्यांना फारच वाईट वाटलें ! त्यांचें अवसानच गळालें ! 'विश्वासरावाला आपण नानासाहेबांजवळून मुद्दाम मागून आणलें. आतां लढाई जिंकली तरी विश्वासरावाशिवाय नानासाहेबांना आपलें तोंड कसें दाखवावें ?' या विचारानें त्यांचा धीर सुटला. लोकांचाहि धीर सुटला ! फौज माघार घेऊन पळूं लागली. फौजेच्यामागें असणारे बाजारबुणगेहि पळूं लागले ! आतां निभाव लागणार नाहीं, या विचारानें मल्हारराव होळकर, विठ्ठल शिवदेव, दमाजी गायकवाड असे नामांकित मातबर लढाई सोडून रणांगणांतून माघार घेऊन निघाले ! त्यांच्यामागोमाग फौज धावूं लागली !

याच वेळीं अबदालीनें ताज्या दमाची, राखीव, क्रूर अशा चार हजार अफगाणांची तुकडी रणांगणांत आणली ! पाहतात तों मराठ्यांची सेना पळत आहे. मग त्यांनीं कत्तल करण्यास सुरुवात केली.

विठ्ठल शिवदेव यांच्या फौजेंत दोन हजार पठाण नोकरीस होते. विश्वासराव पडल्याचें ऐकून त्यांनीं खुणेसाठीं दिलेले डोक्यावरचे भगवे पटके टाकून देऊन बुणगे लोकांत लूट करावयास सुरुवात केली. त्यामुळें आणखीच घबराट सुटली. जो तो पळूं लागला. नाना फडणीस लिहितात : "लक्ष सैन्य, त्यांत मोठमोठे सरदार असतां एकहि त्या समयास श्रीमंतांना आप्त न जाहला. बहुत अन्न भाक्षिलें. कृपा पुत्रवत् केली.... चांगला काल होता तेव्हां 'केसास ढका लागल्यास प्राण देऊं' ही प्रतिज्ञा. परंतु ईश्वरघटित विपरीत काळ, त्यांत सोबती कोण होतो ? सर्व सुखाचे सोबती !" सर्व प्राणभयानें पळूं लागले. निशाण उघडें पडलें. तें हत्तीवरून काढून घोड्यावर घेतलें. लोकांनीं परत फिरावें म्हणून शहाजाणें वाजविलीं. पण पळालेले कोणी आले नाहींत. भाऊसाहेब यांच्या तोंडास कोरड पडली. हाणा ! मारा ! म्हणावयाचे राहिले ! शेवटीं त्यांनीं

अबदालीच्या फौजेवर आवेशानें चालून घेतले. नवीनच मदतीला आलेल्या सहा हजार गुलामांचा त्यांच्याभोंवतीं गराडा पडला. निकराची लढाई सुरू झाली. त्यांतच ते गडप झाले. प्रेतांचे ढीग पडले. उरलेल्यांना नेता उरला नाहीं. ते चौफेर पळत सुटले ! मराठी फौज उधळली गेली. जनकोजी शिंदे व इब्राहिमखान गारदी शेवटपर्यंत लढत होते. जखमी अवस्थेंत त्यांना शत्रूकडील फौजांनीं पकडून नेलें. अबदालीनें इब्राहिमखानाचा शिरच्छेद केला. जनकोजी शिंदेहि कैदेंतच मारले गेले ! तुकोजी शिंदे पडले. अंताजी माणकेश्वर, समशेरबहादूर भयंकर जखमी झाले ! तेहि जखमांनीं वारले. संताजी वाघ, मानाजी पायगुडे, यशवंतराव पवार, बाजी हरी ठार झाले ! लहानमोठे सरदार तर अनेक पडले ! " दोन मोत्यें गळालीं, सत्तावीस मोहऱ्या हरवल्या, रुपये आणि खुर्दा यांचा पत्ताच नाहीं ! "

अबदालीच्या बाजूचीहि खूप हानि झाली. दोन्ही बाजूंचे सुमारें ऐंशी हजार ते एक लाख सैनिक युद्धभूमीवर कामास आले ! म्हणूनच इतक्या आहुति घेणाऱ्या पानिपतच्या युद्धास इतिहासांत ' महारणकुंड ' म्हणून प्रसिद्धि लाभली !

लढाई मोडली. त्यानंतरची हकीकत वर्णन करीत बसण्यापेक्षां १७६१ च्या लढाईतून जे परत आले, त्यांच्याच शब्दांत तें वाचूं या. पहिली हकीकत पानिपतच्या लढाईच्या वेळीं हजर असणारे सटवोजी जाधव यांची आहे. ते लिहितात, " पौष शु॥ ८ स पुढें फौजा, त्यापुढें तोफखाना, बुणगे पाठीवर, समागमें घेऊन निघोन मोंगलांवर चालून जाऊन झुंज उत्तम प्रकारें केलें. अडीच-तीन प्रहरपर्यंत झुंज चांगलेंच झालें. राजश्री विश्वासराव यांस गोळी लागून ठार झाले.... वरकड कित्येक कामास आले. आपलें फौजेनें शिकस्त खादली. त्यास जिकडे सोय पडली तिकडे निघाले. कोणी कोणास मिळाले नाहींत. मल्हारजीबाबा हजार-दोन हजार फौजेनिशीं निघाले. सौभाग्यवती पार्वतीबाई दोन-चारशें स्वारांनिशीं निघाली होती. त्यांची व मल्हारबाबांची गांठ पडली. त्यांजला ते सांभाळून चमेलीपार गेले....वरकड फौज जाटाचे मुलुखांतून ज्यास जिकडे वाट फुटली तिकडून निघाली. वाटेनें गांव मातबर. गांवोगांव राउतांचा भरणा. दोन रोज रात्रं-

दिवस झुंज पुरवलें. घोडीं थकून गेलीं. कोणाचें घोडें निभावलें नाहीं. तमाम फौज पायउतारा झाली. आम्ही मागावून गाड्यांत व डोल्यांत बसून कुंभेरीस आलों....सारांश, फौजेचा विध्वंस झाला तो लिहितां पुरवत नाहीं ! ”

(९ फेब्रुवारी १७६१)

अनुपगीर गोसावी (शुजाउद्दौल्याकडील हिंदु नोकर) नानासाहेब पेशव्यांना लिहितात........“ झुंजांत रणमंडळांतून विश्वासरायाशीं दुराणी घेऊन आले. त्यासमागमें हिंगणे होते. ते वर्तमान दुसरे दिवशीं तृतीय प्रहरीं शुजाउद्दौल्याकडे आले. त्यांनीं रायांचे लोक आपणांजवळ आणविले आणि आज्ञा केली कीं, यांचें सार्थक यथासांग करणें. तेव्हां आपले डेऱ्यांत घेऊन आलों....नबाब साहेबासीं सांगून रणभूमीवर शोध केला. त्यांपैकीं एका शरीरास मस्तक नव्हतें. त्या शरीराखालीं सात मोत्यें सांपडले. त्याचें चिन्ह उजवे पायावर केस नव्हते. कमरेस कटारीची जखम होती....सर्वांनीं पाहिलें....हत्तीवर घालून आणलें. मग चंदनादिक विधि करविले. गणेश वेदांतीनें अस्थि भागीरथीतीरीं पाठविल्या. पत्रावरून संशयनिवृत्ति केली पाहिजे.... ”

भाऊसाहेब यांच्या शवास अग्निसंस्कार केल्याचें याच अर्थाचें काशीराज शिवदेव यांचेंहि पत्र आहे.

☆ ☆ ☆

: २३ : विजय कोणाचा ?

पानिपतची लढाई शेवटीं सकाळपासून संध्याकाळपर्यंत झालेल्या एक दिवसाच्या घनघोर संग्रामानंतर संपली ! लढाई म्हटली कीं नाश !–धनाचा नाश, देशप्रदेशाचा नाश, घोडे-बैल-जनावरांचा नाश, मनुष्यमात्राचा नाश !

पानिपतच्या लढ्यांत किती नाश झाला, याचा नक्की आंकडा नाहीं. त्या वेळचीं कागदपत्रें टिपणें, टाचणें पाहून तज्ज्ञ इतिहासकारांनीं केलेला अंदाज पाहिला कीं छाती दडपून जाते !

उत्तम शरीरप्रकृति व उत्तम कर्तबगारी असणारीं लहानमोठीं लाख-सव्वा लाख माणसें पानिपतावर पडलीं ! मराठी राज्यांतील एक कर्तबगार पिढीच तेथें कापली गेली.

घोडेगुरांचें तर विचारूंच नका. मराठ्यांचे पन्नास हजार घोडे गेले ! तीनशें हत्ती गेले. तीन हजार उंट गेले. सुमारें दोन लाख बैल अबदालीकडे पाडाव झाले. वीस-बावीस हजार माणसें गुलाम म्हणून विकलीं गेलीं ! दुर्दैवी बिचारीं ! हवीं तीं घोडीं व हवे ते बैल अगदीं थोडक्या किमतीस विकले गेले ! कुणी घेतले त्यांच्या जनावरांचे मात्र खूप हाल झाले. बरेचसे अबदालीच्या विजयी सैनिकांनीं खाण्यासाठीं मारले !

मराठयांकडील तीनशें लहानमोठया तोफा, पंचवीस हजार बंदुका, अनेक लहानमोठया तलवारी, तंबू व इतर सामान अबदालीस मिळालें.

इतकी मोठी हानि आणि इतका मोठा पराभव मराठयांच्या पदरीं आला ! अबदाली विजयी झाला. मात्र हा विजय त्यास खूपच किंमत देऊन मिळवावा लागला. त्यामुळेंच कीं काय, दिल्लींत फार दिवस न थांबतां किंवा दिल्लीचा बादशहा न बनतां, भाऊसाहेब यांनीं दिल्लीच्या मोंगल बादशहाच्या गादीवर बसविलेल्या शहाअलम यासच बादशहा म्हणून त्यानें कायम ठेवलें. एवढेंच नव्हे तर बादशहाची वजिरी लढाईमधील आपला दोस्त शुजाउद्दौला यास न देतां मराठयांविषयीं आदर असणाऱ्या गाजीउद्दीन यासच दिली. खान नजीबखान याला बक्षी (सेनापति) नेमलें.

दिल्लीच्या कारभाराची वा राज्याची त्यानें हाव धरली नाहीं. शिवाय मराठ्यांचा पराभव झाला तरी त्यांचें संपूर्ण उच्चाटन मात्र झालेलें नव्हतें. मराठ्यांशीं दोस्ती करावी म्हणून त्यानें वाटाघाटींसाठीं पेशव्यांना पत्रेंहि पाठविलीं ! अबदाली पेशव्यांना लिहितो.... "तुमचें-आमचें वैर असण्याचें कारण नाहीं. तुमचे पुत्र विश्वासराव व बंधु युद्धांत मारले गेले, त्यास आमचा नाइलाज होता. भाऊसाहेब युद्धास उभे राहिले तेव्हां आम्हांसहि बचावासाठीं लढणें प्राप्त झालें. तथापि ते मारले गेले, याबद्दल आम्हांस फार फार खेद होतो. दिल्लीचा कारभार आपण पूर्ववत् चालवावा. त्यास आमची हरकत नाहीं. मात्र सतलजपावेतोंचा पंजाबचा प्रदेश आपण खुशीनें आमचेकडे असों द्यावा, शहाअलमास बादशाहीवर ठेवावें आणि

झाल्या गोष्टी विसरून पुढें आपला-आमचा स्नेह कायमचा राहावा, अशी आमची मनापासूनची इच्छा आहे. ती आपण पूर्ण करावी ....'' हीं पत्रें व त्यासोबत सन्मानाचीं वस्त्रें १० फेब्रुवारीस पेशवे माळव्यांत असतांना त्यांच्याकडे आलीं.

ज्या दिल्लीच्या कारभारासाठीं मराठे पानिपतवर लढले आणि पडले त्यांचा पराभव करणाऱ्या अब्दालीनेंच "दिल्लीचा कारभार आपण पूर्ववत् पाहावा" म्हणून मराठ्यांना कळविणें हा मराठ्यांचा जयच म्हणावयास पाहिजे ! परंतु तो मिळवितांना किंमत मात्र जबर द्यावी लागली !

☆ ☆ ☆

: २४ : अपयश मरणाहुनि ओखटें !

जगांत सत्ता, हुकमत ही फार मोठी गोष्ट आहे. बहुतेकांना ती हवी असते. पण ती मिळविणें ही गोष्ट मात्र सोपी नसते. सत्तेसाठीं भांडणें-तंडणें, छोट्या छोट्या लढाया आणि महाभयंकर युद्धें ! युद्ध म्हटलें कीं एकाचा जय आणि दुसऱ्याचा पराजय, हें ठरलेलेंच ! विजेते सत्ताधीश होतात. पराजित व्यवहारी असले तर लाचार झाल्याचा बहाणा करतात, क्षमा मागतात आणि सुटका करून घेऊन पळ काढतात. कुणी पळाकडे पाहून हसूं लागले, तर ते बजावतात कीं, "आज आम्ही पळत आहोंत ते उद्यां लढण्यासाठींच !" "अपयश मरणाहुनि ओखटें !" असें म्हणणारे मात्र रणांगणांत ठासून उभे राहतात. तोंडानें ओरडून शत्रूंना सांगतात, "चालव तुझी तलवार ! उडव बंदूक ! आम्ही जिवंत आहोंत तोंपर्यंत लढूं, तुटूं, मोडूं, शेवटीं रणांगणावर पडूं ! पण पळणार नाहीं." अशांना कुणी वीर म्हणतात, कुणी वेडे म्हणतात ! शें-पन्नास वर्षांनंतर इतिहासकार जयाचीं कारणें शोधतात, पराजयाची चर्चा करतात. त्यांत बहुधा पराजयाची चिकित्सा जास्त होते. आणि पराभूत व्यक्तीला वा त्याच्या देशाला पराभव पुनः नको असेल, तर त्या चिकित्सेपासून त्यानें बोध घेतलाच पाहिजे.

इ. स. १७६१ सालीं पानिपतावर मराठ्यांचा पराभव झाला. परकीय अबदालीस हुसकून लावून स्वदेशावरील संकट दूर करण्यासाठीं मराठ्यांची एक पिढी पानिपतावर कटून मेली ! भाऊसाहेब, विश्वासराव, जनकोजी शिंदे, इब्राहिमखान गारदी, समशेरबहाद्दर व इतर अनेक वीरांचा शेवट हृदय फुटून जाईल अशा रीतीनें झाला. इतर संहार इतका भयंकर झाला कीं, त्या प्रसंगाची आठवण अगदीं सलत्या जखमेसारखीच झाली. पानिपत ही मोठी राष्ट्रीय आपत्तीच. अशाच वेळीं राष्ट्रीय गुणदोषांचें पुरें पुरें दर्शन होतें. असें कां घडलें ?–हें पाहण्यासाठीं पराभवाच्या कारणांची यादीच करूं या :

(१) मोठी सनद मिळाल्यानंतर दिल्लीच्या बंदोबस्ताची जबाबदारी अंगावर पडली. ती पार पाडण्यासाठीं दिल्लीची वेस असणारा पंजाब प्रांत ताब्यांत ठेवून त्याचा नीटनेटका बंदोबस्त ठेवणें अत्यंत आवश्यक होतें. पण या कामगिरीवर गेलेले रघुनाथराव यांनीं तो नीटनेटका केला नाहीं. दत्ताजी शिंदे यांनाहि तो करतां आला नाहीं. त्यामुळें अबदाली अलगद दिल्लीला पोहोंचला !

(२) दिल्लीच्या कारभाराचीं सूत्रें हातीं आलीं होतीं. परंतु रघुनाथरावांनीं ढिलेपणा केल्यामुळें दिल्ली-दरबारांतील राजकारणांत खूप गोंधळ झालेला होता.

(३) सर्व संकटाला आमंत्रण देणाऱ्या नजीबखानाचा बंदोबस्त रघुनाथरावांनीं केला नाहीं. उलट मल्हाररावांच्या सल्ल्याप्रमाणें त्यास सोडून दिलें गेलें. याच नजीबखानानें पानिपतच्या लढाईचा योग घडवून आणला. त्यानें अबदालीला बोलावलें व हिंदुस्थानमधील मुसलमानांची धर्मभावना चेतवून त्यांना एकजुटीनें मराठ्यांशीं लढण्यासाठीं उभें केलें. त्यास वेळींच ठेचला असता, तर लढाईचा बनाव कांहीं निराळाच झाला असता.

(४) भाऊसाहेब युद्धावर निघाले, तेव्हां त्यांनीं निरनिराळ्या राजपूत राजेरजवाड्यांना " अबदाली परदेशी, सर्व मिळून त्यास घालवूं, " असा सल्ला देऊन मदतीला बोलावलें, पण कोणी मदतीस आले नाहींत. कारण मराठ्यांनीं स्वारी-शिकारी व पैशाच्या खंडण्यांसाठीं राजपुतांना इतकें

दुखावलें होतें कीं, त्यांना मराठ्यांबद्दल मुळींच आपुलकी नव्हती. छत्रपति शिवाजीमहाराजांनीं राजे जयसिंग यांच्याशीं जोडलेल्या स्नेहाप्रमाणें राजपुतांचा स्नेह मराठे अगोदर राखते, तर राजपुतांची मदत मिळाली असती आणि लढाईचा निर्णय निराळा झाला असता !

(५) " आपसांत दुही पडते, तेव्हां शत्रूस बळ फावतें " आणि " सर्वांचें एकचित्त असतें तेव्हां कार्य होतें, " हा तर अगदीं सनातन न्याय; पण दुर्दैवानें असें म्हणावें लागतें कीं, पेशव्यांच्या घरांतील कर्त्या पुरुषांमध्यें, शिंदे-होळकर यांच्यासारख्या प्रमुख सरदारांत, दिल्लीचे हिंगणे वकील व सेनाप्रमुख नारो शंकर यांच्यांत आपसांत चढाओढ व त्या चढाओढीच्या मागोमाग येणारें वितुष्ट होतेंच. सर्व एकचित्त असते, तर लढाईचा निर्णय निराळाच लागला असता ! आतां कांहीं तात्कालिन कारणें :

(१) तात्कालिक कारणांत सामान, रसद, पैसा यांच्याबाबत भाऊसाहेबांची जी कुचंबणा झाली, त्या कुचंबणेस पहिला क्रमांक द्यावा लागेल. नदी ओलांडण्यास सैन्यास पुरेशा नावा मिळाल्या नाहींत म्हणून अबदालीस एकाकी गांठण्याची संधि वायां गेली. रसद मिळाली नाहीं, म्हणून हाल झालेच.

(२) विश्वासरावांच्या लढाईतील मृत्यूमुळें लढाई उधळली. मालक किंवा नेता पडला तरी मराठे ठासून उभे राहिले असते, तर पराभव टाळतां आला नसता. मल्हारराव आणि नारो शंकर चांगली फौज हाताशीं असतांहि दिल्ली सोडून पळून मागें हटले, त्यामुळें घबराट वाढली.

(३) कुंजपुऱ्यावर परत फिरल्याबरोबर अबदालीशीं सामना झाला असता, तर जय मिळण्याचा खूप संभव होता. छावणी करून बसल्यामुळें मराठ्यांची कुचंबणा आणि उपासमार झाली.

(४) घोडे मरून गेल्यामुळें सैन्य पायदळ बनलें, त्याचा परिणाम युद्धावर झाला. घोडे गेल्याबरोबर स्वारांची शक्ति अर्धी झाली.

(५) अबदालीची रसद रोखण्यासाठीं गोविंदपंत बुंदेले कमी पडले.

(६) विश्वासराव पडल्याबरोबर विंचूरकरांकडील फौजेंत नोकरीस असणारे पठाण डोक्याचीं भगवीं फडकीं सोडून मराठ्यांच्या बिनलष्करी बाजारबुणग्यांत लुटालूट करूं लागले, त्यामुळें पळ सुरू झाला.

(७) स्त्रिया, बाजारबुणगे यांचें लटांबर हें मराठ्यांना लोढण्यासारखें झालें. धड त्यांना सोडून देतां येईना. निघून जावें, तर मुसंडी मारून जातां येईना. बाजारबुणग्यांसाठीं गोल धरला, पण तो टिकला नाहीं. हजारों सैनिकांच्या लढ्यांत 'गोल' निभावणें शक्यच नव्हतें !

(८) मराठ्यांनीं नवीन तोफखाना व कवायती पलटणी तयार करून नेल्या. पण सैन्यांत मुख्य घोडेस्वार व जुन्या पद्धतीनें लढणारें सैन्य होतें. दोन्हीमध्यें एकसूत्रीपणा आलेला नव्हता.

(९) मराठ्यांचा तोफखाना अवजडच होता. अबदालीचा उंटांवरचा 'सुतरनाला' झटपट मागेंपुढें हवा तेथें नेतां येई. त्यामुळें तो अचूक मारा करण्यास फारच फायदेशीर झाला. अबदालीकडे लांब पल्ल्याच्या बंदुकाहि होत्या.

या सर्व कारणांनीं मराठ्यांचा पानिपतावर पराभव झाला. पानिपतावर भयंकर संहार झाला, तरीसुद्धां देशाला स्फूर्ति देणारा हा इतिहास-प्रसंग आहे यांत शंकाच नाहीं. आजहि कुणी राष्ट्रहितचिंतक पानिपतच्या रणमैदानावर हिंडेल, कानोसा घेईल, संदेश मागेल, तर त्या रणभूमींतून शब्द निघतील :

"आपसांत दुही पडते तेव्हां शत्रूंस बळ फावतें. अतएव दुही टाळ !"

"सर्वांचें एकचित्त असतें, तेव्हांच कार्य होतें, अतएव एकचित्त हो !"

"नावा नव्हत्या म्हणून बेत फसले ! काल नावा नव्हत्या; उद्यां विमानें नसतील ! राष्ट्रपुरुषा, सावधान हो ! तरतूद कर त्यांची !"

"आभाळ कोसळलें तरी गाडून उभा राहा !"

"अपयश मरणाहुनि ओखटें ! तें पदरीं घेऊं नकोस !"

☆ ☆ ☆

ऐतिहासिक उतारे

" तुम्ही-आम्ही निर्माल्यवत् होऊं ! "

" बाळांनो, तुम्ही अजून लहान मुलें आहांत. सध्यां रामेश्वरापासून अटकेपर्यंत एकछत्री राज्य झालें असून फक्त नजीबखान तेवढा 'खणू' राहिला आहे. त्याचा बंदोबस्त तुम्हीं केला, तर पेशवे अटकेपासून जासुदाचे हातून खंडणीचे पैसे आणवतील. मग तुम्ही-आम्ही निर्माल्यवत् होऊं. मग कोणी पुसणार नाहीं. त्यासाठीं नजीबखान तेवढा रक्षण करणें..."

— मल्हारराव होळकरांचा शिंद्यांना उपदेश. (भाऊसाहेबांची बखर)

" तुमच्या परगण्याची जप्ती होईल ! "

" श्री महाराजाधिराज श्रीमहाराजा श्रीराजा खेतसिंग्रजूदेव यांना – पंतप्रधान बाळाजी बाजीराव यांचे आशीर्वाद. वि॥ आपलेकडून खंडणी रुपये यावयाचे आहेत. ते तुम्ही देत नाहीं. ढिलाई करतां असें निदर्शनास आलें आहे. हें ठीक नाहीं. तरी पत्रदेखत खंडणीचे पैसे श्री. गोविंद बल्लाळ यांचेकडे देणें. रुपये देण्यांत ढिलाई झाल्यास तुमच्या परगण्याची जप्ती होईल. कळावें. "

—नानासाहेबांचें उत्तरेंतील एका संस्थानिकाला पत्र (२४ नोव्हेंबर १७५९)

" परकी शत्रु नाहींसा करावा ! "

" सर्व अमीर व राजेरजवाडे यांसी पत्रें पाठविलीं आहेत कीं फौजेसुद्धां आम्हांस येऊन सामील व्हावें. 'पादशाहत दिल्लींत कायम करून परकी शत्रु (अबदाली) नाहींसा करावा.' मग घरचा बंदोबस्त सहजांत होईल...."

—सदाशिवराव भाऊ यांचें गोपाळराव गणेश यांना पत्र (१८ एप्रिल १७६०)

सर्व सुखाचे सोबती

" दुसरे दिवशीं तयार होऊन प्रातःकालचे दोन घटिका दिवसास युद्धास गोळागोळीस प्रारंभ जाहला. श्रीमंत भाऊसाहेब आति बुद्धिमान् धैर्यवान्, शूर, कृतकर्मे, गर्वमात्र विशिष्ट, परंतु सैन्याची तर्तूद फारच चांगली केली. शेवटीं निशाणाजवळील तर्तूद एकीकडे जाऊन शत्रूची मुख्य स्थानींच गांठ पडली. मी श्रीमंतासन्निध ईशस्मरण किंचित् करून असेतों विश्वासराव यांस गोळी

लागली. पडले ते हत्तीवर श्रीमंतांनीं घालून उभेच राहिले. तों पठाण पायउतारा आंत येऊन मिसळले. तोंडातोंडी होऊं लागली. डावे बाजूचे मातब्बर सरदार, चौघड्याचे धनी देखील पूर्वींच पळाले. उजवे बाजूचेहि होळकर-शिंदे निघोन निशाण निघालें. दोन तीन शत पायदळ होतें. श्रीमंत दिसेनासे जाहाले. लक्ष सैन्य. त्यांत मोठमोठे सरदार असतां एकहि त्यासमयीं श्रीमंतांस आप्त न जाहला. बहुत अन्न भक्षिलें, कृपा पुत्रवत् केली. चांगला काळ होता तेव्हां केशास ढका लागल्यास प्राण देऊं अशा प्रतिज्ञा; परंतु ईश्वरघटित विपरीत काळ. त्यांत सोबती कोण होतो ? सर्व सुखाचे सोबती ! भोजन आदरें करून करावें; वस्त्रें, जवाहीर, जाहागिऱ्या द्याव्या, इतकेंच ! सर्व वाताहत जाहाले. ”

——नाना फडणीस (जुलै १७६१)

“ ईश्वरी कौतुक ब्रह्मादिकांस न कळे ! ”

...“ जरिपटक्याचे निशाणावर अगोदर दाटी जाहली होती. तेव्हां निशाण हत्तीवरून घोड्यावर घेतलें. आणि निशाण गुंडाळून पळों लागले. तेव्हां भाऊसाहेबांनीं शहाजणें वाजविण्यास आज्ञा केली. फत्ते जाली, शहाजणें वाजवितात, यामुळें लोक माघारें फिरतील, अशा आशेनें शहाजणें वाजवूं लागले. पण ज्यांनीं पळ काढला त्यांपैकीं कोणी परत आले नाहींत. भाऊसाहेब यांचे तोंडास खरस लागली. “हाणा मारा” म्हणावयाचे राहिले. तोंडापुढें कोणी ओळखीचा भेटला तर हुंकार देऊन मानेनें आज्ञा दाखवूं लागले. अंगावर ब्रह्मांड कोसळलें. परंतु हिंमत हरली नाहीं. जाग्यावर फक्त हजार-बाराशें मात्र उभे राहिले. चोहोंकडे एकदांच आभाळ पांढरें जाहलें. जिकडे तिकडे पळूं लागले. भाऊसाहेबांजवळ जनकोजी शिंदे व रावसाहेब (विश्वासराव) यांचे मुर्द्याचे हत्तीजवळ शेंपन्नास लोक उभे होते, तेवढे बाकी राहिले....दुराणी व नजीबखान दहा हजार फौजेनिशीं भाऊ-साहेब यांजवर येऊन पडले. ते समयीं मारामार अशी जाहली कीं, ‘ न भूतो न भविष्यति । ’ खंदळारखंदळ बहुतच केली. त्यांत भाऊसाहेब व जनकोजी शिंदे यांची गत कशी काय जाली तें न कळे. उभयतां खासे दृष्टीनें पाहिले नाहींत. गैब जाहले किंवा अस्मानांत गेले किंवा पृथ्वींत गेले, हें ईश्वरी कौतुक ब्रह्मादिकांस न कळे. तेथें मानवियास काय कळे ? ”

— भाऊसाहेब यांची बखर.

आम्हां मराठ्यांस जिवापेक्षां अब्रू प्यार !

" विसाजी कृष्णास पांचशें धनगर देऊन आज्ञा दिली, आम्ही रणांत पडलों तर आमचे स्त्री जातीस जीवें मारा, पण मऱ्हाठियांच्या स्त्रिया गिलचांचे हातीं बेइज्जतीस सापडल्या, असा लौकिक न होईल असें करावें. आम्हांस, मराठेयांस, जीवादेखील अब्रू प्यार ! " —भाऊसाहेबांची बखर.

" दोन मोत्यें गळालीं.... "

" दो मोती गलत, दसबीस अश्रफत, रुपयों की गणति नहीं !...."

——भेलशाजवळ पेशव्यांना भेटलेल्या सांडणीस्वाराजवळील सांकेतिक पत्र.

ईश्वरी क्षोभ

" बुधवारीं पौष शु॥ ८ स मजबुदीनें चालोन गेले. गिलचा गनीम भारी व कट्टा, तथापि आपले फौजांनीं बरीच शर्थ केली. ईश्वरी क्षोभ हेंच खरें. लोक-पाय उतारा, अंगावरी पांघरूण नाहीं असें विपत्तीनें आले. मल्हारराव होळकर आले. हे लढाईतून अगोदरच निघाले होते. माणसांचे हाल फार झाले. कुल-सरंजाम अवघे लष्कराचा गेला. "

— सटवोजी जाधव (१० मार्च १७६१)

नवा अभिमन्यु

" विश्वासराव अभिमन्यूप्रमाणें रण भेदून कैलासवासी झाले....इब्राहीम-खान पाडाव झाले. सरदार व लोक मारले गेले. युद्धच आहे. यश-अपयश ईश्वराधीन. असो, चिंता काय ! "

— नानासाहेब पेशवे यांचें दीक्षितांना पत्र.

" भाऊवांचून दुनिया व्यर्थ ! "

" चिरंजीव भाऊ आल्यावर मग सर्व मनसबे करावे. चिरंजीव भाऊ जिवंत नसल्यास मजला लढणें नाहीं. एका भाऊवांचून दुनिया दौलत व्यर्थ आहे. त्याचे हातचें पत्र पाहीन तेव्हां माझे बायकोस व मला जीव येईल. आतां तों आम्ही वेडेपणें आहों. लेक (विश्वासराव) अल्पायुषी होता, सूर्यमंडळ भेदून गेला. तें दुःख शास्त्रपुराणें करून टाकिलें. परंतु चिरंजीव भाऊवांचून सकल व्यर्थ. भाऊवांचून दुनिया व्यर्थ ! भाऊवांचून दौलत करणें नाहीं. "

——नानासाहेब पेशवे यांचें नाना पुरंदरे यांना पत्र. (फेब्रुवारी १७६१)

☆ ☆ ☆

पानिपतच्या रणसंग्रामातील दिनविशेष

२३ एप्रिल १७५२ – मराठ्यांना बादशाही सनद मिळते.
५ मे १७५२ – शिंदे-होळकर फौजेसह दिल्लींत दाखल.
१७ मार्च १७५४ – खंडेराव होळकराचा कुंभेरीच्या वेढ्यांत मृत्यु.
२५ जुलै १७५५ – जयाप्पा शिंदे यांचा खून.
१० ऑगस्ट १७५५ – रघुनाथराव उत्तर हिंदुस्थानांतून परत आले.
२० जानेवारी १७५६ – अहमदशहा अबदालीचा दिल्लींत प्रवेश.
४ फेब्रुवारी ते २० फेब्रुवारी १७५६ – अबदाली दिल्ली लुटतो.
६ मार्च १७५६ – मथुरा, वृंदावन, आग्रा येथें लूट व कत्तल.
१ एप्रिल १७५६ – अबदाली अफगाणिस्थानांत परत जातो.
११ ऑगस्ट १७५७ – रघुनाथराव व होळकर दिल्लीला दाखल. नजीबखानास कैद.
६ सप्टेंबर १७५७ – नजीबखानाची सुटका.
११ एप्रिल १७५८ – रघुनाथरावांनीं लाहोर काबीज केलें.
१० ऑगस्ट १७५८ – मराठ्यांचे अटकेवर झेंडे लागले.
१६ सप्टेंबर १७५८ – रघुनाथराव पुण्यास परत.
२६ डिसेंबर १७५८ – दत्ताजी शिंदे दिल्लीस दाखल झाले.
१५ सप्टेंबर १७५९ – नजीबखानावर दत्ताजी शिंदे यांचा हल्ला.
ऑक्टोबर १७५९ – अबदाली पंजाबावर स्वारी करतो.
१० जानेवारी १७६० – दत्ताजी शिंद्यांचा वध.
१३ फेब्रुवारी १७६० – उदगीरला निजामाचा मराठ्यांकडून पराभव.
१४ मार्च १७६० – भाऊसाहेब पटदरहून स्वारीसाठीं रवाना.
१४ जुलै १७६० – भाऊसाहेब आग्र्यास पोहोंचतात.
२ ऑगस्ट १७६० – भाऊसाहेब दिल्ली काबीज करतात.
जुलै–ऑगस्ट १७६० – शुजाउद्दौला अबदालीस मिळतो.
१५ सप्टेंबर १७६० – सुरजमल जाट मराठ्यांना सोडून जातात.
१० ऑक्टोबर १७६० – अली गौहर यास मराठे बादशाहा करतात.
१७ ऑक्टोबर १७६० – भाऊसाहेब कुंजपुरा घेतात.
२६ ऑक्टोबर १७६० – अबदाली यमुना ओलांडतो.
२८ ऑक्टोबर १७६० – अबदाली व मराठ्यांची पानिपतजवळ चकमक.

१ नोव्हेंबर १७६० ते }
१३ जानेवारी १७६० } अब्दाली व मराठे यांचा पानिपत येथें मुक्काम व किरकोळ लढाया.

२२ नोव्हेंबर १७६० – जनकोजी शिंदे नजीबखानाचा पराभव करतात.

७ डिसेंबर १७६० } मराठे शहावलीखानाचा पराभव करतात.
बळवंतराव मेहेंदळे यांचा मृत्यु.

२० डिसेंबर १७६० – गोविंदपंत बुंदेले यांचा मृत्यु.

६ जानेवारी १७६१ – मराठ्यांचा खजिना अब्दाली लुटतो.

१० जानेवारी १७६१ } मकरसंक्रांत. अब्दालीशीं लढत भिडत दिल्लीला जाण्याचा मराठ्यांचा निश्चय.

१४ जानेवारी १७६१ – निकाली युद्ध. मराठ्यांचा मोड. भाऊसाहेब, विश्वासराव यांचा मृत्यु.

२४ जानेवारी १७६१ – नानासाहेब पेशवे यांना माळव्यांत पानिपतचें वृत्त कळतें.


२९ जानेवारी १७६१ – अब्दाली दिल्लीस येतो. पेशव्यांनीं केलेली व्यवस्था कायम करतो.

१० फेब्रुवारी १७६१ – अब्दाली पेशव्यांना पत्रें व पोषाख पाठवितो.

२० मार्च १७६१ – अब्दाली परत फिरतो.

२३ जून १७६१ – नानासाहेब पेशवे यांचा मृत्यु.


१९ ऑक्टोबर १७७२ – अब्दालीचा मृत्यु.



पानिपतच्या भूमीवर उभारलेलें स्मारक

हस्ताक्षरें

(१)
(२)
(३)
(४)



(१) नानासाहेब पेशवे, (२) सदाशिवराव भाऊ, (३) गोविंदपंत बुंदेले, (४) राघोबादादा.

(१) जाणिजे छ १६ रबिलाखर बहुत काय लिहिणें
(२) घोड्यावर बसणें व लिहिणें पढणें चांगलें करणें
(३) जाऊन आपले आज्ञेप्रा चिरंजीवानें पुणेंयांत यैवज देणें
(४) मातबर मनसबे करावे येणेंप्रा निरंतर करावे येणें

आधारभूत ग्रंथ :

(१) मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें,
खंड : १ व ६
— कै. वि. का. राजवाडे.

(२) पेशवे दप्तर, भाग : २, २१, २७

(३) हिंगणे दप्तर, भाग : १

(४) भाऊसाहेबांची बखर
— संपादक : श्री. शं. ना. जोशी.


(५) इतिहास-मंजिरी
— संपापक : द. वि. आपटे.

(६) मराठी रियासत, भाग : ६
— कै. गो. स. सरदेसाई.

(७) Panipat : 1761
— श्री. त्र्यं. शं. शेजवलकर.

(८) Ahmedshah Durani
— प्रो. गंडासिंग.

(९) The Battle of Panipat
(काशिराजाच्या बखरीचा इंग्रजी अनुवाद)
— रॉलिन्सन.



पानिपतची गढी

पानिपतचा रणसंग्राम

अधिक अभ्यासाची गोडी

☆ पानिपतचा रणसंग्राम या पुस्तकानें वाचकांच्या ज्ञानांत भर पडेल आणि त्यांना इतिहासाचा अधिक अभ्यास करण्याची गोडी लागेल.

—म. म. द. वा. पोतदार

सुसंगत वृत्तान्त

☆ ऐतिहासिक पत्रें – बखरी इत्यादि साधनांशीं सुसंगत असा वृत्तान्त पानिपतचा रणसंग्राम या पुस्तकांत आला आहे. हा छोटा ग्रंथ आबालवृद्धांनीं वाचावा, हें सांगण्यास आनंद वाटतो.

— इतिहास-संशोधक श्री. शं. ना. जोशी

ठशीव शब्दचित्र

☆ इतिहास आणि साहित्य हीं दोन जुळीं भावंडें आहेत. इतिहासांत सत्य तर पाहिजेच, पण तें सुवर्णमय शब्द-पात्रांतून पुढें ठेविलें पाहिजे. या दोन्ही दृष्टींनीं पानिपतचा रणसंग्राम हें पुस्तक साधार, संगतवार आणि सुबोध झालें आहे. भाषेच्या दृष्टीनें विचार करतां या पुस्तकामुळें एक ठशीव शब्दचित्र वाचकांपुढें उभें राहातें.

—ना. काकासाहेब गाडगीळ

सुसूत्र कथानक आणि आकर्षक भाषाशैली

☆ पानिपतच्या घटनेस इ. स. १७५२ पासून सुरुवात करून या पुस्तकांत ऐतिहासिक औचित्य सांभाळलें आहे, आणि अखेरच्या संग्रामास योग्य अशी पार्श्वभूमि निर्माण केली आहे. कथानक सुसूत्र सांगितलें आहे....मूळ ऐतिहासिक साधनांचा भरपूर उपयोग करूनहि भाषाशैलीचा आकर्षकपणा कायम आहे. त्यामुळें वाचकांच्या मनावरील पकड ढिली होत नाहीं.

—प्रा. रा. वि. ओतुरकर

○ ○ ○

